साप्ताहिक

२९ मार्च ८६ / २ रुपये

# माणूस




प्रतिकाराचे अंकुर-२

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : पंचविसावे

अंक : चव्वेचाळिसावा

□

२९ मार्च १९८६

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ–संजय पवार



## मुंबापुरी

### □ अधिवेशन

शंकरराव चव्हाण उजव्या हाताच्या बोटात हिरव्या खड्याची अंगठी घालतात. त्यांना ती साईबाबांनी भेट दिली असावी. साईबाबांची अगठी पहाताच आमची खात्री पटली की ह्या अधिवेशनात शंकररावांना स्वपक्षीयांपासून भय नाही. पण खरे सांगायचे तर हो जादूची अंगठी नसती तरी असंतुष्ट आत्म्यांपासून शंकररावांना भय नव्हते. हायकमांड तारी त्याला कोण मारी अशी एक जुनी म्हण आहे.

शंकरराव हे मुरलेले राजकारणी आहेत. दिल्लीच्या संसदीय राजकारणाचाही त्यांना अनुभव आहे. महाराष्ट्रातील आमदारांची अशी अवस्था आहे की, हायकमांडने पद्मिनी कोल्हापुरे यांचे नाव सुचवले असते तरी त्यांनी त्यांना मुख्यमंत्री पदावर बसवले असते. सुदैवाने या खेपेस हायकमांडलाही सुबुद्धी सूचून त्यांनी शंकररावांचे नाव सुचविले. यामुळे सत्तेपासून वंचित झालेल्या काँग्रेसजनांना किमान एक वर्ष तरी पक्षाशी एकनिष्ठ रहाण्यावाचून गत्यंतर नाही. ह्या वेळच्या अधिवेशनात जवाहरलाल दर्डा, सुधाकरराव नाईक, शिवाजीराव गायकवाड–निलंगेकर–पाटील उर्फ चंद्रकलेचे वडील वगैरे थोर नेतेमंडळी विधानभवनाच्या परिसरात औषधालाही दिसली नाहीत; पण ह्याचा अर्थ त्यांनी बंडाचा झेंडा उभारला असा मात्र तुम्ही करून घेऊ नका.

ह्या अधिवेशनाच्या काळात सांगण्यासारखे विशेष काही घडले नाही. चोपडा येथे झालेल्या दंगलीत शिवसेनेच्या दोन कार्यकर्त्यांना पोलिसांच्या कोठडीत मृत्यू आला ह्या घटनेवरून दोन्ही सभागृहात गदारोळ झाला. पण चोपड्याच्या विषयावर भावनावश होऊन बोलणारे शिवसेनेचे नेते फलटण येथील दलितांच्या वस्तीवरील हल्ल्याचा विषय निघताच गंभीर झाले. उगाच दंगलीची चर्चा करताना पक्षीय राजकारण कशाला आणता असे त्यांचे मत पडले.

रा. सू. गवई हे नेहमीच सभापतींऐवजी पत्रकारांना उद्देशून बोलतात. त्यांनी ह्या फलटणमधील हल्ल्याची व्हिडिओ फिल्म तयार केली आहे. पण ह्याचा अर्थ ह्या हल्ल्याची त्यांना पूर्वसूचना मिळाली होती असा होतो. दंगल टाळण्याऐवजी त्याची फिल्म घ्यायला गवई काय स्वतःला एफ. यू. रामसे समजतात की काय असा आम्हाला प्रश्न पडला.

मात्र ह्या दोन्ही ठिकाणच्या घटनांवर उत्तर द्यायला राज्यमंत्री जि. तु. महाजन अपुरे पडले. चोपड्याच्या वेळेस तर शंकररावांना सभागृहात येऊन न्यायालयीन चौकशीबाबत आश्वासन द्यावे लागले. महाजन जळगावचे असूनही त्यांचे मराठी अगदी खराब आहे. ‘दोन गटात कटकट सुरू झाल्याने (अटक करण्याची) क्रिया करावी लागली.’ अशा पद्धतीचे मराठी ते बोलतात. मुंबईतील बँकांवरील दरोड्याचा विषय निघाला तेव्हा सरकारने योजलेल्या उपायाची माहिती देताना बँकांच्या रखवालदारांना बंदुकात काडतुसे भरून सज्ज रहाण्याचे आदेश देण्यात आले आहेत असे ते म्हणाले. ‘पोलिसांना सकाळी की संध्याकाळी गस्त घालण्यास सांगण्यात आले ?’ ह्या प्रश्नाला उत्तर देताना ते गंभीरपणे म्हणाले, ‘दरोडेखोरांचे काय आहे की त्यांचे काम चोवीस तास चालू असते.’ यावर ‘मग सरकारचे चोवीस तास काय चालू असते ?’ असा प्रमोद नवलकरांनी प्रतिप्रश्न केला. असो.

बाकी महागाई वा गारपीट चर्चेतही विशेष दम नव्हता. मुंबई विद्यापीठाचा विषय दोन्ही सभागृहात उपस्थित करावयाचा

विरोधकानी प्रयत्न केला. परंतु खालच्या सभागृहात शकरराव जगताप आणि वर गुरूवर्य जयंतराव टिळक यांनी त्याना दाद लागू दिली नाही. राज्यपालाच्या वर्तनाची चर्चा ही सभागृहाच्या अधिकार कक्षेत येत नाही, ह्या आधारावर त्यानी याही चर्चेला नकार दिला.

तेव्हा अशा रीतीने एका आठवडयाचे हे अधिवेशन कोणत्याही स्वरूपाची दुर्घटना न घडता सुरळीतपणे पार पडले ह्याचे सर्व श्रेय नव्या हेडमास्तरानाच द्यायला हवे !

### □ पहिली वार्ताहर परिषद

नव्या मुख्यमत्र्यानी परवा मंत्रालयात आपली पहिलीवहिली वार्ताहर–परिषद घेऊन आपण स्वच्छ आणि कार्यक्षम प्रशासन देणार अस अभिवचन दिलं. आता हे जरा टू मचच झालं हं शकरराव स्वच्छ आणि कार्यक्षम बिर्यक्षम सगळ ठीकेय. पण तुमचं सरकार ड्यूरेबल आहे का ? मन्त्रिमडळ टाकाऊ चालेल. पण टिकाऊ हवं. दाऊद के बरसाती जूते जैसा.

राहिला स्वच्छ आणि कार्यक्षम प्रशासनाचा भाग. तर आमचा मुद्दा अगदी बेसिक आहे. शकरराव चव्हाण म्हणतात आमचं प्रशासन स्वच्छ अन् कार्यक्षम. शिवाजीरावही असंच म्हणाले होते. वसंतदादाचाही ह्याच दावा होता. अतुलेही म्हणत माय गवर्मेंट इज क्लीन अॅण्ड इफेक्टिव्ह...... कोणा कोणावर विश्वास ठेवायचा अन् कित्ती कित्ती वेळा ? सगळेजण असंच म्हणतात आणि वर्षभरात निघून जातात. आम्ही कित्ती, कित्ती कन्फ्युझ होतो ठाऊक आहे का शकरराव तुम्हाला ?

शंकररावांनी वार्ताहरांना असही सांगितलं की, सरकारचे अन् प्रेसचे सबंध सलोख्याचे आणि सौहार्दाचे असतात. म्हणजे कसे ? तर थोडक्यात, जुन्या जमान्यात पंतोजी मास्तराचे आणि उनाड विद्यार्थ्यांचे असत तसे.

गेल्या खेपेला म्हटल्याप्रमाणे शकरराव बरेचसे निवळलेत असं हल्ली जो तो म्हणतोय. म्हणजे ही जणू काय मत्रालयात हल्ली स्टाईलच झाल्येय. एका पत्रकाराच्या मते हा बदल म्हणजे शंकररावाच्या दिल्लीतील वास्तव्याचा परिणाम आहे

आता दिल्लीत बोलावून भल्याभल्याची भबेरी उडवण्याचं कसब दिल्लीपतीच्यात आहे हे आम्हालाही ठाऊक आहे. म्हणून शकररावाचा 'सेन्स ऑफ ह्यूमर' इतका तरारून येईल अस वाटलं नव्हत शुक्रवारच्या प्रेस वार्तालापात शकररावानी सगळी उत्तरं सहज आणि हसत हसत दिली.

¤

शंकरराव चव्हाण खूप बदललेत. पूर्वीचं धोतर–नेहरू जाकिट, गाधी टोपी जाऊन तिथे जोधपुरी कोट–पँट आलीये.

–अन् दुसरं पूर्वी शंकरराव हेडमास्तर होते. आता सुपरवायझर झालेत. बाय बाय...

### □ नवा पाटणकर काढा

पूर्वी पाटणकर काढा म्हणून एक काढा प्रसिद्ध होता. जुलाब, अपचन, पोटाची जळजळ वगैरे विकारावर हा पाटणकरी काढा म्हणजे अगदी रामबाण उपाय होता. आता नवा एक पाटणकरी काढा निघालाय. दुर्बोध सौंदर्यवादाचा अर्क या नव्या पाटणकरी काढ्यात असतो. सध्या हा काढा घेतल्याने अरुण खोपकर कसे टवटवीत दिसतात. ग्लॅक्सो बेबीसारखे !

खोपकराच गुरुदत्तावरचं पुस्तक आधीच आम्हाला बंपर गेल. त्यात पाटणकरी समीक्षेचा डोस. गुरुदत्तचं जाऊ द्या, आमची शोकांतिका होण्याची वेळ आली. पाटणकराच्या म. टा मधल्या समीक्षा लेखातला एक शब्द कळला असेल त्याने हा मजकूर वाचून पाटणकराच्या नव्या सौंदर्यवादी समीक्षा–काढ्याची एक बाटली फुकट घेऊन जावी खोपकरांनी त्यासाठी एक खास स्टॉल टाकलाय असं ऐकतोय.

खोपकरांनी गुरुदत्तची तुलना ऋत्विक घटकशी केलीये हे एक या अशा लिखाणात बर असत. कुणाचीही तुलना, कुणाशीही करायची. आम्ही पाहलाय कुठे त्या घटकबाबूंचा सिनेमा ? शंकर–जयकिशनवर लिहिताना मध्येच झंडेखाचा उल्लेख करायचा. कोण कुठला झडेखां. ऐकलाय कोणी अन् कुणाला माहिताय ?

पण दिग्दर्शकाच खरं यश कशात असतं ? पुन्हा पुन्हा ज्याचे सिनेमे पाहावेसे वाटतात तो खरा दिग्दर्शक की ज्याच्या सिनेमाच्या रिळाचे डबे एफ. टी. आय. आय. आणि एन. एफ. डी. सी. वगैरेच्या चर्चासत्रात चर्वितचर्वणासाठी चघळले जातात तो खरा दिग्दर्शक ?

खोपकरजी फॉर युवर इन्फर्मेशन, गुरूदत्तचे सिनेमे पुन्हा झळकताहेत. कोणताही पूर्वग्रह न ठेवता पुन्हा एकदा 'प्यासा' अन् कागज के फूल' पहा बालगधर्वांच्या शब्दात सागायचं तर 'उत्तम मजा येईल.' पाटणकरी काढा विसरून जाल.

— विष्णू जयदेव

## पुणे वार्ता

### □ बिच्चारे कुलपती की राज्यपाल ?

कोना प्रभाकर राव आता चागलेच अडचणीत सापडले आहेत. विद्यापीठ क्षेत्रात त्यानी केलेल्या हस्तक्षेपाबद्दल तीव्र नापसती सर्वत्र व्यक्त झाली आहे. केंद्रात हा प्रश्न उपस्थित झाल्यावर त्याची 'कुलपती' या पदाची ढाल सत्तारूढ पक्षाला उपयोगी पडली. आता पुणे विद्यापिठात विधी सभेने 'कुलपतीच्या' वाढत्या हस्तक्षेपाचा निषेध करणारी एक तहकुबी मोठ्या बहुमताने मंजूर केली त्यांच्या वाढत्या हस्तक्षेपाने विद्यापिठाची स्वायत्तता धोक्यात आल्याचे सूचनेत म्हटले आहे.

विद्यापिठाचा हा निषेध पुरेसा गभीर आहे. आता कोना प्रभाकर राव तो कितपत गांभीर्याने घेतात हा खरा प्रश्न आहे. लोकसभा–विधानसभेत उपयोगी पडलेली 'कुलपती' पदाची ढाल इथे टागती तलवार बनून डोक्यावर बसली आहे. एस्. एम् /डी. लिट्. प्रकरणी कोना प्रभाकर रावाच्या मुळे पुणे विद्यापीठ अडचणीत आले होते.

या निषेधाबरोबरच अपाल्या नातवाला नाशिकच्या एका महाविद्यालयात एम्. बी. ए अभ्यासक्रमासाठी मागच्या दाराने प्रवेश मिळवून दिल्याचा आरोपही रावावर करण्यात आला आहे. या आरोपातील तथ्यातथ्यता जमेस धरूनही कोना प्रभाकर रावाची 'कुलपती' म्हणून प्रतिमा उजळ होत नाही. सर्वच गोष्टी न्यायालयात सिद्ध व्हाव्यात का ?

पुणे विद्यापिठाच्या पदवीदान समारंभास कुलपती येणार नाहीत. परभणीच्या पूर्वनियोजित कार्यक्रमाचे निमित्त दाखवून ते

येत नाहीयेत. कदाचित मुंबई विद्यापिठाच्या पदवीदान समारंभावेळी झालेली निदर्शने त्याच्या नजरेसमोर असतील. शिवाय एस्. एम् /डी. लिट्. प्रकरणही आहेच.

हे जर खरे असेल तर असे लपून छपून रहाणे आता योग्य नाही. कोना प्रभाकर रावानी आपल्या 'कुलपती' पदाचा राजीनामा द्यावा हेच खरे. पण कुलपती पदाचा राजीनामा म्हणजे पर्यायाने राज्यपालपदाचाही राजीनामा अशा धर्मसंकटात ते सापडले आहेत.

### ☐ मर्ढेकर आणि गाडगीळ

२० मार्च १९८६ या बा. सी. मर्ढेकराच्या स्मृतिदिनी महाराष्ट्र साहित्य परिषदेने मुंबईच्या झुनझुनवाला महाविद्यालयातील मराठीच्या प्राध्यापिका सौ सुधा जोशी याचे एक व्याख्यान आयोजित केले होते. विषय होता 'मर्ढेकर आणि गाडगीळ'. कथा आणि कविता या दोन विभिन्न साहित्य प्रकारात गाजलेल्या गगाधर गाडगीळ आणि बा. सी. मर्ढेकर याच्या साहित्यातील साम्य स्थळाचा शोध घेण्याचा प्रयत्न या व्याख्यानात सौ. सुधा जोशी यानी केला.

एकमेकाना समकालीन असलेले हे साहित्यिक आपापल्या साहित्यप्रकारात नवतेचे अध्वर्यु मानले जातात. गगाधर गाडगीळानी मराठी लघुकथेत आमूलाग्र क्राती घडवली तर मर्ढेकरानी कवितेतील सर्व पारपारिक संकेताना आव्हान दिले. सुधा जोशी या दोघानाही बीजधर्मी साहित्यिक मानतात. याच्या लेखनातून नव्या शक्यता आणि क्षमता निर्माण झाल्या असे त्या म्हणतात. अनुभव आणि अभिव्यक्ती या दोहोत त्यानी क्रांती घडवली.

महायुद्ध आणि औद्यगीकरणाने मानवी जीवनात सास्कृतिक उलथापालथ घडली. एक वेगळे भावविश्व असलेला नवा समाज तयार झाला आणि त्याचे प्रतिबिंब याच्या साहित्यात उमटले या नव्या समाजाचे ताण तणाव, त्याच्यामध्ये निर्माण झालेली मूल्यहिनतेची जाणीव, या समाजाचे दभस्फोटी चित्रण त्यानी केले आहे एकाचवेळी करूणा आणि उपहास आणि अशाच प्रकारच्या आंतरविरोधी भावना दाखवणारी नवी शैली त्यानी मराठी साहित्याला दिली.

सौ. सुधा जोशीचे विवेचन बाधेसूद आणि बदिस्त होते या दोन्ही साहित्यिकांच्या साहित्यातील उदाहरणे ठळकपणे देऊन त्यातील साधर्म्य त्यानी स्पष्ट केले. या दोन साहित्यिकाचा एकत्र विचार हा प्रयोगही वेगळाच आहे. कथा आणि कविता या दोन साहित्यप्रकारांची आपापली बलस्थाने आणि मर्यादा आहेत. हे मान्य करूनही या दोघाना एकत्र आणणारे असे वाङमयीन सूत्र सुधा जोशीनी माडले.

### ☐ लघुउद्योग अडचणीत

गेल्या महिन्यात घोषित झालेल्या केंद्रीय अदाजपत्रकात अबकारी कराविषयी नव्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. या तरतुदीमुळे लघुउद्योगाना असलेल्या सवलती कमी करण्यात आल्या आहेत. पूर्वी लघुउद्योगासाठी वीस लाख रुपयांच्या उलाढालीची सवलत होती. म्हणजे एका आर्थिक वर्षात वीस लाखाहून अधिक उलाढाल झाल्यासच अबकारी कर लागू होत असे. आता ही मर्यादा साडेसात लाख रुपयापर्यंत खाली आणण्यात आली आहे शिवाय या करासंबंधात दुहेरी व्यवस्था करण्यात आली आहे. आधीच अबकारी करातील तरतुदी क्लिष्ट आणि गुतागुतीच्या असताना त्यात गुतागुत अधिकच वाढली आहे. अनेक लघुउद्योगाना या तरतुदीची कल्पनाच नसल्यामुळे सपूर्ण मार्च महिनाभर उलाढाल बद ठेवावी लागली आहे.

या साऱ्या प्रकाराचा निषेध करण्यासाठी लघुउद्योजकांचा एक मोर्चा शुक्रवारी (दि. २१) एक्साईज् ऑफिसवर काढण्यात आला होता. याच दिवशी पुणे परिसरातील लघुउद्योग बंद ठेवण्यात आले होते. या बदला भरघोस प्रतिसाद लघुउद्योजकानी दिला. गुरुवारी मराठा चेंबरमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत या कार्यक्रमाची माहिती बी. एन्. शहा यानी दिली होती.

सध्याच्या भाववाढीच्या चक्रात उत्पादित वस्तूचे भाव वाढत असल्याने सवलतीची मर्यादा वीस लाखाहून साडेसात लाखापर्यंत खाली आणणे हा विरोधाभास आहे असे मत व्यक्त करण्यात येत आहे. हा आर्थिक बोजा लघुउद्योगाना पेलता येणार नाही व पर्यायाने मोठी भाववाढ होईल असे वाटते.

— मनोहर सोनवणे

सांस्कृतिक नागपूर

# भीम बेटक्यातील अद्भूत जग!

गेले तीन दिवस नागपूर 'वाकणकरमय' झाले होते. वाकणकर म्हणजे उज्जयिनीचे प्रख्यात इतिहास संशोधक आणि जागतिक कीर्तीचे पुरातत्ववेत्ते इन्स्टिटयूट ऑफ रॉक आर्ट ह्या सस्थेचे डायरेक्टर. भारत सरकारने ज्यांचा पद्मश्री देऊन गौरव केला असे इतिहाससशोधक. सध्या 'वैदिक सरस्वती नदीचा शोध' हा एकच विषय त्याच्या डोक्यात घोळतो आहे. दिनाक १३ मार्च रोजी हिंदू धर्म सस्कृती मदिराने त्याचे एक भाषण 'सरस्वती नदीचा शोध' यावर आयोजित केले होते. त्याला इतकी गर्दी झाली की, आयोजकांना वेळेवर मोकळ्या मैदानावर सभा घ्यावी लागली. असे श्री. वाकणकर आपण सशोधनाकडे कसे ओढले गेलो आणि मध्य प्रदेशातील बरखेड्याजवळ आपल्याला प्रागैतिहासकाळातील गुहा कशा सापडल्या याचा वृत्तात ज्यावेळी सागतात, त्यावेळी श्रोते आश्चर्याने गुग होतात. शनि. दि. १५ मार्च रोजी येथल्या माऊटनिअरिंग क्लबतर्फे त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या व्याख्यानात वाकणकरानी सर्व श्रोत्याना भीमबेटक्यातील अद्भूत जगात नेऊन सोडले. ते म्हणाले, १९७४ मध्ये ऑगस्ट महिन्यात भोपाळहून मला इटारसीला जावयाचे होते; परतु एक्स्प्रेसचे तिकीट मला मिळाले नाही. म्हणून मी पॅसेंजरच तिकीट काढले. दुपारी चारचा सुमार होता. पश्चिमेच्या खिडकीशी मी बसलो होतो गाडीने अब्दुल्लागज सोडले. तिथून मोठे वळण लागते व गाडीचा प्रवास पहाडातून सुरू होतो. हा सर्व प्रवास विंध्य

पर्वतातून होतो हे तुम्हाला माहीत आहेच. त्यावेळी समोर पाहिले तर प्रचड Disected Rocks. मधूनमधून हे खडक तुटलेले. खडक का तुटले ? या खडकाचा आकार असा का? माझ्या मनात प्रचड खळबळ निर्माण झाली. पुढच्याच स्टेशनला म्हणजे बरखेड्याला मी उतरून गेलो. त्या दिवशी मी तिथेच उतरून रात्रभर प्लॅटफॉर्मवरच झोपून गेलो. दुसरे दिवशी बरखेड्याच्या स्टेशन मास्तरने जगल भयंकर आहे, कोणाची सोबत घेतल्याशिवाय जाऊ नका असा सल्ला दिला; परंतु बरोबर कोणाला नेणार ? म्हणून मी एकटाच ५ मैल आत चालत गेलो, एका घळीतून, वेलीच्या जाळ्या बाजूला सारत सारत एका गुहेत शिरलो तर काही सूर्याची किरणे समोरच्या भिंतीवर पडलेली होती आणि त्या प्रकाशात अनेक भित्तीचित्रे चमकत होती! कित्येक तासपर्यंत मी ती भित्तीचित्रे पहात बसलो ! मला ह्या गुहांचा इतका मोह पडला की, मी पलिकडे त्या ठिकाणी काही वर्षे मुक्कामच केला. माझ्या काही विद्यार्थ्यांना मी मदतीला बोलावून घेतले आणि आम्ही सर्वांनी मिळून अशा ७६४ गुहा शोधून काढल्या. ह्या प्रत्येक गुहेत आम्हाला प्रागैतिहासिक कालातील भित्तीचित्र आढळली. त्या प्रत्येक चित्राचा अभ्यास करून मी त्याचा एक ग्रंथ तयार केला भीमबेटक्यातील हे प्रचंड प्राचीन ऐश्वर्य पाहून सारे जग स्तिमित होऊन गेले. त्यावरच भारत सरकारने मला पद्मश्री ही पदवी दिली. हिंदुस्थानात ह्या चित्राची मी दोन प्रदर्शने भरविली परतु येथल्या पुरातत्त्ववेत्त्यांनी त्याकडे विशेष लक्ष दिले नाही. म्हणून मी रोमला गेलो आणि त्या ठिकाणी मी माझे प्रदर्शन भरविले आणि तिथल्या वृत्तपत्रातून प्रशंसेचे रकानेच्या रकाने लिहून येऊ लागले त्यावेळी हिंदुस्थानातले पुरातत्त्ववेत्ते जागृत झाले आणि मला म्हणाले की अहो, तुमच्याजवळ इतका अद्भूत खजाना असेल याची आम्हाला कल्पना नव्हती ! मीही त्याना म्हणालो की, युरोपकडून आले की तुम्हाला सर्व गोष्टी मान्य होतात ! मीही त्या नियमाला अपवाद कसा असेन ? अहो, रोमला मी जे प्रदर्शन माडले तेच प्रदर्शन हिंदुस्थानातही मांडले होते; परंतु त्याला तुम्ही कुठे मान्यता दिली ?'

एका श्रोत्याने विचारले, 'ह्या गुफा शोधताना जंगली श्वापदानी तुम्हाला त्रास दिला नाही ?' वाकणकर पुन्हा भूतकाळात शिरले. ते म्हणाले, 'पुष्कळवेळा तर वाघ आठ फुटावर असायचा. परंतु आम्ही जंगलातल्या श्वापदांचे कायदे मोडले नाहीत तर त्यानीही आम्हाला कोणतीही तकलीफ दिली नाही.' असे हे वाकणकर ! प्रागैतिहासाचा वेड घेतलेले ! इतिहासपूर्व १० लक्ष वर्षांपासून ते थेट १३ व्या शतकापर्यंत सलग असा इतिहास भीमबेटक्याला उपलब्ध होतो. म्हणून भीमबेटक्याला पुरातत्व इतिहासामध्ये अतिशय महत्त्व प्राप्त झाले असे ते सागत होते. सर्व जगातील इतिहास सशोधक आता भीमबेटक्याला येतात. ह्या भीमभेटक्याला एखादा मानवी सागाडा सापडावा म्हणून त्यांनी अनेक वर्षे अभ्यास घेतला होता. परंतु त्यात त्यांना निराशाच प्राप्त झाली. परंतु सोनकिया नावाच्या एका नागपूरच्या माणसाला अचानक ह्या भीमबेटक्याच्या प्रदेशात एक मानवी सागाडा सापडला. 'केला तुम्ही त्याचा सत्कार ?' हरिभाऊ वाकणकरानी विचारले. श्रोते काय उत्तर देणार ?

वाकणकरानी पुरा–अवशेष शोधण्याकरिता जगातली जेव्हढी म्हणून उत्खनने असतील तेव्हढी पाहिलेली आहेत. ते आफ्रिकेत गेलेले आहेत, नायजेरियात गेलेले आहेत. इतकेच काय पाकिस्तानातही गेलेले आहेत. आफ्रिकेतील गुफा पाहण्याकरिता एक चमू जाणार होती त्यात वाकणकरानी प्रवेश करून घेतला. त्याचा प्रमुख होता एक युरोपियन. त्याने ऐनवेळी वाकणकरांना नेण्याला नकार दिला. वाकणकराना तो मोठा अपमान वाटला. ते त्या युरोपियन माणसाला भेटले आणि विचारले, मला चमूमध्ये न घेण्याची खरीखुरी कारणे सांग. तेव्हा तो म्हणाला की तुम्ही शाकाहारी आहात. गुफा पाहण्याकरिता तुम्ही निघाल त्यावेळी खाण्यापिण्याची प्रचड सामग्री तुम्ही बरोबर घ्याल. आणि मला तर Travel Light पाहिजे. वाकणकरानी सांगितले की उद्या तुम्ही जी सामग्री घ्याल ती आणि माझी सामग्री पहा. माझी सामग्री प्रवास करण्याला हलकीफुलकी वाटली तर तुमच्या चमूत मला घ्या दुसरे दिवशी वाकणकरानी काय करावे ? त्यानी कणकेच्या 'बाट्या' तुपात तळून सोबत घेतल्या. गळ्यात अडकवलेल्या पिशवीतच त्यांनी ही खाण्याची सामग्री सोबत घेतली. निघण्याची वेळ आली त्यावेळी युरोपियन लोकानी मोठमोठ्या टोपल्या खाण्याच्या पदार्थांनी भरून घेतल्या चमूचा युरोपियन नेता म्हणाला, 'वाकणकर, तुमच्या खाण्याच्या Baskets कोणत्या ?' वाकणकर म्हणाले, 'माझ्या गळ्यात अडकविलेल्या पिशवीतच माझी खाण्याची सामग्री आहे.' तो युरोपियन इतका खूष झाला की वाकणकराना त्या चमूत ताबडतोब प्रवेश मिळाला. वाकणकराच्या ह्या सर्व भाषणांना स्लाईडसूची जोड देण्यात आली होती. त्यामुळे हा सर्व प्रवास अद्भुतच ठरला. एकेक गुहेतील सौंदर्य पहाण्यासारखे होते. खडकाचे काय प्रचंड आकार होते ! त्या खडकावर फक्त भीमच बसू शकेल एवढे त्याचे आकार होते ! म्हणूनच तिथल्या आदिवासीनी ह्या स्थळाला भीमबेटका हे नाव दिले असे वाकणकरांनी सागितले.

अशी वेड घेऊन उभी असलेली माणसे पाहिली की मन आदराने आपोआपच भरून येते !

— शरच्चंद्र


मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

## सांस्कृतिक डोंबिवली

# व्यंगचित्र
## एक प्रभावी हत्यार

पुणे येथे 'कार्टुनिस्टस् कबाईन' च्या वतीने शुक्रवार दि. २८-३-८६ ते रविवार ३०-३-८६ असे तीन दिवस व्यंगचित्र-कारांचे ( बहुधा दुसरे ) समेलन भरत आहे. आज अखिल भारतीय कीर्तीचे जे व्यंगचित्र-कार आहेत, त्यांची प्रसिद्धी आहे ती प्रामुख्याने राजकीय विषयावरचे भाष्यकार व्यंगचित्रकार म्हणून. पण राजकारण हे आपल्या समाजजीवनाचे एक अग आहे. ह्या कलावतांचा कुचला इतर विषयाकडे कमी वेळा वळतो. त्या तुलनेने महाराष्ट्रातील व्यगचित्रकार केवळ राजकारण हेच आपले क्षेत्र समजत नाहीत. त्याची दृष्टी जीवनातील अनेक क्षेत्रातील विसगती टिपताना दिसते. असे मानले जाते की, जेव्हा शस्त्रास्त्रे कुचकामी, निरुपयोगी बनतात तेव्हा वृत्तपत्र प्रभावी ठरते. वृत्तपत्रातील हजार शब्दाच्या लेखाने किंवा अग्रलेखाने जे साध्य होणार नाही, ते कार्य एक छोटेसे दहा रेषाच्या सहाय्याने काढलेले व्यगचित्र करू शकते. वाचक-प्रेक्षकाच्या अत.करणाला जाऊन भिडण्याचे, त्याच्यावर जबरदस्त परिणाम करण्याचे, तेही त्याला हसवीत, सामर्थ्य व्यगचित्रात असते आणि ज्या व्यक्तीला त्या व्यगचित्रात हास्यविषय केले असते, त्यालाही विचाराला म्हणजे सद्विचाराला प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य असते. व्यगचित्रे व्यक्तीवर असतात तशी ती प्रवृत्तीवरही असतात. कृतीवर आधारीत असतात तशी ती उक्तीवरही असतात. चुबन आणि व्यगचित्र ह्याच्यात साम्य असते, आहे. दोन्ही सशब्द अणि नि:शब्दही असतात अर्थात जे नि.शब्द ते अधिक चांगले हे सांगायला नकोच.

नियतकालिकातून येणारी व्यगचित्रे व्यापक आवाहन करणारी असतात. पण व्यंगचित्र ह्या अत्यत प्रभावी हत्याराचा उपयोग स्थानिक प्रश्न आणि समस्या माडण्यासाठी आणि सोडविण्यासाठीही करता येतो. तसा जाणीवपूर्वक, सातत्याने प्रयत्न केल्यास त्यात काही प्रमाणात यशही येते, जनमत जागृतीही साध्य होते हे डोबिवलीत घडले आहे श्री. श्रीकात टोळ ह्याच्या विकास वाचनालयातर्फे अनेक मित्राच्या सहाय्याने 'विकास सास्कृतिक केंद्र' चालविले जाते. त्या केंद्रातर्फे अनेक उपक्रम होतात काही काळापूर्वी 'मॅड कॉर्नर' नावाचा एक उपक्रम सुरू केला होता. दर शनिवारी सध्याकाळी शहरातील विविध समस्यावर, अडचणीवर आधारीत अशी व्यगचित्रे लावली जात. त्याचे स्वरूप डोबिवलीकराकडून, डोंबिवलीच्या प्रश्नावर डोबिवलीकरांविषयी असे होते. हे काम सौ. मेधा गुळवणे ह्या ( महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री व्यगचित्रकार की दुसऱ्या असा वादही दै. लोकसत्तामध्ये येऊन गेला. अशा ख्यात· नाम ) चित्रकार-व्यगचित्रकार कलावताने केले. ती व्यगचित्रे पाहण्यासाठी दर शनिवारी आणि नतरही बरीच गर्दी जमत असे

प्रसिद्ध चित्रकार श्री मुकुदराव तळवलकर ह्यानीही 'डोबिवली ऑलिपिक' नावाचे एक मोठे-लहान व्यंगचित्रे असणारे-व्यग चित्र तेथेच लावले होते. पुण्याच्या प्रदर्शनात ते ठेवले आहे. असे चित्र लावले आहे ही बातमी तरुण भारतमध्ये प्रसिद्ध झाली. ती बातमी त्यावेळचे महाराष्ट्र टाईम्सचे सह-सपादक श्री. दि. वि. गोखले ह्याच्या वाचनात आली. त्यानी श्री. मुकुदरावाकडून ते चित्र मागवून घेतले आणि म· टा च्या एका अकात छापलेही. ह्या व्यगचित्राचा अतिशय चागला परिणाम नगरपालिका, वीज मडळ इ. च्या अधिकाऱ्यावर झाला. त्या व्यगचित्राची लगेच दखल न. पा. उपायुक्त, आयुक्त, जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्त इ. नी घेतली. रोग मुळातून नाहीसा झाला नाही; पण काही काळ का होईना गावातून जाणे-येणे ( वीजप्रवाहाचेही ) सुसह्य झाले. ह्याचा अर्थ असा की जे काम मोर्चा काढून, निदर्शने करून, घेराव घालून साध्य होईलच असे नाही. ( पोटासाठी बारा तास बाहेर असणारी ही माणसे जमवायची तरी कशी ? ते काम आपल्या व्यगचित्रानी व्यगचित्रकार करू शकतो हे सिद्ध झाले. अशी ही प्रभावी कला आहे. विनोद सहेतूक असतो तसा निर्हेतूकही असतो. केवळ हास्यनिर्मितीसाठी आनदासाठी जन्माला आलेला विनोद आणि हास्यचित्रे ही केव्हाही अधिक चागली; पण व्यग, उणीवा, दोष दाखविण्यासाठी ज्या चित्राचा जन्म होतो त्याना कमी लेखून कसे चालेल ? मराठी विनोदाची परपरा ही दोन्ही प्रकारची आहे हे आपल्याला ठाऊकच आहे. ह्या साऱ्या समस्या, अडचणी फक्त डोबिवलीकराच्याच वाटयाला आल्या आहेत असे नाही. तशाच स्वरुपाच्या कमीअधिक अडचणी प्रत्येक लहानमोठ्या गावातील नागरिकानाही सहन कराव्या लागत आहेत. डोबिवलीकरानी आपला विरोध अशाही मार्गाने प्रकट केला आहे. इतर गावातील, शहरातील चित्रकारांनाही हे काम करता येईल. त्यासाठीही हा प्रपच आहे. असे हे प्रभावी हत्यार चालविणाऱ्या दोघाना भेटलो. त्या भेटीतून जे हाताला लागले ते इथे हातावेगळे करीत आहे.

पुरुषांनी वर्चस्व गाजविलेली अनेक क्षेत्रे आता स्त्रिया काबीज करीत आहेत. डोबिवली हे शहर तर स्त्रियाचे वर्चस्व असणारे समजले जाते. त्यामुळे व्यंगचित्रक्षेत्रातील पुरुषी मिरासदारी कमी करणारी स्त्री डोंबिवलीत असली तर नवल नाही ? छदाने आणि पेशाने कर्मशियल आर्टिस्ट असणाऱ्या सौ. मेधा गुळवणे सागू लागल्या. 'व्यगचित्रकला हा विषय माझ्या माहितीप्रमाणे अजूनही कोणत्याच कलाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात नाही. मी शिकले तेव्हा तरी नव्हताच. ( महाराष्ट्राची विनोदाची आणि व्यगचित्रकलेची परपरा दीर्घ आहे आणि अभिमानस्पदही आहे; पण ज्ञानकोश, सस्कृतिकोशमध्ये– विश्वकोशाचे काम अजून पुरे व्हावयाचे आहे– ह्या विषयाला किती शब्द आले आहेत आणि एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकामध्ये 'कॅरीकॅचर्स ॲण्ड कार्टून्स' ह्या सदरात सचित्र अशी किती पाने दिली आहेत ते जिज्ञासूनी एकदा नजरेखालून घालावे ) प्रत्येकाने ही कला एक छंद म्हणूनच जोपासली आहे. मी जशी कलावत आहे तशीच जागरूक नागरिकही आहे. गावातील सारी परिस्थिती मर्यादेपलिकडे (डेड एण्ड) गेल्यानतर मनाला निराशा तरी येते किंवा त्या साऱ्याबद्दलची आपली प्रतिक्रिया चमत्कारिकपणे, तिरकसपणे, गमतीदारपद्धतीने

तरी व्यक्त करावीशी वाटते, वाटली. डोंबिवलीतील रस्ते, गटारे, भटकी गुरे, वारवार गायब होणारा वीजप्रवाह इत्यादीबद्दल मला जे वाटले ते मी व्यगचित्राद्वारे प्रकट केले. ही चित्रे काढल्यानतर, मला जे जाणवते, भावले (फील झाले) ते कोणालातरी सागावेसे वाटत होते ते सागून झाल्याचा आनद वाटला.'

'मॅड कॉर्नर' ह्या सार्थ नावाची ही चळवळ (चळवळच म्हणायला हरकत नाही) सुरू केली. त्यात अनेक विषयावरची व्यगचित्रे होती. डोंबिवलीत (इतरत्रही) वीज जाणे ही नित्याची बाब आहे डोंबिवलीतील कोणत्याही जाहीर कार्यक्रमात आभार मानणारा 'वीजप्रवाह खडित होऊन रंगाचा बेरग झाला नाही म्हणून वीज मडळाचेही मी आभार मानतो. असे म्हणतो.' आणि ह्या वाक्याला श्रोते मनापासून हसून आणि टाळ्यांचा कडकडाट करून आपली खुशी (म्हणजेच वीजमडळाबद्दलची नाखुशी) व्यक्त करतात. त्यामुळेच की काय, वीज मडळावरची त्याची व्यगचित्रे अधिक आहेत आणि बोलकीही आहेत. त्यातील एकात 'मेणबत्ती उत्पादक सघाचा 'धन्यवाद सोहळा' आहे.' वीज मंडळामुळे मेणबत्त्याचा अफाट खप झाला म्हणून मडळाचे आभार मानले आहेत. अधिकाऱ्यांचा हारतुरे देऊन सत्कार केला आहे. दुसऱ्या एका चित्रात 'लॅम्प कॉर्नर' नावाचे दुकान चालत नाही, म्हणून रॉकेलचे कंदील विक्री दुकान सुरू करतो व ते जोरात म्हणजेच फायद्यात चालले आहे हे गिऱ्हाईकाला सागतो आहे. डोंबिवली नगरपालिका (आता कल्याण म. न प. चा डो विभाग) म्हणजे व्यगचित्रकारांना, त्यांच्या प्रतिभेला विषय पुरवणारी एक खाण आहे, एक अक्षय भाताच आहे. त्यामुळे न. पा. वरीलही व्यगचित्रे अनेक आहेत त्याशिवाय मध्यरेल्वेच्या लोकलमधील गर्दी, लागणारा विलब ह्या विषयावरही व्यंगचित्रे आहेत. टेबला 'खालून' खाणारे व टेबला 'वरून' घेणारे (दोन्हीचे दर वेगवेगळे) ते खा व खाते त्यानी चितारले आहे. त्यांचे एशियाड सामने 'ए–शियाड' अशी याडचाप चित्रे दाखविणारे आहेत गावातील नागरिकांचा ज्या प्रश्नाशी संबंध येतो त्या प्रश्नावरची व्यगचित्रे अधिक प्रमाणात आहेत. त्यात पोलीस खात्यावरचे एकही व्यगचित्र दिसले नाही. ही व्यगचित्रे पाहिलेला एक मित्र म्हणाला, 'डोंबिवली गावातील साऱ्या समाजविघातक कृत्ये करणाराना पोलिसानी अभय दिले आहे आणि पत्रकार म्हणून मिरवणाऱ्यानी ह्या पोलिसांना सरक्षण दिले आहे की काय असे वाटण्याजोगी परिस्थिती गावात दिसते आहे. ह्या व्यगचित्रकर्तीनेही पोलीस हा विषय सफाईने टाळला आहे' ते आठवले. त्यामुळे मी हा प्रश्न सौ. गुळवणे ह्याना विचारला. त्या म्हणाल्या, 'मला घरात व घराबाहेर जाणवणारे, छळणारे प्रश्न आहेत, ते मी माडले आहेत मी पांढरपेशावर्गातील आहे. मला पोलीसखाते आणि त्याची निष्क्रियता हा प्रश्न जाणवला नाही म्हणून तो व्यगचित्रात आला नाही.'

व्यगचित्रांवरच्या गप्पा मारताना अर्थातच स्त्रियाचे विनोदी लेखन, स्त्रियांना विनोद कळतो का? करता येतो का इ. प्रश्नावरही गप्पा झाल्या. सौ. गुळवणे सागू लागल्या, 'खरे म्हणजे स्त्रियाच अधिक परिणामकारक अशा तऱ्हेने खोचक, बोचक, उपरोधिक बोलतात. त्यांच्या लक्षात विसंगती चटकन् येते. कमीतकमी शब्दात अधिकाधिक अर्थ व्यक्त करण्याचे, सूत्ररूपाने बोलण्याचे सामर्थ्य स्त्रियांच्या ठिकाणीच आहे. त्याच्या तोडी असणाऱ्या म्हणी हे त्याचे चांगले उदाहरण आहे. स्त्रियाना विनोद कळतो आणि करताही येतो. स्त्रिया विनोदी लेखन करीत नाहीत हा त्याचा दोष नाही. ती त्यांच्यातील उणीव तर निश्चितच नाही. तो गुण त्याच्या ठिकाणी नाही असे समजणे चुकीचे आहे. स्त्रिया विनोदी लेखन करीत नाहीत किंवा व्यंगचित्रे काढीत नाहीत हा खरे म्हणजे पुरुषजातीचाच पराभव आहे. पुरुष ज्या समाजावर आपले वर्चस्व राखून आहेत. त्या समाजाचाच हा पराभव आहे समाजाच्या दडपणामुळे, लोक काय म्हणतील ह्या भीतीमुळे स्त्रिया अशा मार्गाने आपला आविष्कार करीत नाहीत. पुरुष (आणि स्त्रियाही) त्यांच्या आत्माविष्काराच्या आड येतात. खरे सागायचे तर त्यामुळे सबध समाजच दुबळा, दरिद्री होत आहे. स्त्रियाची ही उणीव आहे, अशी हेटाळणी करणाऱ्याच्या हे लक्षातच येत नाही' ह्या शब्दात त्यानी आपली प्रतिक्रिया मांडली.

त्यानंतर श्री. तळवलकर ह्याना भेटलो. व्यंगचित्र हा पाहण्याचा आणि पाहता पाहता आनद घेण्याचा विषय आहे इथे नाइलाजाने वर्णनावरच भागवावे लागते आहे. त्या व्यगचित्राची ओळख व्हावी म्हणून शब्दाचे (दुबळे) सहाय्य घेत आहे. त्यानी 'डोंबिवली ऑलिंपिक' असे शीर्षक देऊन डोंबिवलीकर नागरिकाची घरात आणि रस्त्यावर कशी दशा दशा झाली आहे, होत आहे हे दाखवून दिले आहे. ऐन पावसाळ्यात घरातील नळाना पाणी नसल्यामुळे तोडचे पाणी कसे पळते हे दाखविले आहे त्यानी आपल्या ह्या व्यंगचित्रातून (१) उंच उडी स्पर्धा : रस्त्यावर पाणीच पाणी झाल्यामुळे हातात एक काठी घेऊन उडी मारणारा नागरीक; (२) पोहण्याची स्पर्धा . रस्त्यावर साचलेल्या पाण्यातून पोहत जाणारा जलतरणपटू; (३) अडथळ्याची शर्यत : रस्त्यावर असणाऱ्या दगडाच्या ढिगावरून, खड्ड्यावरून मोटर सायकलीने उड्डाण करीत जाणारा स्वार; (४) वजन उचलणे स्पर्धा : घराबाहेर सर्वत्र तळेच तळे झाले आहे पण नळाला पाणी नसल्यामुळे विहिरीवरून दोन हातात बादल्या भरून आणणारा, आपण जणू काही ऑलिंपिकमधील वजन उचलण्याच्या स्पर्धेतील एक आहोत अशी कल्पना करतो आहे. अशी नाना रंग दाखविणारी ही डोंबिवली ऑलिंपिक व्यगचित्रे अनेकाना आवडली. 'रस्त्यावरील चिखलातून मेटाकुटीने वाट काढीत जात असताना एका चित्रकाराच्या मनातील व्यंगचित्रकार जागा झाला' असे श्री. तळवलकर म्हणाले. 'त्याशिवाय सा. विवेकने डोंबिवली विशेषाक काढला. त्याच्या मुखपृष्ठावरही अशाच व्यथा व्यंगचित्राच्या सहाय्याने माडल्या' ते पुढे सांगू लागले. 'लोकाच्या मनात जे ठुसठुसत होते त्याला मी व्यगचित्रबद्ध केले. अनेक वेळा लोकाना नेमके काय हवे, होत आहे ते कधी कधी सागता येत नाही. ते काम मी माझ्या कुंचल्याच्या सहाय्याने केले. त्यामुळे 'ऑफन थॉट बट नेव्हर सो वेल एक्स्प्रेस्ड' असेही झाले असावे.'

डोंबिवलीतील सांस्कृतिक कार्यक्रमांना

नित्य सोबत येणारा एक मित्र म्हणाला, 'ह्या शहरात गुन्हेगारीचा ऑक्टोपस सर्व बाजूनी विळखा घालीत असताना; ध्वनि-प्रदूषण, वायूप्रदूषण आणि जलप्रदूषण पोखरीत असताना आणि विविध सरकारी आणि निमसरकारी कार्यालयाची निष्क्रियता शिगेला पोहोचल्यामुळे दैनंदिन जीवन असह्य होत असताना हा डोंबिवलीकर अशा सास्कृतिक कार्यक्रमात ज्या तऱ्हेने रस घेत आहे ते पाहून असे वाटू लागले आहे की ह्या नव्या प्रकारच्या अफूच्या गोळ्या तर ह्या समाजाने निर्माण केल्या नाहीत ना? आपले विवचनांनी भरलेले सारे वास्तव जीवन विसरण्यासाठी ह्या कार्यक्रमाच्या गुगीत ही माणसे रममाण होत नाहीत ना? पण ह्या मॅड कॉर्नरसारख्या उपक्रमांनी असे वाटते की कलावत जर इतके जागरूक आहेत तर नागरिकही हे सारे जागेपणीच करीत असणार. ती गुगी नसून ती त्याची भूकच आहे असेही वाटू लागते.' त्या मित्राच्या बोलण्यातील तथ्य तपासून पहायला पाहिजे. पण एवढे मात्र खरे की व्यगचित्र हे माध्यम अत्यत नाजूक पण प्रभावी असे आहे ते अत्यत लवचिकही आहे. त्याचा यथायोग्य वापर इतरानाही करावासा वाटावा ही इच्छा

विकास सास्कृतिक केंद्र आणि कलाद्वीप ह्या दोन्ही सस्थाच्या कार्यकर्त्यांच्या मनात पुढील व्यंगचित्रकाराचे समेलन डोंबिवलीत भरवावे असे आहे. कार्टुनिस्टस् कबाईनचे पदाधिकारी डोंबिवलीकराचे हे आमत्रण स्वीकारतील का?

### □ विविधभाषिक बेटे

मागील आठवड्यातील एक दखल घेण्याजोगा कार्यक्रम होता 'केशव, चित्रा, रेखा आणि सुनिल' ह्याच्या पेंटिंग्ज आणि क्राफ्टसच्या प्रदर्शनाचा. ह्या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री. मुकुदराव तळवलकर ह्या प्रसिद्ध चित्रकाराने केले. धर्मयुग आणि महाराष्ट्र टाइम्स ह्या नियतकालिकांतून त्यांची चित्रे, रेखाचित्रे आणि व्यगचित्रे जाणकाराच्या पसंतीस उतरली आहेत. डोंबिवलीकर असल्यामुळे असल्या कार्यक्रमाना तेच उद्घाटक, अध्यक्ष किंवा प्रमुख पाहुणे असतात. त्यामुळे त्याचे मित्र त्याना गमतीने डोंबिवलीचे अनत काणेकर म्हणतात. केशव, चित्रा इ. ही तरुण कलावत मंडळी आपले पहिलेच नाव लावतात, आपल्या कलामाध्यमात वेगवेगळे प्रयोग करतात आणि आपले तारुण्य, नवेपण, वेगळेपण स्पष्ट करतात. पण कलाप्रदर्शनाचे उद्घाटन मात्र अगदी पारंपारिक पद्धतीने ज्योत प्रज्वलन, गणेशमूर्तीला हार इ — करायची तयारी सज्ज ठेवतात व उद्घाटकही त्याच भक्तिभावाने ते सारे सोपस्कर करतात नव्या पिढीने उद्घाटनाची नवीन पद्धत का शोधू नये?

उद्घाटनाची गडबड, प्रदर्शनाचा पहिलाच दिवस असल्यामुळे म्हणा किंवा श्री. केशव ह्याचा अपवाद वगळता अशा प्रदर्शनाची सवय नसल्यामुळे प्रेक्षकाना समजावून सागणे, कोणत्या कलाकृती कोणाच्या आहेत हे सागणे जमले नसावे. श्री. केशव हे आध्रप्रदेशातील तेलगू भाषिक आहेत. त्याची वास्तव शैलीतील (घोडा, पक्षी, नर्तकी इ) आणि आधुनिक शैलीतील अशी चित्रे त्याची कलेतील प्रगती दाखविणारी आहेत. त्याशिवाय हल्ली फॉईल पेंटिंग हा प्रकार लोकप्रिय होत आहे. त्याकडेही अनेक कलावंत वळले आहेत. पचवीस गेजच्या पुढील गेजच्या पत्र्याला फॉईल म्हणतात. ही फॉईल तावा, पितळ, टिन अथवा ॲल्युमिनियमची असते ह्या प्रदर्शनात ॲल्युमिनियम फॉईलवरची चागली चित्रे लक्ष वेधून घेत होती. पण ती कोणाची हे कळले नाही त्याप्रमाणे थर्मोकोलच्या विविध वस्तू ह्या प्रदर्शनाची रंगत वाढवीत होत्या. त्याशिवाय वाळूच्या सहाय्याने बनविलेली अनेक चित्रे, फ्रेम्स होत्या. ही तरुणमडळी आपला कलाविष्कार विविध माध्यमातून प्रकट करताना पाहून प्रेक्षकांना एक वेगळाच आनंद मिळत असल्यास नवल नाही. असे हे विविधतेने आणि नाविन्याने नटलेले प्रदर्शन पहावयास डोंबिवलीतील जाणकार मडळी आली होती.

उद्घाटनाच्या वेळेस जे दिसले ते नमूद करावेसे वाटते. डोंबिवलीत अनेक प्रकारचे कार्यक्रम होतात. कार्यक्रमाप्रमाणे, वक्त्याप्रमाणे प्रेक्षक, श्रोते बदलतात; पण डोंबिवलीत अनेक प्रदेशातील, विविधभाषी नागरिक राहतात पण मराठी माणसाचीच उपस्थिती असते ज्या ठिकाणी मराठी भाषेतील, मराठी माणसानी आखलेले कार्यक्रम असतात तेथे अमराठी माणसे फारशी फिरकत नाहीत डोंबिवलीत राहून मराठी भाषा शिकत नाहीत की अशा कार्यक्रमाची त्यांना गरजच नाही, गोडीच नाही? ही अशी अनेक बेटे आता डोंबिवलीत वाढू लागली आहेत ह्या बंगाली, तमिळ, तेलगू इ. बेटाचा मागोवा केव्हातरी एकदा घ्यावा लागणार आहे श्री. केशव हे तेलगू भाषिक असल्यामुळे त्यानी बहुधा आपल्या परिचयाच्या अनेकांना बोलावले असावे. त्यावेळी तेलगू भाषिक स्त्रीपुरुषाची उपस्थिती लक्षात भरण्यासारखी होती म्हणून हा भाषिक प्रपच करावासा वाटला.

डोंबिवलीमध्ये ज्याच्याकडे कला आहे अशाना वाव आहे. त्याची कदर केली जाते. आणि बहुधा आता अनेकाना ठाऊक झाले आहे आणि म्हणून डोंबिवलीमध्ये अशा तऱ्हेचे विविध कार्यक्रम, प्रदर्शने, मेळावे नित्यनेमाने भरविले जातात. डोंबिवलीच्या सास्कृतिक जीवनात त्यामुळे सपपणा नसतो. कोठे ना कोठे काही ना काही होतच असते.

—चंद्रशेखर राजे


# कुंपण आणि आकाश

**मंगला गोडबोले**

**किंमत २० रुपये**

**राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव, पुणे ३०.**

# आपण असे जगतो

वि. ग. कानिटकर

## □ भविष्य

पूर्वापार चालत आलेली एखादी विद्या जेव्हा अवकळा प्राप्त होऊन हीन–दीन होते, तेव्हा सर्वांनाच मनापासून वाईट वाटते. फार पूर्वी भारतात जेव्हा अनेक राजे राज्य करीत होते, तेव्हा प्रत्येकाच्या दरबारात एक राजपुरोहित असे. हा राजपुरोहित आपल्या कल्पनेत उभा रहातो तो ब्राह्मण जातीचा, ऋषीतुल्य दिनचर्येचा वयोवृद्ध अशा स्वरूपात. त्याच्यापाशी काहीतरी दैवीविद्या गृहीत धरलेली आणि त्या ज्ञानाच्या आधारे तो राजाला वेळोवेळी त्याची ग्रहस्थिती सांगून सावध करण्याचे काम करीत असे. राज्यात दुष्काळ पडणार असला, एखादे परचक्र येणार असले, राजगृहातील कोणाला आजार उद्‌भवणार असेल तर राजपुरोहिताला त्याचा खूप आधीच सुगावा लागतो, असा विश्वास असे. अशा दुःखद वार्ताप्रमाणेच राजाला पुत्रप्राप्ती होणार की कन्या, धर्मकार्यासाठी अनुकूल दिवस कोणता, आणखी एखादा विवाह राजाने करावा किंवा कसे, अशा सर्व बाबतीतही राजपुरोहिताचा सल्ला महत्त्वाचा मानला जाई आता प्रत्येक राजापाशी ग्रहस्थिती व कुंडली पाहून भविष्यात घडणाऱ्या गोष्टीची चाहूल देणारे भविष्यवेत्ते पुरोहित असूनही राज्यावर संकटे कोसळत, युद्धात पराभव पदरी येई. अगदी वर्तवलेल्या भविष्याच्या विपरीत गोष्टी घडतच असत. पण यामुळे राजपुरोहिताच्या प्रतिष्ठेला मात्र कधी धक्का लागत नसे ! होणाऱ्या गोष्टी आकाशातील ग्रहस्थितीमुळे होतात, ही श्रद्धा सर्व जगात प्रचलित होती. याचा एक परिणाम असा की प्रत्येक खगोल शास्त्रज्ञाला भविष्य कळायलाच हवे, असा लोकांचा आग्रह असे. केपलर हा खगोलशास्त्रज्ञ होता. पण उदारनिर्वाहासाठी आणि लोकांकडून मानमरातब मिळावा म्हणून, तो भविष्यदेखील सांगे, जरी त्यात काही अर्थ नाही, हे त्याला कळत असे.

आजही भविष्य सांगणारे सर्वत्र आहेत. आज ते प्रत्यक्ष राजदरबारात नसले, तरी अनेक मंत्र्याचे ज्योतिषी ठरलेले आहेत. कै. यशवंतराव चव्हाण भविष्य विचारण्यासाठी नेहमी आपल्या घरी येत, असे सांगणारे ज्योतिषी पुण्यात असलेले अनेकांना माहीत आहेत. कै. इंदिरा गांधींसह अनेक राज्याचे मुख्यमंत्री हे ज्योतिषाच्या अनुषंगाने निर्णय घेतात किंवा घेत असत, हा समज प्रचलित आहे. फक्त आज हे सर्व गुपचुप केले जाते, कारण ज्योतिषाकडे जाणे हे बुद्धिप्रामाण्यवादी नाही व आपण सर्व बुद्धिप्रामाण्यवादी आहोत, अशी प्रतिमा सर्व राजकारण्यांना मनापासून आवडते.

आता भविष्य सांगणाऱ्यांचा तरी आपण जे सांगतो, ते काही शास्त्रशुद्ध नियमानुसार सांगतो असा विश्वास असतो का ? सर्व भविष्यवेत्ते नेहमी हेच सांगतात की, भविष्य हे एक शास्त्र आहे आणि अनुमानधक्क्याने किंवा इतर मार्गाने मिळवलेली माहिती वापरून आम्ही काही भविष्य सांगत नाही. ग्रहस्थिती–माणसाची कुंडली जे स्पष्ट दर्शवते तेच आम्ही सांगतो. सामान्य माणसं भविष्य सांगणाऱ्याच्या योग्यतेची कधी चौकशी करीत नाहीत. बुद्धिप्रामाण्यवादी दैनिकातून रोजचे राशीभविष्य प्रसिद्ध होते. ते कोण लिहितो हे कुणालाच ठाऊक नसते. हे भविष्य एका शब्दात असते–

मेष – दगदग
वृषभ – स्त्रीसुख
मिथुन – खर्च
कर्क – आप्तेष्ट भेट
सिंह – शुभ वार्ता
कन्या – अशुभ वार्ता
तुळ – धावपळ
वृश्चिक – आत्मविश्वास वाढेल
धनु – यश
मकर– बेतात फेरबदल
कुंभ– अडथळे
मीन– सुयोग

आता यात दगदग, खर्च, धावपळ, बेतात फेरबदल, अडथळे, अशुभवार्ता या सहा राशींचे भविष्य एकच आहे. कसलाही त्रासिक अनुभव यात बसतो. आप्तेष्ट भेट, शुभवार्ता, सुयोग, यश या चार राशींचे भविष्य एकच आहे. कसलाही सुखद अनुभव यात बसतो. आत्मविश्वास वाढेल या भविष्यात, वृश्चिक राशीच्या सर्व कोटयावधी लोकांजवळ आत्मविश्वास आहे हे गृहीत धरलेले आहे आणि तो वाढणार आहे. स्त्रीसुख हे काय प्रकरण आहे याचा उलगडा कठीण आहे !

आश्चर्य मात्र हे आहे की, दैनिक वाचणारे शेकडा नव्व्याणव टक्के वाचक, या भविष्यावर नजर टाकतातच आणि दैनिक चालवणाऱ्यांना हे ठाऊक असल्याने, हीच बारा एकवचनी भविष्ये आलटूनपालटून छापणे त्यांना अगत्याचे वाटते ! वृत्तपत्राच्या साप्ताहिक आवृत्त्यातूनही बुद्धिप्रामाण्यवादी दैनिके व साप्ताहिके जरा विस्तृत भविष्ये छापतात. यातदेखील एका शब्दात सांगता येईल इतपतच भविष्य असते. बाकी सगळा गोल गोल फापटपसारा असतो.

भविष्य लिहिणारे आणि ते वाचणारे या दोघांच्या दृष्टीने, हा एक निरुपद्रवी खेळ झालेला आहे आणि कोणीही वृत्तपत्रातील या भविष्याकडे गंभीरतेने पहात नाही; परंतु याचा एकत्रित परिणाम अपरिपक्व अशा विद्यार्थ्यांच्या मनावर व लहान मुलांवर काय होतो याचा कोणी विचार करतो काय ? मुलांना वा विद्यार्थी–विद्यार्थीनींना लहानपणापासून शास्त्रीय दृष्टी द्यावी, बुद्धिप्रामाण्याचे महत्त्व कोवळया वयातच त्याच्यावर बिंबवायला हवे, वगैरे शहाणपणा सांगणारी मोठी माणसं रोज वृत्तपत्रातून हा वरवर गंमतीदार वाटणारा खेळ खेळतात, तो मग कशा करता, हा प्रश्न त्यांना पडत नसेल का ?

## □ समाजवाद्यांनी वागावे कसे ?

ज्या माणसाची मते जनसामान्यांहून वेगळी अथवा अनपेक्षित असतात, अशा माणसापुढे नेहमी नैतिक प्रश्न उभे रहात असतात. अशा प्रकारचा त्रास इतरांना होत नाही. असा माणूस जर त्याच्या सदसद्‌विवेक बुद्धीला योग्य वाटेल त्यानुसार वागायला मोकळा राहिला असता, तर असे प्रश्न त्याने मनाला कोणताही त्रास न घडवता निकालात काढले असते. पण त्याच्या मतांचा गाजावाजा झालेला असल्याने त्याचे

मित्र व हितशत्रू त्याला छेडतात. ' अरे तुम्ही पण शेवटी हेच केलेत का ?'

आपल्याकडे समाजवादी व गरिबांचा अतिरिक्त कळवळा बाळगणाऱ्यांच्या नशिबी अशी स्थिती नेहमी येते. एकदा एका समाजवादी पुढाऱ्याने जाहीरपणे सणासुदीला अंगावर दागिने घालून रस्त्यातून मिरवणाऱ्या ब्राह्मणी स्त्रियांवर कडाडून टीका केली. त्याचा दागिने घालायला विरोध दिसत नव्हता; पण आसपास एवढे दारिद्रय असताना या स्त्रियांना या प्रकारे श्रीमंतीचे प्रदर्शन करायला काहीच कसे वाटत नाही, असे त्याचे म्हणणे होते. हा समाजवादी हातात परदेशी बनावटीचे घड्याळ घालून रस्त्यातून जात असता त्याच्या एका मित्राने खवचटपणे त्याला वाजले किती ? विचारले. मनगटावरची नेहरुशर्टाची बाही मागे घेत त्याने वेळ सांगितली. त्याचबरोबर तो खवचट मित्र म्हणाला– अरे तुम्ही घड्याळ वापरता आणि ते देखील इतके महागडे ? आसपास झोपडपट्टीतून लोकांच्या हातावर घड्याळे नसताना असे घड्याळ वापरून श्रीमंतीचे प्रदर्शन करायला तुम्हाला काहीच कसे वाटत नाही ? तो समाजवादी लघुनेता म्हणाला– ' मी हे विकत घेतलेले नाही. मला वाढदिवशी माझ्या अमेरिकेतल्या मित्राने भेट दिले. आहे शिवाय घड्याळ ही एक आवश्यक वस्तू आहे.' रस्त्यातील अशा अचानक हल्ल्याने तो समाजवादी क्षणभर गोंधळला व त्याने काही थातुरमातुर उत्तर दिले पण त्या उत्तराने त्याचे स्वतःचेही समाधान झाले का याची शंका आहे.

महाराष्ट्रातील दोन सुप्रसिद्ध समाजवादी नेत्यांनी आयुष्यभर हिंदुधर्मातील ' जातपात ' व ' अस्पृश्यता ' याविरुद्ध खूपच लेखन केले. व्याख्याने दिली. परंतु दोघांच्या मुलामुलींनी लग्ने करताना अगदी आपआपल्या पोटजातीतीलच वधु-वर पाहिले. जास्त प्रामाणिकपणे सांगायचे तर त्यांच्या मुलामुलींनी पाहिले. तेव्हापासून या दोन नेत्यांनी आंतरजातीय विवाहाचा जाहीर उदोउदो बंद केलेला आहे असे दिसते. लोक त्यांना विचारतात– काहो ? तुमच्याच मुलामुलींना तुम्ही आंतरजातीय विवाहसंबंध का करायला लावले नाहीत ? इतरांना उपदेश करायला तुमचे काय जाते ?

' पदपथावरील झोपडपट्टी हटवलीत तर झोपडपट्टीवाल्यांना आम्ही श्रीमंतांच्या घरात घुसायला सांगू–' अशी गर्जना नुकतीच एका समाजवादी पुढाऱ्याने मुंबईत केली. बहुतेक समाजवादी पुढाऱ्यांचे पुण्या–मुंबईत बंगले आहेत– निदान प्रशस्त फ्लॅट्स आहेत. यातले कितीजण आपापल्या बंगल्यात वा फ्लॅटमध्ये झोपडपट्टीवासीयांना सामावू इच्छितात ? एकहीजण याला तयार होईलसे वाटत नाही. कारण जरा प्रशस्त घर हे प्रत्येकाचे अगदी साध्यातले साधे स्वप्न असते.

गरिबी, रहाण्याच्या जागेचा प्रश्न–अगदी काटेकोर समाजवादी पद्धतीने सोडवायचा झाला तर काय करावे लागेल ? जगाची एकदर जो लोकसंख्या आहे त्याने जगातील सर्व उपलब्ध सुविधांच्या संख्येला भागावे लागेल व जे काही प्रत्येकाच्या वाटयाला येईल तेवढेच मासिक उत्पन्न व रहाण्याची जागा प्रत्येकाला द्यावी लागेल. भारतापुरते बोलायचे तर भारताच्या लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकांचे वार्षिक उत्पन्न १५०० रुपयांहून कमी आहे. जर समान वाटप करायचे तर प्रत्येकाला महिन्याला साधारण २० रु. हून कमी उत्पन्नात रहावे लागेल. योगविद्येचा प्रसार करून बहुतेक लोकांना योगसामर्थ्याने अन्नावाचून जगायला शिकविले, तरीसुद्धा योगक्षेमाचा सर्वांचा प्रश्न सुटणार नाही कारण माणूस केवळ भाकरीवर जगत नाही. काहींना कागद, पेन, पुस्तके, टेबल, खुर्ची लागते.

आंतरजातीय लग्ने करून जातपात तोडायची हा मार्ग जर असेल तर जातीजमातीतली लग्नेच बेकायदा ठरवायला हवीत. काही वरच्या व काही अगदी तळातल्या जातीचे निरनिराळे गट मुक्रर करून या पद्धतीनेच विवाह लावायला हवेत. नाही तर, एका मुहूर्तावर दहा हजार जातीजातीतील विवाह होत असतील, तर आंतरजातीय जोडप्यांना जिल्हा परिषदेने केवळ ताटवाट्या भेट देऊन जाती मोडणार कशा ?

मग समाजवाद्याने करावे तरी काय ? ज्याला, इतरांना आपल्या मताकडे वळवायचे असेल, त्याला दान मार्ग उपलब्ध असतात. त्याने अगदी टोकाचे हौतात्म्य पत्करून लोकांच्या भावनांना आवाहन करायला हवे, जर मुलगा–मुलगी जातीतच लग्न करतो म्हणायला लागली तर पुढारी बापाने अन्नत्याग जाहीर करून प्राणपणाला लावायला हवेत. हा अगदी ' बाबू गेनू ' मार्ग झाला. याचा परिणाम होवो न होवो, निदान उपदेश करणाऱ्यापुढे नैतिक प्रश्न निर्माण होणार नाहीत. पण जर आपले मत संपूर्णतः बुद्धिवादाच्या कसोटीस शंभर टक्के उतरते असे पुढाऱ्याला वाटत असेल, तर त्याने केवळ बुद्धिवादाचाच आश्रय घेऊन, प्रचार करायला हवा व कोणत्याही परिस्थितीत भावनात्मक आवाहन करता कामा नये.

सूर्याभोवती पृथ्वी फिरते हे गॅलिलियोला मानवजातीला बुद्धिवादाच्या आश्रयाने पटवता आले. समाजवाद्यांनी जगात आहे ती संपत्ती सर्वांना सारखी वाटण्याचा उपाय न सांगता, संपत्ती खूप वाढवून तिचे अधिक शास्त्रशुद्ध वाटप होईल अशी अर्थरचना सांगावी आणि आंतरजातीय लग्ने हा जाती नष्ट करण्याचा उपाय नाही. कारण माणसे लग्ने व्यक्तिगत सुखासाठी करतात समाज सुधारण्यासाठी नाही, हे एकदा मनात नीट ठसवून घ्यावे.

□


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चितथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

## वेशीबाहेरचे एक पान

मराठ्याची तानू इस्माईलच्या घरात घुसली.

मराठ्याच्या आळीला जाळ लागला. सारी डोस्की पेटून उठली. मराठ्याचं दैव मधमाशीसारखं तानूच्या विषयावर तुटून पडलं. मराठा समाजाच्या दैवाच्या मिटिंगा जोरात होऊ लागल्या. साऱ्या गावाला खरूज लागल्यासारखं झालं. जो तो तानीवर तुटून पडला. दैवानं तर शिव्याची दावणच तानीच्या नावानं बांधून ठेवली.

दैवाच्या मिटिंगात तानूच्या भावानं सांगून टाकलं– 'आमाला बहण मेली'. त्यानं आणखी बरंच काय सांगून आपण निर्दोष असल्याचं सिद्ध केल. सटवाईच्या देवळासमोर दैव जमलं होतं.

'मराठ्याच्या जातीला आज डाग लागला, म्हणून म्हणतो पोरी धाकट्या असतानाच लगनं लावा. पुराच्या पाण्याला कोणाला आडवाय येत नाही.' निकमाच्या म्हाताऱ्यानं बोलण्याचा नारळ फोडला.

'तसं कसं, आवा–तानीला कसलं झकास घर बघून दिलतं हे साऱ्या दैवाला ठाव हाय, दैवाच्या पंचानीच याद्या केल्या. लग्न लावलं.'

'व्हय ते बरूबर हाय गा, पर इस्म्याचं घर ग्वाड लागलं हे काय आमास्नी ठावं, दिस काळच न्यारं आलं, आता या डोळ्यासनी काय काय बघाय मिळतंय कुणाला ठावं'– गायकवाड नाराजीत बोलला.

साऱ्या मराठ्यांना तानूनं कोड्यात टाकलं होतं. असं तानूनं का केलं हे मात्र कुणीच इचारात घेतलं नाही. असला इचार करायला कुणाला उमजलं नाही. दादू म्हाताऱ्यानं तोंड उघडलं. 'इस्माईलच्या घरावरनं एक बी मराठा जायचं नाही. तानी कोणाला भेटली तर बोलायचं नाही. जो कोण तिच्याबरूबर बोलल त्याला दैवातनं बाहीर काढायचं.' सारा समाज ऐकत होता. 'कोणत्या बाईनबी तिच्याबरोबर बोलायचं नाय. ती आमाला मेली. आता तिचं दिस घालायचं. तिच्या भावानं दैवाला दिसाचं जेवण घालायचं.' असं सारं ठरलं. साऱ्यांनी संमती दिली. असा सांगावा बी तिला धाडला. पर मध्येच एकट्यानं शंका काढली 'आणि तानी इस्म्याला सोडून मधीच आली तर?' तसा इरपा पेटला. 'आर्र तिला खापला... मधीच आली तर .. लेकानू जातीचं हायसा का मातीचं... जात सोडून घुसलीया. दैवाला तिचं तोंड नको.' 'त्या इस्म्याचं बी गुडघ्यातनं पाय काढा.' तसा सारा समाज गप् झाला.

साऱ्या दैवाला गुळाचा चहा आला. कपबशा वाजल्या. भुर्रकान् झालं. बटवं सुटलं. विड्याची बंडलं फुटली. चिलमी फुलल्या. चहानं तरतरी आली. पान खाता खाता चंदर म्हणाला, 'असं विपरीत वरचेवर घडलं तर कसं करायचं.'

'आसं कुणाच्या घरात घडलं तर ते घर दैवाबाहीर काढायचं' दत्तू म्हणाला.

'असं वरचेवर घडायला मराठ्याची औलाद हाय का आणि कुणाची?' एक आवाज. पुन: विषय मिटला. सारी उठाय लागली, तसं एक आवाज आला– 'दैवातल्या लोकानू बसून घ्या.'

सारेजण आवाक् झाले. दैवाच्या मिटिंगात बाईचा आवाज? सारीच चपापली. पिढ्या गेल्या, आल्या पर दैवाच्या मिटिंगात बाईचा आवाज पहिल्यांदाच आला.

सटवाईच्या देवळासमोर तानू उभी होती. दादूनं तोंड उघडलं–'काळं तोंड घेऊन हिथं का आलीस?'

'दैवाला सांगायला' तानू म्हणाली. सारं दैव तापून पेटलं. पुढं जळत राहिलं.

'तू कोण दैवाला सांगणार कुत्रे? आणि तुझा दैवाचा काय संबंध?' एक पंच बोलला.

'संबंध हाय म्हणून आलाया, सारं दैव माझ्या लग्नाला आलं हुतं, दैवाच्या पंचांनी माझं लगीन लावलं. दोन दिस मांडवात जेवलासा.'

'तुझं लगीन करून आमी शाण खाल्लं, आमाला काय ठावं तुला मुसल्याचं घर पायजे हुतं म्हणून! आणि जेवणाचं काढू नगंस. दैवाला लगनात जेवण घालत्यात म्हणजे कोण कुणावर आयार करत नाहीत.' –एक पंच तणतणला.

'आर्र हिच्या भण् तोडून टाका की रं हिला – दैवाला जाब इचारतीया.' एक आवाज.

देवळाच्या मागं उभा राहिलेला इस्माईल हातात फरशी कुऱ्हाड घेऊन पुढं आला, तसं वातावरण भडकलं– समाज उठला. इस्माईल ओरडून म्हणाला– 'अरे कायकू दैव की बात करतय, तानी की शादी मर्द के साथ कर दिये थे क्या? वो हिजडे के पास कैसे रहेगी?' सारं खरं बाहेर पडलं. पण आग?

सारा समाज इस्माईलवर तुटून पडला. रातभर दंगा झाला. इस्माईल-तानू जखमी झाले. इस्माईलचं घर पेटलं.

तो वेशीबाहेर राहिला आहे.

वीस वर्षानंतर मला तानू गावात मोटार अड्ड्यावर भेटली. आमच्या मराठा दैव समाजानं ठरवून दिल्याप्रमाणं मी तिच्याशी काहीच बोललो नाही. पण मन म्हणून गेलं 'तानू, खुदा हाफीज.'

–बापू जाधव
किर्लोस्करवाडी

# राज्यकर्त्यांसाठी विद्वत्तेची बिरुदे

प्रि. खं. कुलकर्णी

'विद्वान लोक राजे झाल्याशिवाय अथवा राज्यकर्ते विद्वान झाल्याशिवाय लोक सुखी होणार नाहीत.'

सॉक्रेटिस (चूकभूल देणे घेणे)

विद्वान माणसे राज्यकर्ते होण्याची सुतराम शक्यता नाही; एवढेच नव्हे तर कधी कधी विद्वान माणसे जशी वागतात ते पाहून राज्यकर्ते न झालेलेच बरे याबद्दल सुजाण वाचकात एकमत होईल. आता राहिला दुसरा पर्याय. सॉक्रेटिसच्या वचनाचा मान ठेऊन राज्यकर्ते विद्वान होत असताना त्याबद्दल आनंद व्यक्त न करता जो गदारोळ वर्तमानपत्रातून उठवला जात आहे त्याबद्दल माझ्यासारख्या सामान्य माणसाला आश्चर्य वाटते. नुसते ज्ञान संपादन करून मनुष्य

विद्वान ठरत नाही तर त्यासाठी विद्वत्तादर्शक योग्य बिरुद नावापुढे असणे आवश्यक आहे हे वाचक मानतील.

शिवाय नावाच्या मागेपुढे बिरुदे असणे हे आपल्या परंपरेशी अगदी सुसंगत आहे. पठिक विद्वत्तेचा गौरव पंडित, महापंडित, प्रकांड पंडित अशा शब्दांनी केला जात असे. आपल्यासारख्या सामान्य माणसाच्या मागे एक 'श्री' पुरते. साधुपुरुषांचा योग्य अध्यात्मिक अधिकार दर्शविण्यासाठी ११, १०८, १००८ श्री यांची उपाधी लागते. त्याशिवाय प. पू., भगवान, सच्चिदानंदरूप या शब्दांची पखरणही आवश्यक असते. एखादा सत्‌शिष्य समजावून सांगेल की गुरूंना या शब्दांचा अहंकार नाही. ते या लौकिक उपाधींच्या पलीकडे आहेत. पण जनमानसात योग्य प्रतिमा राहावी यासाठी हा उपचार सद्‌गुरू नाइलाजाने मान्य करतात. आपण राज्यकर्त्यांच्या बिरुदाविषयी बोलत असताना हे विषयांतर झाले असे वाचकांना वाटेल. तर तसे नाही. माझे म्हणणे असे की, अध्यात्म विचार म्हणजे सत्वगुणांचा आविष्कार या प्रांतातसुद्धा योग्य शाब्दिक उपाधी आवश्यक असतात. राज्यशकट चालवणे याला तर रजोगुणाचे अधिष्ठान आहे. तेव्हा योग्य बिरुदांचा उपचार त्यासाठी आवश्यकच मानला पाहिजे.

पूर्वीचे राजे, कोणत्यातरी निमित्ताने स्वतःला एक किताब घेत हे आपल्याला माहीत आहे. शिवाजीमहाराज हे आपला आदर्श. त्यांनी राज्यभिषेकाच्यावेळी कोणती बिरूदे धारण केली हे शिवशाहीरांच्याकडूनच ऐकले पाहिजे. जुन्या प्रथेप्रमाणे मोठमोठ्या राजांनी राजराजेश्वर या शब्दापासून सुरुवात करून ओळीच्या ओळी बिरूदे कशी धारण केली हे समजावून सांगण्यासाठी एखादा पंडित पाहिजे. यानंतर मुसलमानी अमलात फारशी शब्दांची भेंडोळी कशी लागत ते निजामुल्मुक यांच्या संपूर्ण विस्तारावरून लक्षात येईल. यानंतरचा इंग्रजी काळ जरी पाहिला तरी रावसाहेब, रावबहादूर या चिल्लर गोष्टीपासून K. C. B., M. O. F. B. E. ( Most obedient friend of British Empire ) यासारखी अनेक बिरुदे आम्ही अभिमानाने वागविली.

तेव्हा ही आपली खरी परंपरा. लोकतंत्राचा अवलंब आपण केला हे ठीक. असे म्हणतात की अमेरिकेत प्रेसिडेंटलासुद्धा 'मिस्टर प्रेसिडेंट' असे संबोधिले तरी पुरते व त्याबद्दल आकाश कोसळून पडत नाही. पण हे आपल्या परंपरेशी मुळीच जुळणारे नाही. अगदी नगरपित्याचा उल्लेखसुद्धा असा एकेरी करता येणार नाही तर 'माननीय ाऊरावसाहेब' असाच करावा लागतो. दूरदर्शनवरील कार्यक्रमातसुद्धा लसुणाच्या लागवडीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्याचा उल्लेख, निवेदक 'अमके साहेब' असाच आवर्जुन करतो आणि अमेरिकेतसुद्धा बिरूदांची आवड नाहीच असे नाही. हॉट डॉग विकून कोटयाधीश झालेल्या माणसाला 'हॉट डॉग किंग' ही उपाधी आवडते. तेव्हा बिरूदांची आपली परंपरा व जनमानसातील आवड लक्षात घेऊन ती टाकून न देता लोकशाही प्रथांशी तिचा नीट सांधा जमविला पाहिजे तो असा.

त्यासाठी मूळ मुद्याकडे पुनः वळू.

सॉक्रेटिसच्या वचनाप्रमाणे, केवळ लोक अधिक सुखी व्हावेत एवढ्याच तळमळीतून, राज्यकर्त्यांना असे वाटायला लागले की आपल्याला लोकांनी विद्वान म्हणावे तर ती गोष्ट आनंदाची मानली पाहिजे. विद्वत्ताप्रदर्शक बिरुदे त्यासाठी आवश्यक आहेत. आता बी. ए., एम. ए. या पदव्या अगदीच चिल्लर आहेत व एका दमांत अशा सर्व पदव्या संपादन केल्याची उदाहरणे अनेक आहेत. पाश्चात्य विश्वविद्यालयीन पद्धतीला उच्च ज्ञानाच्या निदर्शक पीएच. डी., डी. लिट. अशा अगदी मर्यादित पदव्या आहेत. व आपल्या गरजेच्या मानाने त्या अपुऱ्या पडतील. तेव्हा राज्यकर्त्यांना आपल्या आवडी प्रमाणे निरनिराळ्या, गौरवपूर्ण, विद्वत्तादर्शक बिरूदे धारण करता यावीत ही आपली खरी गरज आहे. यासाठी जुन्या काळी आपल्या राजेरजवाड्यांनी विद्येच्या क्षेत्रातील कोणची बिरूदे धारण केली होती याचे कोणी संशोधन करून एक कोष निर्माण केला, तर तो फार उपयुक्त ठरेल. शेकडो Ph. D., डी. लिट झाले तर त्यात काय गंमत राहली? त्याऐवजी वेगवेगळी गौरवपूर्ण बिरूदे विश्वविद्यालयांनी राज्यकर्त्यांना प्रदान करावीत. सार्वजनिक समारंभात, दूरदर्शनवर उल्लेख करताना असे वैचित्र्य योग्य प्रतिमा निर्माण करण्यासाठी व रंजकतेत भर टाकणारे ठरेल.

आणखी एक छोटासा मुद्दा वाचकांनी ध्यानात घ्यावा. विद्यासंपादन करणाऱ्यांपेक्षा त्याचा आश्रयदाता मोठा हे सत्य त्रिकालाबाधीत आहे. □


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

# पुन्हा एकदा शंकरराव चव्हाण

अभय गोखले

शिवाजीराव ( निलंगेकर ) पाटील यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागल्यावर ज्या नाट्यपूर्ण घटना घडल्या, त्याचा शेवट श्री. शकरराव चव्हाण महाराष्ट्राचे पुन्हा एकदा मुख्यमंत्री होण्यात झाला. शिवाजीराव याना पुन्हा सधी मिळावी म्हणून राजस्थानचे राज्यपाल व महाराष्ट्राचे माजी मुख्यमत्री वसतदादा पाटील यानी दिल्लीत बऱ्याच खटपटी लटपटी केल्या, पण राजीव गांधी यानी त्याची डाळ शिजू दिली नाही वसतदादा पाटील यानी मुख्यमत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर त्याच्या गटातील एक म्हणून शिवाजीराव पाटील याना मुख्यमत्रीपद मिळाले, परतु मुख्यमत्री झाल्यावर त्यानी वसतदादाकडे फारसे लक्ष दिले नाही. तरीसुद्धा केवळ शकरराव चव्हाण मुख्यमत्रीपदी येऊ नयेत म्हणून वसतदादानी निलगेकर याना पुन्हा सधी मिळवून द्यायचे शर्थीचे प्रयत्न केले निलगेकराना सधी देत नसाल, तर सुधाकरराव नाईकाना सधी द्या असे वसतदादानी परोपरीने सागून बघितले. परतु सांगली विधानसभा पोटनिवडणुकीत वसतदादाचा उमेदवार पराभूत झाल्यामुळे असेल, वसंतदादाचे वजन पूर्वीसारखे दिल्लीत राहिलेले नाही. शिवाय राज्यपालपदी असलेल्या व्यक्तीने राजकारणात उघडउघड ढवळाढवळ करणे ही दिल्लीश्वराना पसत पडले नसावे. सुरुवातीला निलगेकराना संधी मिळत नसेल तर सुधाकरराव नाईक, सुशिलकुमार शिंदे व नरेंद्र तिडके याची नावे आघाडीवर होती, परतु शिंदे व तिडके वसंतदादाचा किंवा एखाद्या मोठ्या गटाचा पुरेसा पाठिंबा मिळवू न शकल्याने त्याची नावे आपोआपच मागे पडली. शिवाजीरावानी सह्या गोळा करण्यात मोठा उत्साह दाखवला परतु निरीक्षकानी त्याना वास्तवतेचे भान आणून दिल्यावर त्यांचा उत्साह मावळला. वसतदादानी सुचवलेला उमेदवार लक्षात घ्यायचा नाही असे ठरल्यावर सुधाकरराव नाईकाचे नाव मागे पडले.

खरी गोष्ट अशी आहे की, वसतदादांना शह देण्यासाठी श्रेष्ठीनी शंकरराव चव्हाणाचे नाव केव्हाच निश्चित केले होते, त्यामुळेच निरनिराळे निकष लावून वसतदादाचे उमेदवार नाकारण्यात आले. आमदारामध्ये शकरराव चव्हाण याना कितपत पाठिंबा आहे याची जी चाचपणी करण्यांत आली तो निव्वळ फार्स होता. कारण शकरराव चव्हाणाची प्रतिमाच अशी आहे की, आमदारात मतदान घेतले असते तर शकरराव चव्हाण याना फारच थोडा पाठिंबा मिळाला असता. तेव्हा आमदारात मतदान घेतले तर वसतदादाचा उमेदवार निवडून येईल या भीतीने कॉंग्रेस श्रेष्ठीनी वरून (अतुल्याप्रमाणे) शंकरराव चव्हाणाची नियुक्ती केली तसे शंकरराव नशिबवानच म्हणावयास हवेत, कारण मागे वसतराव नाईक–यशवतराव चव्हाण याचे महाराष्ट्रातील वाढते वर्चस्व रोखण्यासाठी इदिराजींनी शकररावाना असेच मुख्यमत्रीपदी वरून नियुक्त केले होते. वसतराव नाईकाची अकरा वर्षांची मुख्यमत्रीपदाची कारकिर्द जेथे सपली तेथेच महाराष्ट्रातील कॉंग्रेसची स्थिरता सपुष्टात आली. वसतराव नाईकाच्या कारकिर्दीत महाराष्ट्रात कॉंग्रेस इतकी प्रबळ होती की, कधीकाळी कॉंग्रेस सत्तेवरून जाईल किंवा आजच्या इतकी खिळखिळी होईल, असे कोणाला स्वप्नातही वाटले नसते. वसतराव नाईकाना मुख्यमत्रीपदावरून घालवण्यासाठी जी सह्याची मोहीम झाली किंवा असतुष्ट लोकानी जी उचल खाल्ली, त्याला कॉंग्रेसश्रेष्ठीचा पाठिंबा होता ही गोष्ट लपून राहिलेली नाही तेव्हा महाराष्ट्रात अस्थिरता निर्माण करण्यात दिल्लीश्वराचा मोठा हात होता. या बडखोरीमुळे व गटबाजीमुळे शंकरराव चव्हाण, वसतदादा पाटील, अंतुले, भोसले, शिवाजीराव पाटील या नंतरच्या मुख्यमत्र्यांना वसतराव नाईकाप्रमाणे स्थिरता कधीच लाभली नाही त्याना नेहमीच त्याच्या विरुद्धची सह्याची मोहीम, बंडखोर, गटबाजी याना तोंड द्यावे लागले. केवळ यशवतराव चव्हाण–वसतराव नाईक–वसतदादा पाटील याच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी इदिराजीनी आपलीच मजबूत सघटना महाराष्ट्रात पार खिळखिळी करून टाकली.

## मोरारजींशी तुलना

शकरराव चव्हाण आणिबाणी यायच्या अगोदर मुख्यमत्री झाले. निरनिराळ्या गटाना सभाळून घेणे त्याना कधीच जमले नाही केवळ १९६९ साली इदिराजीनी कॉंग्रेस फोडल्यावर आनदराव चव्हाणाप्रमाणे शकरराव चव्हाण त्यांच्या बाजूला राहिल्याने इदिराजीना त्यांना काही द्यायचे होते, ते देताना त्यानी यशवतराव चव्हाण व वसतराव नाईक याना जाता जाता दणका दिला. कारण कॉंग्रेस फुटल्यावर काही दिवस यशवतराव व वसंतराव इदिराजीच्या बाजूला नव्हते तेव्हा त्याना कधी तरी धडा शिकवायचा होता व तुमच्या मर्जीमध्ये नसणारी एखादी व्यक्ती मुख्यमत्री होऊ शकते हेही इंदिराजीना त्या दोघाना दाखवून द्यायचे होते. शंकरराव मुख्यमत्री झाले आणि थोड्याच दिवसात आणिबाणी जाहीर झाली. आणिबाणीत तर ते स्वत.चे कर्तृत्व फारसे दाखवू शकले नाहीत. वरून येणाऱ्या आदेशाची अमलबजावणी करणे हे एकच काम राज्याराज्यातील मुख्यमत्र्याचे होऊन बसले होते. शंकररावानी फार तर त्या आदेशाची अमलबजावणी जादा उत्साह दाखवून केली त्याचे विरोधीपक्षाशी असलेले सबधही फारसे चागले नव्हते. त्यावेळेस तर विरोधी पक्षाना ते फारसे किंमत देत नव्हते. त्याची हेडमास्तर म्हणून जनमानसात प्रतिमा निर्माण झाली होती. हे खपवून घेतले जाणार नाही, ते सहन केले जाणार नाही, अशी भाषा वापरण्यात येई. बहुदा अनुशासन पर्वाचा तो परिणाम असेल. पत्रकाराशीही त्यांचे सलोख्याचे संबंध नव्हते.

शकरराव हे एक चागले प्रशासक समजले जातात. परंतु मुख्यमत्रीपदासारख्या महत्त्वाच्या पदावरील व्यक्ती नुसती उत्तम प्रशासक असून चालत नाही, तर ती व्यक्ती सर्वसमावेशक स्वभावाची असावयास हवी. पक्षातील निरनिराळ्या गटाना व व्यक्तीना

साभाळून घेता यावयास हवे. पक्षातील विरोधी गटालाही आपण दुर्लक्षित होत आहोत असे वाटता कामा नये. त्याबाबतीत वसतराव नाईक, शरद पवार यांचे उदाहरण अभिमानाने देता येईल. वसतराव नाईकानी महाराष्ट्रात अकरा वर्षे राज्य केले. त्याच्या सर्वसमावेशक वृत्तीचा आणखी कोणता दाखला पाहिजे ? शरद पवारानी जनता पक्षातील निरनिराळ्या भाडखोर गटाना साभाळत निर्वेध राज्य केले, जे केंद्रात मोरारजीनाही जमले नाही.

याबाबतीत शकरराव चव्हाणाची तुलना मोरारजी देसाई याच्याशी होऊ शकेल. हे दोघेही उत्तम प्रशासक आहेत, पण निरनिराळ्या गटाना साभाळून घेणे, पत्रकाराशी चागले संबध ठेवणे, विरोधकाना सन्मानाने वागवणे ह्या गोष्टी दोघानाही जमत नाहीत. दोघेही थोडेसे एककल्ली व हेकेखोर वाटतात. मोरारजीना जनता पक्षातील निरनिराळ्या घटकाना साभाळून घेता आले नाही. त्यामुळे जनता पक्ष सत्तेवरून बाजूला फेकला गेला मोरारजीच्या ठिकाणी वाजपेयी, शरद पवार, एस. एम. जोशी याच्यासारखी व्यक्ती असती तर जनता पक्ष कदाचित आजही केंद्रात सत्तेवर राहिला असता.

### वसंतदादांचा मोठा गट

पूर्वानुभवावरून शकरराव बरेच काही शिकले असतील व आता ते बरेच बदलले आहेत असे म्हणतात. परंतु अशा व्यक्तीचा स्वभाव लवकर बदलत नाही. मत्रिमंडळाची रचना ज्या प्रकारे करण्यात आली आहे व वसतदादाच्या पाठिराख्याना ज्या प्रकारे वगळण्यात आले आहे, त्यावरून माझ्या वरील विश्वासास पुष्टीच मिळते. 'मी किती दिवस मुख्यमत्रीपदावर रहातो याची मला पर्वा नाही' असे शकररावाचे एक विधान माझ्या वाचण्यात आले. हे विधान शकरराव मुळीच बदलले नाहीत हेच दर्शविते मात्र शकररावानी अशा प्रकारे कठोर वागावे अशी सध्याची महाराष्ट्रातील काँग्रेसची स्थिती नाही, हे त्यानी लक्षात घ्यावयास हवे. दोन–तीन पोटनिवडणुकात काँग्रेसला पराभव पत्करावा लागला आहे. त्यात सांगलीतील पराभव तर अभूतपूर्व असा आहे. पक्षात बडखोरी व गटबाजीला उत आला आहे. कधी नव्हे ते विरोधी पक्ष राज्यात मजबूत स्थितीत आहेत. शरद पवारासारखा लोकप्रिय नेता सधीची वाट पहात टपून बसला आहे. शरद पवाराची लोकप्रियता सत्ताधारी पक्षातील कोणाही नेत्याजवळ नाही. शिवसेनेचे आव्हान नवीन स्वरुपात निर्माण झाले असून, त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही पूर्वीसारखी इदिराजीच्या नावावर तरून जाण्याची परिस्थिती राहिलेली नाही इंदिराजीइतका पाठिबा राजीव गाधी मिळवू शकलेले नाहीत. तेव्हा शकररावानी तत्त्वाला मुरड घालूनच राजकारण करावयास हवे. कारण वारंवार मुख्यमंत्री बदलले गेल्याने आध्र प्रदेशप्रमाणे महाराष्ट्रातील लोकाना वैताग आला आहे व त्याची परिणिती काँग्रेस लोकामध्ये अप्रिय होण्यात होऊ शकेल

शंकररावांनी आपल्या मत्रिमडळात सुधाकरराव नाईक, नरेंद्र तिडके इत्यादी श्रेष्ठ माजी मंत्र्यांना घेतलेले नाही. हे व इतर काही वगळलेले नेते वसतदादाचे पाठीराखे समजले जातात. कोल्हापूर, सागली, सातारा, नाशिक, कराड या जिल्ह्याना मत्रिमडळात प्रतिनिधित्व नाही हे आश्चर्य आहे. असे कधी पूर्वी घडले नव्हते. हा सर्व भाग वसंतदादाचा समजला जातो. जर हा भाग वसतदादाच्या पाठिराख्याचा आहे म्हणून त्याना प्रतिनिधित्व दिले नसेल तर ती शकररावाची मोठी चूक ठरेल. कारण सागलीत पराभव झाला असला तरी वसतदादाना मानणारा मोठा गट आमदारात आहे आणि पक्षातर विरोधी कायदा समत झाल्याने आता मोठ्या प्रमाणावर फूट घडवून आणावी लागेल. हे गृहित धरले, तरी जर ५३ आमदारानी सत्ताधारी पक्षाचा पाठिबा काढून घेतला तर ती फूट ठरणार नाही व मत्रिमडळ कोसळेल. एवढ्या आमदाराचा पाठिंबा वसतदादा सहज मिळवू शकतील. मात्र सागली व धारावी भूखडांची प्रकरणे त्याच्या मागे लागल्याने तसे डेअरिंग ते करतील असे आज तरी छातीठोकपणे सागता येणार नाही. मात्र पक्षातच राहून त्याचे पाठिराखे शकररावाना अडचणीत आणू शकतील विधीमडळाचे सध्याचे अधिवेशन सपल्यावर मत्रिमडळाचा विस्तार करण्याची शक्यता शकररावानी व्यक्त केली आहे तोपर्यंत वाट बघायची असे वसतदादाच्या पाठिराख्याचे धोरण असावे □

# दिल्लीचा फोन

**...एक काळ असा होता जेव्हा–भारताच्या राजकारणाची सूत्र महाराष्ट्रातून हालायची.**

... एक काळ असा होता–जेव्हा महाराष्ट्रात जो विचार आज व्हायचा तो विचार मनातही येण्यास उर्वरित भारतवर्षाला बराच कालावधी लागायचा.

.. एक काळ असा होता–की सह्याद्री नेहमीच हिमालयाच्या सरक्षणार्थ धावायचा.

एक काळ असा होता–जेव्हा हरेक क्षेत्रातला आदर्श महाराष्ट्रातून पुढे यायचा नि भारतवर्षापुढे उभा रहायचा !

पण आज ?

आज काय अवस्था आहे ? केवळ एक फोन येतो नि महाराष्ट्राचा मुख्यमत्री दिल्लीला धावत सुटतो केवळ एकच फोन येतो नि हाच मुख्यमत्री राजीनामा देतो. महाराष्ट्रात नवा नेता कोणाला नेमायचे हा वाद रगतो. मग अनेक बावरलेले लोक सत्ता-स्पर्धा करतात. त्यागाची भाषा करीत स्पर्धेत उतरतात दिल्लीहून आलेले श्रेष्ठी बुचकळ्यात पडतात. एकमताने घ्यावयाचा निर्णय प्रत्येकाचेच एक असलेले मत वेगळे येऊन गोंधळ वाढतो आणि शेवटी पुन्हा एक, फक्त एकच फोन येतो नि महाराष्ट्रातून दिल्लीला गेलेला माणूस पुन्हा महाराष्ट्रात आणून टाकला जातो, महाराष्ट्राचा मुख्यमत्री केला जातो

किती केविलवाणी स्थिती ही ? आपल्याला एक मुख्यमत्री मिळू नये ! त्यासाठी केंद्रातला माणूस परत बोलवावा लागतो ! (की पाठवला जातो !) सगळ आयुष्य राजकारणासाठी वेचलेली ही माणसं आपली मुख्यमत्रीपदासाठी लायकी निर्माण करू शकत नाहीत ? मग यानी आयुष्य वेचल ते कशासाठी वेचले हा प्रश्न पडतो आपले अधिकार वापरून आरक्षित जमीन स्वार्थी बिल्डर्संच्या घशात घालण्यासाठी ? की अधिकार वापरून आपल्या आप्ताना सन्मान मिळवून देण्यासाठी ? की विविध प्रतिष्ठाने स्थापून पैशाचा ओघ खासगी तिजोरीकडे वळविण्यासाठी ? की फक्त दिल्लीच्या वाऱ्या करण्यासाठी ?

कशासाठी हे सारं आयुष्य राजकारणात घालविलेलं असतं ?

एक काळ महाराष्ट्रात असा होता, ज्यावेळी राजकारणासाठी खरोखर आयुष्य वेचलं जायचं. एकाच स्वातंत्र्यवीराच्या घरातल्या दोन–दोन पिढ्या स्वातंत्र्य मिळावे म्हणून 'घाण्या'भोवती फिरत जन्मठेप भोगायच्या; स्वातंत्र्याची ललकारी देत, स्वराज्यावर हक्क सांगीत आयुष्याची अखेरची वर्षे मंडालेत काढायच्या. पण आता तसं आयुष्य वेचणं मूर्खपणाच ठरू लागलं आहे.

इतर अनेक बाबींप्रमाणेच महाराष्ट्र राजकारणात पार रसातळाला पोहोचला आहे. मुख्यमंत्री नाट्य हेच स्पष्ट करते आहे.

## राज्यपाल 'दादा'

गेल्या बारा महिन्यात महाराष्ट्राला तिसरा मुख्यमंत्री लाभावा हीच त्याची रौप्यमहोत्सवी वर्षातली खरी कामगिरी ठरली आहे. तरुण पंतप्रधान राजीव गांधी आणि मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे सूर कधी जुळलेच नाहीत. त्यात 'भूखंड' प्रकरणानी जोर धरला. पण त्याबाबत चर्चा झडू लागलेली असतानाच वसंतदादा पाटील यांनी आपला खरमरीत राजीनामा पाठवून दिला होता. त्यावेळी महाराष्ट्राची अस्मिता वगैरे शब्द मनाला क्षणभर, हो अगदी क्षणभर सुखद अनुभव देऊन गेले होते. पण ही अस्मिता सत्तेची सवय लागलेल्यांना कशी जमावी किंवा झेपावी ? त्यांना राजस्थानचे राज्यपालपद दिले गेले नि दादांनी तेही स्वीकारले आणि ते तिकडे जाताच इकडे त्यांच्या विरोधकांनी (इं कॉं. तल्याच बर का !) मोर्चे बांधणी सुरू केली. परिणाम गेल्याच महिन्यात दिसून आला. दादांच्या बालेकिल्ल्या'त, त्यांचाच पुतण्या, दादांच्याच चाहत्या मतदारांनी पार भुईसपाट केला. दादांचे महाराष्ट्रातल्या राजकारणातले महत्व कमी करण्याचाच हा सगळा प्रकार दिसत नाही का ? आणि मुख्य म्हणजे दादासारख्या अनुभवी 'काठी' हाती असलेल्या व्यक्तींना हे कळू नये का ? कळले नसेल हे म्हणणे चूकच आहे. सत्तेपासून दूर राहता येत नाही हीच वस्तुस्थती आहे.

आता तर त्यांनी त्यांचे वारसदार शिवाजीराव पाटील निलंगेकर (नाही ! आता गायकवाड बरं का !) यांचे मुख्यमंत्रीपद खोक्यात येताच परत एकदा राज्यपालपदाचे भान विसरून महाराष्ट्राकडे धाव घेतली. त्यांनी मुख्यमंत्रीपदी निलंगेकरच हवे, असा पंतप्रधानांचाच खोटा निरोप सांगितल्याचे वृत्तपत्रात आले नि त्यांची धमरगुडी अद्याप थांबलेली नाही हेच स्पष्ट झाले.

शिवाजीराव पाटील (गायकवाड) यांनी ३ जून १९८५ ला दादांची गादी स्वीकारली. ते, आणखी एक 'बाबासाहेब', अशीच संभावना आधीपासून करण्यात आली. पण ते बाबासाहेबाइतके कोणताच 'बेस' नसलेले नव्हते हे त्यांनी गेले ८ महिने केलेल्या कारभारावरून स्पष्ट झाले. पण आपल्याच मुलीच्या डॉक्टरकीचे प्रकरण त्यांच्यावर चांगलेच शेकले नि महाराष्ट्रात स्थैर्य येते न येते तोच पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाची गादी दिल्ली फोनने दिलेल्या आदेशाने खाली करण्यात आली.

केंद्रात महाराष्ट्राचे बॅ. गाडगीळ, श्री. साठे, श्री. चव्हाण, नरसिंह राव यांसारखी मंडळी मंत्रीपदे भूषवित आहेत, याचेच एक समाधान रौप्य महोत्सवी वर्षात होते. पण हिमालयाकडे धावलेला सह्याद्री दुसऱ्यांदा परत महाराष्ट्रात आला. (यापूर्वी वसंतदादा परत आले होते. अर्थात ते केंद्रीय मंत्री नव्हते) आणि रौप्य महोत्सवी वर्षातले एक समाधान संपले. शंकरराव चव्हाण भारताचे गृहमंत्री म्हणून बऱ्यापैकी काम करीत होते. त्यांना कोणतेही प्रश्न सोडविता आलेले नाहीत. कोणतेही कठोर पाऊल (स्व. वल्लभभाईंप्रमाणे) त्यांना उचलता आलेले नसले तरी ते हळूहळू जम बसवित होते. त्यांना तो बसवताही आला असता, पण तेवढ्यात त्यांची स्वतःची फारशी इच्छा नसतानाही त्यांना परत यावे लागले.

श्री. शंकरराव चव्हाण यांना परत बोलवावे लागावे यात महाराष्ट्राची नामुष्कीच आहे. एक नेता महाराष्ट्रात मिळू शकला नाही ? एकदा या पदावर काम करून गेलेल्यांना परत बोलवावे लागावे ?

'युनो'त भाषण गाजवून आलेले सुशीलकुमार शिंदे नि स्व. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे पुतणे सुधाकरराव नाईक यांची नावे या स्पर्धेत आली नाहीत. शिंदेसारख्या व्यक्तीला इथल्या साखर, कॉटन वगैरे वगैरे लॉब्या मुख्यमंत्रीपदावर आरूढ होऊ देणे कठीणच होते. एका अर्थाने शिंदे व नाईक हे या स्पर्धेत होतेही. श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी तर ते मान्यच केले होते. 'निलंगेकर यांनी राजीनामा दिला म्हणून आपण स्पर्धेत आहोत. त्यांची एकमताने फेरनिवड झाली तर आपण माघार घेऊ' अशी मोघम भूमिका त्यांनी घेतली. श्री. नाईक यांनी स्पष्टपणे निलंगेकर यांनाच पाठिंबा दर्शवत स्पर्धेतून पाय काढून घेतला.

दिल्लीतून आलेल्या निरीक्षकांना आता उरलेली चार वर्षे समर्थपणे मुख्यमंत्रीपद सांभाळू शकेल असा माणूस हवा होता. त्यामुळेच तो शोध–तपास कठीण जात होता. शंकरराव चव्हाण यांनी १९७४–७७ या काळात मुख्यमंत्रीपद भूषविले होते. इं. कॉं. चे ते एकनिष्ठ कार्यकर्ते आहेत हे त्यांनी अनेकवेळा दाखवले आहे. (उदा. आणीबाणी व त्यानंतरचा काळ) म्हणून मग शेवटी त्यांचीच निवड झाली. परिणामी केंद्रात गेलेला माणूस पुन्हा महाराष्ट्रात परतला. (गेल्या वर्षी खासदार होऊन दिल्लीस गेलेल्या नि आमदार म्हणून परत महाराष्ट्रात परतलेल्या शरद पवारांची यावेळी 'उगाचच' आठवण होते)

या मुख्यमंत्री बदलामुळे काय वाटलें ? वाटले काय ते सांगणे कठीण आहे पण प्रश्न मात्र अनेक निर्माण झाले. आमचा महाराष्ट्र व आम्ही महाराष्ट्रीय माणस आता राष्ट्रीय नेतृत्व करायला नालायक ठरलो आहोत का ? ती कुवतच आमच्यात राहिली नाही का ? जिद्द नावाची आमच्यातली चीज दडलीय तरी कोठे ? यापुढेही आमच्या या महाराष्ट्रात आमचा नेता जात नि लॉबी या वरूनच ठरणार का ? तसे नसेल तर मग बॅ. गाडगीळ, श्री. साठे ही माणसे राज्याच्या नेतृत्वासाठी पाचारण का केली जाव नाहीत ? शिंदेंबाबत नेमके काय कमी पडले ? पण मग वाटत–राज्य नेतृत्वाबाबतचा हा घोळ राज्यातच मिटू शकत नाही. 'चान्स' मिळाला तर प्रत्येकालाच ते नेतेपद हवे आहे. आपापल्या चौकटीबाहेर कोणालाच पडायचे नाही. राज्यस्तरावरचे नेतृत्वच राज्यात निर्माण होत नाही. तर मग राष्ट्रीय नेतृत्वासारखी गोष्ट खूपच दूर राहिली. तूर्तास तिचा विचारही न करणे चांगले, नाही का ?

—अनिल शिंदे

# प्रतिकाराचे अंकुर

[ अलकनंदेच्या एका तीरावर वसलेल्या सात हजार फूट उंचीवरच्या एका दुर्गम गावातली ही गोष्ट. मोहन हा गावातला एक वनवासी. शेजारचं जंगल तोडलं त्यामुळे मोहनची शेतजमीन कोसळली. दोन मुलं आणि गरोदर बायको यांची सोय करण्यासाठी मोहन शहरात काम मिळतंय का बघायला गेला. इकडे गावात नदीला पूर आला आणि सगळी घरं उध्वस्त झाली. मोहनची बायको सोभती सरकारी मदत मिळेल या आशेवर कशीबशी तग धरून राहिली. पण गावचा मुखिया तिला ती मदत मिळू देईना. मदत मिळवण्यासाठी अब्रू विकायला काढायला सोभती तयार नव्हती. याच सुमाराला कुंवर आणि त्याचे साथीदार गावात पोचले. सोभतीनं आपली सारी कहाणी रडतरडत कुंवरला सांगितली. त्यानंतर...

एका प्रसिद्ध वनआंदोलनावरची ही छोटीशी कादंबरी. 'प्रतिकारके अंकुर' या मूळ हिंदी कादंबरीच्या मराठी अनुवादाचा पहिला भाग मागील अंकात प्रसिद्ध झाला. हा दुसरा भाग... ]

मूळ हिंदी लेखक : चंडीप्रसाद भट्ट
मराठी अनुवाद : कुसुम कर्णिक

कुंवर विचार करत होता. जे घडले तो काही ईश्वरी प्रकोप नव्हता, तर मानवाने निसर्गाशी अविचारपणे जे खेळ चालवले आहेत त्यांचा हा परिणाम आहे. यात गुन्हेगार मनुष्यच आहे. त्याच्या समजदार पंडितजींचे शब्द तो सर्वांना सांगत होता. जसा रस्त्याकरिता रोड साइड कंट्रोल कायदा बनवला आहे, तसाच नदीच्या व्यवस्थेकरिता रिवर साइड कंट्रोल कायदा बनवायला पाहिजे. तो सांगतो आहे की, आपण माणसे निसर्गाशी जे खेळ करतो आहोत त्यात बदल व्हायला पाहिजे. पण ऐकायला कोणाला फुरसत नाहीये.

अलकनंदा आणि तिच्या उपनद्यांमुळे दरवर्षीच काठावर मालमत्ता आणि जीवित हानी होत असते, तसा आता नियमच झाला होता. अलिकडे जून, जुलै, ऑगस्ट महिन्यात कुंवर या भागात धावपळ करत असतो. तशी तो आपदग्रस्तांची मदत तरी काय करणार. पण शेजाऱ्याच्या नात्याने त्यांच्या दुःखात सहभागी होत होता, त्यांचं सांत्वन करत होता एवढेच. पण खरे तर तो लोकांना या दुर्घटनेची खरी कारणे जाणवून देण्याच्या प्रयत्नात होता. पण बहुतेक वेळेला तो काय सांगत होता हे लोकांना समजतच नव्हते.

काही लोक या प्रकोपाचं खापर ईश्वराच्या माथ्यावर फोडत होते, तर काहीजणांना ते त्यांच्या कर्माचे फळ वाटत होते. सरकारी मदत ४० पासून २०० रु. पर्यंत मिळत होती. तेवढी मिळवून लोक कृतकृत्य होत होते. अशा वेळेला त्यांना आपल्या कल्याणकारी राज्याबद्दल अतिशय कृतज्ञता वाटत असे. अशा वेळी कोणी म्हणले की साऱ्याच दुर्घटना राजकर्त्यांच्या अज्ञानामुळेच घडल्या तर ते त्यांना फारच विसंगत वाटे. हाही या व्यवस्थापनेचाच दोष होता की वैज्ञानिकाचे लक्षही या दिशेकडे खेचले गेले नव्हते. खेचतीलही कशाला म्हणा? दरवर्षी या निमित्ताने लोकांवर उपकार करून अंकित करण्याकरिता अधिकाऱ्यांना रुपये, घोंगड्या मिळत होत्या. त्यांच्या समजुतीप्रमाणे जनता संपर्कासाठी शासनाला या इतका दुसरा कोणता मार्ग मिळणार होता?

ऑगस्ट महिन्यातली गोष्ट. एका चौरस्त्यावर कुंवर अशाच वादात पडला होता. 'माझ्याबरोबर चला म्हणजे तुम्हाला कळेल की या दुर्घटनेची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. सगळ्याचे खापर देवावर आणि निसर्गावर फोडायचे हा कुठला न्याय? त्यांच्या बाजूने बोलणारा कोणी असता तर त्याने तुमचे डोळे केव्हाच उघडले असते! ऐकणारा एक तरुण तोंड वाकडे करत म्हणाला, 'याचे हे नेहमीचेच रडगाणे आहे. आजच खबर आली आहे की घाटामध्ये भूस्खलन होऊन बरीच माणसे आणि जनावरे मेली आहेत. तेथे कोणते जंगल होते? आम्ही तर तिथे एकही झाड कधी पाहिले नव्हते?'

कुवरने ठरवले की सकाळच्या पहिल्या बसनेच घाटात तिकडे जायचे. बरोबर एक मित्रही होता. १२ मैल पायी चालल्यावर ते त्या गावाच्या वरच्या बाजूला जाऊन पोचले. तेथून मोटरचा रस्ता जात होता, तेथून खालच्या बाजूला साधारण १०० मिटरवर शेतामध्ये एक शाळा होती. त्या शाळेतच सर्व गावकऱ्यानी आसरा घेतला होता. जोपर्यंत गावकऱ्याचे पुनर्वसन करण्यासाठी योग्य जागा भेटत नाही, तोपर्यंत मुलाची सुट्टी करून टाकली होती. सडकेवर त्याना एक बाई भेटली, तिच्याजवळ त्यानी काय आणि कसे झाले याची चोकशी सुरू केली. काही सागण्याऐवजी तिने शाळेत थाबलेल्या गावकऱ्याना हाळी घातली की सरकारी लोक आले आहेत, इकडे या. दहाबारा लोक लगबगीने त्याच्याकडे आले. रडतरडत त्यानी सारी हकीकत सागितली. जी घरे आणि गोशाळा अजून उभे दिसतायत तेही धोका-दायकच आहेत. त्यामुळे गावकऱ्याना शाळेत आसरा द्यावा लागला आहे

कुवर खाली गावात आला. गाव कसला आता तो ? दलदल, दगडधोडे याच्या खाली गाडली–दबलेली वस्ती होती ती. गावाचे दुहेरी नुकसान झाले होते. लोक सागू लागले– त्या दिवशी रात्री १० वाजता त्यानी आपल्या पोरा-लेकराना कोसळणाऱ्या–बुडणाऱ्या घरा-तून वाचवून सुरक्षित ठिकाणी कसे तरी पोचवले होते. घरात झोपी गेलेली लेकरं गाडली गेली. जेव्हा हलकल्लोळ झाला तेव्हा आयानी या लेकराना बापाच्या भरोशावर सोडले होते, ती सारी गाडली गेली.

'तुम्हाला अगोदरपासून कल्पना नव्हती की तुमचं गाव धोक्यात होत ?' कुवरने प्रश्न केला. 'महाराज, काळाला कोणी अडवू शकते का ? जे घडणार होते ते घडले. आम्ही दरवर्षी दैवताची यथासाग पूजा करतो. पण या आजकालच्या पोराना कोणी काय सागावे ? आता आम्ही यांना हेच सांगत होतो की आणखी कोप व्हायला नको असला तर एक दिवस ठरवून परत पूजा घालूया. हे अगदी जागृत देवस्थान आहे. दोन तीन वृद्ध पुढे सरसावले.

कुवरची नजर सडकेवरून फिरत होती. त्याने म्हाताऱ्याला प्रश्न केला. 'बडाजी, हा गाव अगोदर वसलाय का अगोदर मोटर सडक बनली ?'

वृद्धाने त्याला प्रतिप्रश्न केला. तुम्हाला डोळ्याला दिसत नाही का ? आमचे गाव किती पिढ्यापासून येथे आहे. कोणी सागू सुद्धा शकणार नाही. इतके जुने आहे. ही सडक झालीय दोन वर्षापुर्वी, अजून तर तिच्यावर वाहतूकही सुरू नाही झाली

'सडक बनवताना हा पूल बरोबर तुमच्या घराच्या वरती तुम्ही कसा काय बनवू दिला? आजकाल घडताय त्याची जबाबदारी देवते-वर नाही, या पुलावर आहे. काम करणारे लोक काय आधळे होते की, बरोबर गावाच्या ठीक वरच्या बाजूला हा पाण्याला वाट देणारा पूल त्यानी बनवला. का त्यांना हुकूम मिळाला होता की या गावाची पुरी वाटच लावायची आहे तुम्ही लोक तर मेल्यावाणीच आहात हा पुल होत असताना दगा कसा नाही केलात ?' कुवर आवेशाने बोलत होता

'महाराज, सडक तर सरकारने बनवलीय. आम्ही दगा केला असता तर त्यानी आम्हा-लाच आत बद केले असते. त्या दिवसात सुरुंगाने उडणारे दगड लागून आमची जना-वरे जखमी झाली तर ते आम्हालाच धमक्या देत आम्हाला समजत होते की वरच्या पहाडातले सारे पाणी या पुलाखालून येणार आहे आणि ते येईल एवढ्या वेगाने, की सारं धुवून नेणार ते बरोबर. तुम्ही म्हणताहात ते अगदी मुद्याचं आहे बघा. पण सडक बनवणारे तर या गोष्टीचा विचारसुद्धा करायला नाहीत' खेडूत म्हणाले.

कुवर त्यांना समजावून सागू लागला, 'बघा तुमच्या गावाच्या वरच्या बाजूला हा जो दोन तीन मैल पसरलेला पहाड आहे, यावर एकतरी झाड दिसतय का ? वरपासून खालपर्यंत सगळा उघडाबोडका उतार. त्यावर कुठे पाणीही नाही. सारे ओहोळ सुकून गेले आहेत आम्ही सडकेवरून येत होतो, तेव्हा पाहिले की जिकडे तिकडे बाँजच्या झाडाची थोटी खोडे दिसतायत. झाडात पाणी धरून ठेवण्याची ताकद असते. जेव्हा जोराचा पाऊस पडतो तेव्हा जर झाडे असली तर पावसाचे थेंब जमिनीवर पडण्याआधी झाडाच्या पानां-वर आदळतात आणि मातीवर पडताना त्याचा वेग खूप कमी होतो. झाडातही रूंद पानाची झाडे अधिक उपयोगी असतात. तुम्हाला तर माहिती आहे की बाँजची पाने रूंद असतात. त्यात पावसाचा मारा सहन करण्याची शक्ती जास्त असते. तुमच्यातले म्हातारे लोक तर जाणतातच, की बाँजच्या रानातले पाणी अधिक चवदार आणि गोड असतं. शिवाय थड तर असतेच.' त्याचे म्हणणे पुरे व्हायच्या अगोदरच लोक बोलू लागले, 'महाराज, आमच्या या जगलात दोन ठिकाणी पूर्वी बारमाही पाण्याचे झरे होते. हे जगल कापल्यापासून ते पाणी नाहीसे झाले. आता फक्त पाऊस पडेल तेव्हाच तेथे पाणी भेटते'

'अस्स, म्हणजे इथे पूर्वी जगल होते तर' कुवरने कुतुहलाने विचारले.

'हा, हा. इथे बाँजचं जगल होतं. जेव्हा सडकेची मोजमाप सुरू झाली तेव्हा सर्वांनी विचार केला की या जगलाच आता काही खरं नाही. मग काय आजूबाजूच्या ४–५ गावानी खुल्लमखुल्ला झाडे तोडायला सुर-वात केली त्यातून जे उरले होते ते सारे सडक बनवायला आलेल्या मजुरानी साफ केले.' लोक सागत होते.

'छान, तुम्ही लोकानी अगदी निर्दयपणे या झाडाची कत्तल केलीत. आता या पहा-डानीही तुमच्या वरची माया काढून घेतली. यापुढे इथे तुम्हाला तुमच्या पोरालेकराना चागलं नादलेलं पहायच असेल, तर प्रथम या पहाडाला सजवा. झाडांनी त्याला चागला नटवा. झाडाना आपल्या प्रेमाची गरज असते तुम्हाला काय वाटते ? या झाडाचे सर्वात मोठे शत्रू आपण माणसे आहोत, की जे लहान लहान झाडेही निर्दयपणे छाटून टाकतो. तुम्ही लोकानी तर चागले वयात असलेले जगल तोडून टाकलेत. कसं वाटतय. जशी काय कोणी तरी या पहाडाची हजामत केली आहे. वस्ताऱ्याच्या जखमा व्हाव्यात तसे जागोजागी भूस्खलन झालेले दिसतेय. तिकडे पलिकडच्या पहाडावर बघा. तिथली गावं किती हरीभरी दिसतायत. तिथे काही नुक-सान झालय का बघा ? का नाही झाल त्याच नुकसान ? कारण तेथे गावाच्या वरच्या–खालच्या दोन्ही अगाला जगल शाबूत आहे मान्य आहे की सडक बनव-णाऱ्याच्या बेपर्वाईमुळे या पुलाच्या इथे बरेच सारे पाणी एकवटले आणि त्यामुळे तुमचे नुकसान झाले. पण तुम्हीच बघा तुमचा हा पहाड. कुठे वाचलाय का ? एकाद्या वाघाने

जनावराला पुरा जखमी करा॥ तस वाटतय बघून त्याच्याकडे ' कुवर बोलत होता.

गावातले लोक अस्वस्थ व्हायला लागले होते की अजून साहेब का येत नव्हता त्याना वाटत होते की हा साहेबाचा पट्टेवाला आहे. साहेब येतील आणि आपल्याला आपद्ग्रस्त म्हणून पैसे वाटतील, जमीन देतील. शेवटी न राहून लोकानी विचारले, 'साहेब कधी येतील ?' कुवरने स्पष्ट केले की तो साहेबही नाही की साहेबाचा पट्टेवालाही नाही. *त्याच्याच बाधवापैकी तो आहे आणि त्याचे* सात्वन करण्याकरिता आला आहे.

हे ऐकताच सारे उठले. पण तिघेजण तिथेच थाबले. त्याना कुवरजवळ बोलायचे होते. काही वेळ तसाच शाततेत गेल्यावर कुवरने विचारले, 'आता तुम्हा लोकाचे कसे काय होणार आहे ?' ते साग् लागले 'सरकारकडून ४०–४० रु. मिळाले आहेत. आम्ही गाव कुठे तरी सुरक्षित ठिकाणी वसवावे असा अर्जही केला होता. पण अस दिसतंय, आजूबाजूची गावं याकरिता नाखूष आहेत. आमचं काय होणार आम्हालाच कळत नाहीये ही जागा म्हणजे आम्हाला मसणवटाच आहे. रात्री आम्हाला मेलेल्याचे आवाज ऐकू येतात ' सुस्कारा टाकत त्यानी माना खाली घातल्या. कुवरने त्याना थोडी मदत दिली आणि तो पुढे निघाला.

या गोष्टीला दोन वर्षे होऊन गेलीयेत. पण अजून त्या गावाला सुरक्षित ठिकाण मिळाल नाहीये. दरवर्षी जास्त पावसाचे दिवस गाव रात्रदिवस जागून काढते. सडक खात्यानेही त्या पुलाचा काही बदोबस्त केला नाहीये. गावकऱ्यांचीही काही करण्याची हिम्मत झाली नाहीये. सरकारला तो पूल दुसऱ्या जागी बनवण्याकरिता त्यानी भाग पाडले नाहीये. कुवरच्या मनात हा प्रश्न सतत घोळतोय की, या गावाला सुरक्षित ठिकाण कुठे मिळणार ? सगळीकडे पहाड कोसळतायत. ज्या प्रमाणात आणि ज्या वेगाने हे सारे घडते आहे त्याचा विचार करता, लोकाना पहाडी मुलुख सोडून परागंदा व्हावे लागणार हे कुवरला कळून चुकले आहे.

या गावचा प्रश्न काहीसा वेगळा बनला आहे या गावाला साधारण दोन एकर जमीन घरे बाधण्यासाठी गावठाण म्हणून हवी आहे. दुसरी गावे त्याना आपल्या हद्दीत येऊ द्यायला अजिबात तयार नाहीत. जिथे जिथे त्यानी वस्ती करायचे प्रयत्न केले, तेथे तेथे लोकानी त्याना दगडधोडे मारून पळवून लावले. आता शेवटी त्यानी ईश्वराच्या भरोशावर स्वतःला सोडून दिले आहे.

त्या गावात असताना खबर मिळाली की *धारगांवच्या आसपासच्या भागात तबाही* झाली आहे. कुवर आणि त्याच्या मित्राने तिकडे जाण्याकरिता सडक सोडून पहाडातला रस्ता पत्करला.

बरेच उच चढ घेत घेत ते वरच्या भागात आले. एका चीडच्या (पाइन) जगलातून रस्ता जात होता. वाटेत एक झोपडी दिसली, तिथे ते थाबले. तेथे टरपेंटाइन काढणारे मजूर रहात होते. हे सारे मजूर हिमाचल प्रदेशातून इतक्या दूर मजुरी करायला आले होते. त्यांच्याबरोबर जेवण झाले त्याना चहापाण्याला पाच रुपये कुवरने दिले त्यावर ते खूष होऊन गेले. कुवर आणि मित्र निघाले तेव्हा मजूरही त्यांच्याबरोबर बाहेर पडले. स्वतःच्या हत्याराबरोबर त्यानी पाहुण्याचे पिठ्ठूही (पाठीवरच्या पिशव्या) उचलले. थोड्या काळात त्याची इतकी दिलजमाई झाली होती की जणू काही ते एका परिवारातले आहेत. एका तिठ्ठ्यावर सारे दम खायला बसले. तेथून कुवरला वरचा रस्ता पकडायचा होता. मजूर खालच्या बाजूला उतरायचे होते. ते बसले एवढ्यात जरा दूर बाजूला चीडचे एक झाड आपोआप आवाज करत खाली कोसळले. त्यांच्या धक्काने आणखी दोन झाडे जमीनदोस्त झाली. थोड्याशा वाऱ्याने अशी झाडे आपोआप पडलेली पाहून कुवर आश्चर्यचकित झाला. त्याच्या मित्राला तर ती भुताटकीच वाटली. मजुरांनी त्यांना समजावून सागितले की ते जगल आता तोडायचे आहे. याकरिता त्यांच्याकडील हिमाचल प्रदेशातली पद्धत येथे वापरली जात आहे. या पद्धतीने एकदोन वर्षात सर्व झाडे आपोआप साध्या वाऱ्याच्या झुळुकीनेही खाली पडतात. टरपेंटाइन काढण्याचा हा खास प्रकार आहे चीडच्या झाडावर या पद्धतीनुसार १० इंच लाब, ४ इच रुद आणि २ इच खोल असा घाव केला जातो, आणि त्यातून प्रमाणाबाहेर टरपेंटाइन काढले जाते खर तर नियमाप्रमाणे असे घाव घालता येत नाहीत. पण आमच्या मालकाच्या मोठमोठ्या टरपेंटाइनच्या फॅक्टऱ्या आहेत. त्याला पुष्कळ माल लागतो. आजकाल या धद्यात खूप फायदा आहे. म्हणून आम्ही एकाच्या जागी तीन तीन घाव घालतो. झाडे पडतील नाही तर काय होईल ? कर्मचाऱ्याचा फायदा होतो. मालकाच्या फॅक्टऱ्या चालू रहातात. आम्हाला दुप्पट मजुरी मिळते. मालक आम्हाला आमच्या घरून बोलावून घेऊन येतात त्यावेळी प्रत्येक मजुराच्या बदल्यात तीन तीन हजार रुपये देतात. आम्ही *जर इतक्या कष्टाने काम केले नाही, तर ती* उचल फिटायची केव्हा ? त्यानी सहजपणे सांगितले.

कुंवरच्या मनात कुतूहल निर्माण झालं. त्याने विचारले, 'तुमच्या भागतही लिसा असाच काढतात का ?'

'भैया, पूर्वी आमच्याकडेही असाच लिसा काढत होते. फार बरबादी होत होती. आमच्याकडे हे काम आता फारसं उरलं नाही म्हणून तर आम्ही इथे आलो आहोत. स्वतःच्या भागात थोडे पैसे कमी मिळाले तरी चालतात. घर सोडून दूर जाण कोणाला आवडतय ? पण आता आमच्याकडे कामधदाच मिळत नाही तर काय करावं ? पोटामागे कुठेही फिराव लागतय. आमचा कंत्राटदार चागला माणूस आहे आम्ही त्याच्याबरोबर गेली १५ वर्षे काम करत आहोत. हिमाचल प्रदेशात काम बद झाले, तेव्हापासून याच्याबरोबर आहोत आम्ही ' ते उत्साहाने सागत होते. तेवढ्यात मुकादमाची हाक आली आणि हत्यारे घेऊन मजूर चालू पडले.

कुवर आणि साथीदार चढ चढायला लागले वाटेत किती तरी झाडे अशीच उखडून पडलेली त्याना दिसत होती. या अगोदरही त्यानी कधी लक्षच दिले नव्हते. आता

## आम्ही एकाच्या जागी तीन-तीन घाव घालतो. झाडे पडतील नाही तर काय ?

मात्र ते बारकाईने त्या झाडाजवळ जाऊन बघत होते. घाव पडलेले मोजून नीट अदाज घेत होते.

अधार पडायला लागला होता. अजून १० मैल अतर काटायच होतं. शिवाय जंगलातला रस्ता. दोन मैल गेल्यावर त्यांना एक झोपडी दिसली, म्हणून रस्ता सोडून ते तिकडे वळले. बाहेर जगलखात्याचा चौकीदार उभा होता. रात्री तेथे रहाता येईल का असे त्यानी विचारायच्या आधीच चौकीदाराने चौकशी सुरू केली. कुणीकडचे, कुणीकडे चालले, अस भटकायच कारण काय ? त्याला जेव्हा कळले की हे आपदग्रस्ताच्या मदतीसाठी निघाले आहेत तेव्हा त्याने दोघाना आत अगत्यान बोलावलं. त्याच्या गप्पा सुरू झाल्या. चौकीदार सागू लागला खूप वर्षांपूर्वी तो शाळेत शिकत होता. तेव्हा त्याच्या गावात वरून माती कोसळली. सारे गाव त्याखाली दबून गेले. त्याच्या घरातली फक्त त्याची बहीण वाचली.

कुवरला काही जुन्या गोष्टी आठवल्या. १९६१ सालची गोष्ट. कुंवर त्याच्या काही मित्रावरोबर पायीपायी केदारनाथला निघाला होता. एका रात्री खूप पाऊस झाला. सकाळी उठले तरी पाऊस कोसळतच होता. मंदाकिनीचा हुकार वातावरणात घुमत होता. १० च्या सुमाराला पावसाचा जोर कमी पडल्यावर ते पुढे निघाले. रस्ते अडलेलेच होते. वरून कोसळलेल्या ढिगाना वळसे घालत, ओलाडत पुढे जावे लागत होते. वरच्या भागात एका गावात लोक हैराण झाले होते की, समोरचे गाव एकाएकी कुठे गायब झालंय. रात्री लोकानी तिथला उजेड बघितला होता; पण सकाळी बघतात तर गावाची नामोनिशाणी उरली नव्हती. लगबगीने कुंवर आणि त्याचे मित्र खाली मोटर सडकेवर आले. दोघेजण गावातच थाबले. रस्त्यावरून दोघेजण मदाकिनी ओलाडून पुढे जायला निघाले लोकानी सागितले. वाटेत ओढे इतके भरून वाहतायत की, त्यातून पार करणे मुश्कील आहे. दोन झुले ( झुलते पूल ) होते तेही वाहून गेले आहेत. वाटेत काही बाया रडताना दिसल्या. विचारल्यावर कळले की, त्या गावात त्याची मुलगी दिलेली आहे. सहा मैलाचा फेरा मारल्यावर एक झुला मिळाला. त्यावरून पलिकडे जाऊन गावात पोचायला संध्याकाळचे चार वाजले. फार भयानक दृष्य होते ते. त्या दिवसाची आठवण येऊन त्याच्या अंगावर काटा आला. घराच्या जागी दगडधोंड्याच्या राशी आणि चिखल-दलदल झाली होती. सारी कुटुबे नष्ट झाली होती. पलिकडच्या तीरावर जाण्याची काही संधीच मिळाली नव्हती त्या अभाग्याना. कशी कोण जाणे, एकच मुलगी जिवंत राहिली होती. बाकी सारे ढिगाखाली दबले तरी किंवा दलदलीत अडकून सपले होते. प्रेतावर गिधाडे घिरट्या घालायला लागली होती. एक बाई आपल्या तान्ह्याला पाजतानाच एका मोठ्या दगडाखाली मरून पडली होती.

हे सारे ऐकताना चौकीदाराचे डोळे डबडबून आले. तो हमसाहमशी रडायला लागला. त्याला आपल्या मृत स्वजनाची आठवण आली. ती आठवण कधी वरती येऊ नये असे त्याला वाटते. कधीही पूर आणि भूस्खलनाची बातमी ऐकली की, का कोण जाणे त्याच्या अगाला कापरे सुटते, स्मरणशक्तीला ताण दिल्यावर त्याच्या लक्षात आले की, कुवर त्याच्या लक्षात राहिला आहे. त्या दुर्दैवी दिवशी त्याला ती बातमी शाळेत मिळाली, तेव्हा एका शिक्षकाला घेऊन तो गावात आला होता तेव्हा रस्त्यावर परतून निघालेले कुंवर आणि त्याचा मित्र त्याला भेटले होते.

चौकीदार परत धाय मोकलून रडू लागला.

तो सागू लागला. ' त्या काळरात्री त्याच्या परिवारातल्या सर्व लोकानी एकत्रच प्राण सोडले. बहिणीने सागितले की, गावात दलदल चिखल भरायला लागली तसे सर्वजण मधल्या चौकात जमले. शेजारची चाची तिच्या बारक्या मुलाला घ्यायला आत गेली. तेवढ्यात वरून राडारोड्याचा मोठा ओघ आला. त्याच्या सपाट्यात सारे सापडले आणि मरून गेले त्याच्या बहिणीला कोणी धक्का देऊन दूर फेकले ते समजलेच नाही; पण ती १०० यार्डावर फेकली गेली, तिथेच रात्रभर बेशुद्धीत पडली होती ती. आज या साऱ्याची साक्षीदार ती जिवत आहे. भरल्या गळ्याने तो थाबून थाबून सारे सांगत होता आणि मधूनच शोक अनावर होऊन हमसाहमशी रडत होता.

मग कुवरने विषयच बदलला त्या रात्री ते दोघे चौकीदाराचे मेहमान बनले. थोड्या वेळाने कत्राटदाराचा मुकादमही तेथ आला. पावसानेही जोर धरला. .

कुवरने चौकीदाराला विचारले, ' काय रे, हा लिसाचा धदा कसा काय असतो ?

' काही विचारू नका या धद्यात आजकाल फार बरकत आहे. अस ऐकलय की लिसा २०० रु. क्विंटलने विकला जातो. मोठमोठे धनिक याचा ठेका उचलतात. सारा पैसा दोन–तीन कुटुबाच्या तिजोरीत जातो आहे. आमचा कत्राटदार पहिल्यादा होशियारपूरला रहात होता. आता दिल्ली, अमृतसर, डेहराडूनला त्याच्या मोठाल्या कोठ्या आहेत. हा आता कोट्याधीश बनला आहे आमचे सरकारही आधळेच आहे. याना कशाही प्रकारे लूटमार करायला सरकारने परवानगीच दिली आहे जशी. १०० वर्षाचे मोठे झाड आता याच्या तावडीत दोन वर्षात जमीनदोस्त होऊन जाते आहे. ' चौकीदार सागत होता.

' पण ही परवानगी आहे तरी कशी काय ?' कुवरने विचारले.

' भय्या, काय सागू तुम्हाला ? या भागात पूर्वीही लिसा काढला जात असे तो अतिशय व्यवस्थितपणे काढला जाई. लिसा काढत पण झाडाला नुकसान पोचत नसे. त्याचं अस होतं, की मुकादम लोक टेडरवर लिसा काढायचा ठेका घेत असत. सरकार त्या लिसाची किमत टेंडरवर लिहिलेल्या किमतीप्रमाणे देऊन लिसा खरेदी करत असे. हे खरे आहे की टेडर ४० रु चे निघाले तरी मुकादमाने मजुरांना कधी २०–२२ रु. वर पैसे दिले नाहीत त्यामुळे मजूर या धद्यात फारसे येत नसत. पण तरीही बराच लिसा निघत असे. पण अस कानावर येतय की अलिकडे हे मुकादमाऐवजी मोठे ठेकेदार हा वेगळ्या प्रकारचा ठेका उचलतात आणि हल्ली दोन–तीन वर्षात तर त्याची एकाधिकारशाहीच चालली आहे आमचे बडे साहेब कधी इकडं आले की त्याचे वागणं बघून आम्हाला अजब वाटते आमच्या खात्यातले सर्व लोक या ठेकेदाराना इतके घाबरून असतात को जणू काही हे त्याच्या हाताखालीच कामाला आहेत. पण भैय्या, या पहाडाची हजामत करण्याचा हा भयानक

रोग फैलावला आहे आता. यातून आपण कसे वाचणार आहोत ते एक भगवंतच जाणे. असं ऐकायला मिळालंय की आमच्यातल्या काही अधिकाऱ्यांना हे बिलकूल मान्य नाही. पण त्यांच्या डोक्यावर कोण आणखी बडा साहेब आहे काय माहिती ? त्याच्यापुढे यांचे काहीही चालत नाही. '

थोडे थांबून तो पुढे म्हणाला, 'तुम्हाला कळतेय का यातली खुबी ? याला भारित पद्धतीने लिसा काढणे म्हणतात. यात ठेकेदारांच्या टेंडरमध्ये एक अट असते. याबद्दल ठराविक प्रमाणात लिसा त्याला वनविभागाला द्यावा लागतो. बाकी जेवढा तो काढेल तेवढा त्या ठेकेदाराला मिळतो. यामुळे होते काय की ज्या झाडापासून वर्षाला दोन किलो लिसा काढायला हवा त्या झाडापासून ५–६ किलो लिसा काढला जातो. मजुराला जास्त मजुरीचे अमिष दाखवले जाते. ज्या झाडावर एक घाव घालायला हवा त्यावर चार–पाच घाव घातले जातात. तेही नियमापेक्षा मोठे आणि खोल. त्यामुळे झाडं आतून सुकून जातात. मग जरासा वारा सुटला की ही झाडे जमीनदोस्त होतात. तुम्ही येताना पाहिलेच असेल किती झाडं पडलीयत. ही झाडं तर थोड्याशा वाऱ्याने नाही तर आपोआप पडली आहेत. तुम्ही कल्पना करा चैत्र–वैशाखात आपल्याकडे जी वादळे होतात त्यात हे जंगल कसं काय तग धरणार आहे ? मला कळतच नाहीये की यापासून सरकारला काय मिळणार आहे ? मला तर दिसतय यात सरकारचा काही लाभ नाहीये. '

कुंवर सारे मन लावून ऐकत होता. त्याने चौकीदाराला मध्येच प्रश्न विचारला, 'हे ठेकेदार असे खोल घाव घालत असतात तेव्हा तुम्ही वरती तक्रार करत नाही ? आणि या पडलेल्या झाडांबद्दल तुम्हाला रिपोर्ट करावा नाही का लागत ?'

'भाईसाहेब, माझं काय सांगू तुम्हाला ? मला इथे बदलीवर यावं लागले ते याचमुळे. मी यांची ही खोटी कामे झाडांच्या नंबरासकट वरती कळवली आणि तीही रजिस्टर पत्राने. पण त्यामुळे ठेकेदाराचा केसही वाकडा झाला नाही. माझी मात्र १५ दिवसात त्या भागातून इकडे बदली झाली. ते वर मला धमकावत होते की, तुझी नोकरी-



वरून सुट्टी करून टाकू गडबड करशील तर. पण यांना माहिती नाही की मी जुना माणूस आहे खात्यातला. गाव बुडलं, त्या वर्षी मी शिक्षणाला रामराम ठोकला. पूरग्रस्त म्हणून मला लगेच नोकरी मिळाली. आता इथे ठेकेदाराच्या माणसातच रहातोय. इथला ठेकेदार चांगला माणूस आहे मुकादमाला त्याने सांगितलेले आहे, माझे जेवणही यांच्यातच होईल. इतकंच नाही तो जेव्हा दौऱ्यावर येतो तेव्हा मला ५० / १०० रुपये इनाम म्हणून ठेऊन जातो.' चौकीदाराने निष्पापपणे सांगितले.

रात्री कुंवरला झोप लागलीच नाही सारखा तळमळत कुशी बदलत तो विचार करत राहिला. स्वतःच्या क्षणिक स्वार्थाकरिता या अधिकारी हे सुंदर चीडचे जंगल या वनभक्षी वाघांच्या हातात का देतायत. खाली मंदाकिनीच्या तीरापासून वरपर्यंत साऱ्या वनपट्टीची त्याला दया येत होती. रात्रभर एक विचार त्याच्या डोक्यात घोळत राहिला दरवर्षी अलकनंदा आणि मंदाकिनीला पूर येतच रहाणार.

सकाळी लवकर उठून ५ वाजता त्यांनी पुढची वाट धरली. चौकीदार त्यांना थोड्या अंतरापर्यंत सोडायला आला. दोन मैलानतर चीडचे जंगल संपून बाँज–बुरास आणि काफल यांचं जंगल सुरू झाले. उन पडले होते. ते आता ६ हजार फूट उंचीवर होते. गावच्या बाया रस्सी आणि दरांती (दोरी आणि विळा) घेऊन जंगलात निघाल्या होत्या. चौकीदाराला पाहून त्या थबकल्या. तिथेच त्यांनी बैठक मारली आणि चौकीदार जाण्याची वाट बघत त्या बसल्या. 'ना काट ना काट झपन्यालो बाँज ! पिले दे भुली ठण्डो पानी ।' काही पोरींनी गाणे सुरू केले. चौकीदाराच्या लक्षात आले की त्याला चिडवायला बायांनी हे गाणं सुरू केलंय. तो स्वतःची बाजू कुंवरला सांगू लागला 'भय्या यांची आणि आम्हा जंगलवाल्यांची लढाई तर नेहमीचीच आहे. या तरी बिचाऱ्या काय करतील ? गवत नेलं नाही तर जनावरं तरी कशी जगवायची ? दूध कसं मिळवायचं ? घर कसं चालायचं ? आम्हालाही कळतंय ? आमचीही जनावरं आहेत. आम्ही काय सांगतोय यांना की, जरा नुकसान कमी होईल असं बघा. मोठ्या फांद्या कापू नका. तुमचं काम तुम्ही चालवा हां, जेव्हा आमचे साहेब येतात तेव्हा मात्र आम्हाला आडवावंच लागेल.' तोही माणुसकी दाखवून बोलत होता.

चौकीदार तिथेच थांबला. कुंवर आणि त्याच्या साथीदाराला आता खाली उताराला लागायचे होते. एकमेकाला पत्र पाठवण्याविषयी बजाऊन त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.

अकराच्या सुमाराला ते गावात पोचले. नवख्या लोकांना पाहून बरीच माणसे पेठेच्या चौकात जमा झाली. गावात फुटतूट झाल्यापासून दररोज कोणीना कोणी आपल्या नातेवाईकांची विचारपूस करण्याकरिता येत

होते, पण आज हे अपरिचित लोक पाहून सर्वांना वाटले की शेवटी सरकारी अधिकारी आपली चौकशी करायला आणि मदत करायला आले असणार. कुवर सरळ जाऊन पडक्या फुटक्या घराच्यामध्ये उभा राहिला. तीस दिवसापूर्वी या गावात १०० गुरे वाहून गेली होती, साठ एकर लागवडी खालची जमीन नष्ट झाली होती. तिचा कुठे मागमूस उरला नव्हता.

गावकरी भोवती जमून आपआपल्या नुकसानीची माहिती द्यायला लागले रात्री आठ वाजता ही भयानक दुर्घटना झाली होती. फक्त दोन घरवाले त्याची गुरे वाचवू शकले. बघता बघता चौदा बैलजोड्या, अकरा म्हशी, साठाहून अधिक बकऱ्या गोशाळासकट नष्ट झाल्या. काही घरेही वाहून गेली. धान्याची नासाडी झाली; पण गावात एकजूट चांगली होती. ज्याचे सर्वस्व वाहून गेले होते त्यांना इतरांनी जेवण वगैरे दिले. या गावात धान्य भरपूर पिकते. बहुतेक सर्व घरातून पुरुष माणसे सेनेत दाखल झाली आहेत. गावात धान्य विकत आणावे लागत नसे. लोकाचे दुख एकच होते लोक म्हणत होते 'आम्ही घरे कशीही बांधू, जनावरे पण जमवू पण अशी सुंदर उपजाऊ जमीन कोठून मिळणार ?' पाच घरं अशी होती की, ज्याच्याजवळ आता घर आणि गोशाळा बांधायलाही भूमी उरली नव्हती. समोरच्या बाजूला मोकळी जमीन होती; पण ती वनखात्याची होती. त्यानी कुवरला विनवून सागतले की ती जमीन त्याने मिळवून द्यावी. गावकऱ्यांना वाटत होते की कुवर सरकारचा माणूस आहे. त्याने किती वेळा त्यांना समजावून सांगितले; पण त्या साध्या सरळ माणसाना पटत नव्हते की नोकरी किंवा कोणाचा हुकूम नसताना इतक्या दूरवर कोण कशाला येईल. कुंवरने मान्य केलं की तो तसे विनंती पत्र वनखात्याला देईल.

इथल दृष्य कारुण्यपूर्णच होते. कुवर जायला निघाला तेव्हा साऱ्याच्या डोळ्यात पाणी उभ राहिलं. गावकरी म्हणत होते, 'दिवसाढवळ्या देवाने आम्हाला लुटलंय. आमचे बापजादे सागतात की गेल्या ५ पिढ्या आम्ही येथे राहात आहोत. आजूबाजूच्या गावातले लोक आमचा हेवा करायचे की आमची जमीन एवढी सुपीक म्हणून '

ज्या दिशेने पूर आला होता, त्या दिशेला कुवर निघाला. त्याच्याबरोबर गावातले तरुणही निघाले. जिथे पाणचक्या (हिमालयात धान्य दळण्यासाठी पूर्वीपासून पाणचक्या वापरल्या जातात. बारा महिने वाहणारा पाण्याचा स्त्रोत वापरून हे जाते फिरवले जाते) आणि गोशाळा होत्या तेथे त्याची नामोनिशाणीही उरली नव्हती. ज्या ओढ्यातून गरमीच्या दिवसात मुष्किलीने १-२ इंच पाणी वहात असे, असल्या बारीक ओढ्याने जलप्रलय आणि विनाश आणला होता. ज्यानी हे ओढे अगोदर पाहिले होते, त्याना हा विश्वास बसत नव्हता की या बारक्या ओढ्यानी इतक्या घरांची पडझड केली होती. आता या ओढ्याचे पात्र रुद होऊन फर्लांगभर रुंदीचे बनले होते

एक मैल गेल्यावर त्याना पहाड लागला. इथून काही लोक गावाकडे परत गेले. बाकीचे पुढे निघाले वाटेत नऊदहा घरे पडलेली दिसली. लोकानी सागितलं, 'त्या रात्री परिस्थिती फार भयानक होती. प्रथम वरच्या कड्यावरुन माती वहात आली. मग दगडधोंडे खाली यायला लागले. एकाएकी चिखल राडा एवढा वाढला की घाबरून काही लोक झोपेतून उठून कसेबसे आसऱ्याला गेले, पण बाकीचे जनावराबरोबर गाडले गेले.'

कुवर आणि इतरजण आणखी पुढे निघाले. कड्याच्या वरच्या बाजूला सपाटीवर घनदाट जगल होते. गेल्या साली तेथूनच मोटरसडक बनली. समोरच्या उतारावर एक छोटा पूल बनवलेला दिसला. त्या पुलाखालूनच पाण्याचा नवीन लोंढा सुरू झाला होता त्यानेच पाण्याबरोबर पूर्ण रस्त्यावरचा आणि पहाडातला गाळ एकत्र केला होता. आणि त्याचा तो मोठा बनलेला ओघ साऱ्या विनाशाला कारण झाला होता. 'या ठेकेदार, इंजिनियर आणि मुकादम लोकाची घरं जर पुलाच्या खाली असती तर त्यानी बनवला असता का हा पूल '—कुवर विचार करीत होता 'इतकं हृदयशून्य निर्दय कसे असतील हे लोक ?' लोक सागत होते, 'या लोकांना हे कळत नव्हते असे नाही; पण आमच्या गावची इतकी चागली सुपीक जमीन होती ना ? म्हणून हे सारं केल त्यानी '

कुवर चिडून म्हणाला, 'या सर्वांवर खटले भरायला पाहिजेत, हत्या आणि नुकसानीकरिता. या मूर्ख, नासमज आणि नालायक लोकामुळे हा विनाश फार वाढला.'

'अरे बाबा, कोणाकोणावर खटले भरशील ? रस्ते बनवणाऱ्यावर, झाडं तोडणाऱ्यांवर, चोरून जगल कापणाऱ्यावर. तुमच्या कोर्टात असले कायदे आहेत का ? लोक तुम्हाला वेड्यात काढतील ' त्याच्या सोबतच्या लोकानी त्याचीच चेष्टा केली. 'ही दुनिया आहे, हे असेच चालणार. याना विचारणारा कोण आहे ? जिथे रोग्यालाच कल्पना नाही की त्याला १०५° ताप आहे; तर डॉक्टरला काय काळजी असणार ?' एक जण विनोदाने म्हणाला.

मोटर सडकेपासून गावकरी परत गेले. सडक जागोजागी तुटली होती. वाहतूक बंद पडली होती. त्यामुळे पायी जाण्याशिवाय पर्यायच नव्हता. वाटेत गवतचारा आणायला निघालेल्या बाया भेटल्या. कुवरने त्याना प्रश्न केला—'बायानो मोठमोठ्या फाद्या कशाला तोडता ?'

'नाही तर काम कस चालणार?' कुंवरने त्याना समजावून सागितले, 'झाड जेव्हा पूर्ण वयाच होत तेव्हाच आवश्यकता वाटली तर ते कापल पाहिजे. ही झाड फार मोलाची आहेत. याच्यापासून एकापेक्षा एक किंमती वस्तू बनतात.'

एका बाईने त्याला मध्येच थांबवले, 'भाडमध्ये गेल तुमच किंमती सामान, आमच्या घरवाल्याना, मुलाना पोट जाळायला शेवटी मैदानातच जावे लागते ना ? या झाडानी आम्हाला दुःखच दिलंय ' मग बोलण न वाढवता कुवर तसाच पुढे निघाला. त्याना अजून बरच दूर जायच होत.

घरी पोचल्यावर कुवरने कबूल केल्याप्रमाणे वनखात्याला विनती अर्ज पाठवायला सुरुवात केली. तो खूप नम्रतेने लिहीत असे की, तिथल्या लोकाजवळ जनावरे बांधायलाही जागा नाही लोक खूप सकटात आहेत. आपण मदत केलीत तर त्याच्यावर फार मोठे उपकार होतील. अधिकाऱ्यासमोर त्याने झालेल्या विनाशाचे फार मार्मिक चित्र माडले होते. त्यांनीही लगेच कारवाई करण्याचे आश्वासन दिले. त्यानी सागितले की,

हे एवढे आम्ही करू; पण पुढचे तुम्ही बघून घ्या.'

एक महिना उलटल्यानंतर त्या गावातले चार लोक कुंवरकडे आले. त्यांनी वनखात्याला अर्ज केला होता. बरेच खेटे घातल्यावर त्यांना तेच उत्तर मिळाले होते. 'आम्ही कार्यवाही केली आहे. पण वरून अजून उत्तर आले नाहीये!' कुंवरला या वरच्या लोकांची करतूक चांगलीच माहित होती. त्याने मोठी रंगवून वरच्या लोकांची कहाणी सर्वांना ऐकवली.

'या वरच्यांचं काही बोलूच नका. एकदा आम्ही त्यांच्या दरबारात गेलो होतो. एक तास ताटकळत बसल्यानंतर भेटायला बोलावले. आम्ही घाबरतच आत गेलो. मन लावून आमचं म्हणणं त्यांच्यापुढे मांडलं. सांगितलं की, आमच्यावर अन्याय होतो आहे. तुमच्या धोरणांमुळे आमचे लोक बेकार होतायत. आमच्या गाऱ्हाण्यावर जरा विचार करा. आम्ही काम करायला तयार आहोत. आम्हाला सालभर काम द्या.' त्यावर उत्तर दिलं यांनी 'तुम्हाला धंदे सुरू करायला सांगितलं कोणी? यात आमची काही जबाबदारी नाही.' मग त्या साहेबांनी सिगरेट पेटवली आणि आमच्याकडे ते धूर सोडत राहिले. दहा मिनिटे आम्ही तसेच बसून राहिलो. आमचे हाल त्यांना सांगत राहिलो. पण त्यांनी तोंड फिरवले. आम्हाला नाईलाजाने उठावे लागले. जाताजाता आम्ही धमकीही दिली, की यापुढे तुमच्या दारात आम्ही येणार नाही; पण त्याचा त्यांच्यावर काही परिणाम झाला नाही. आपण लोक त्यांच्याकडे गेलो नाही तर त्यांचे काहीही काम अडणार नाहीये. आमच्याकरिता त्या चपराशाला बोलणो बसली की त्याने आम्हाला आतच का सोडले? तेव्हापासून आम्ही या वरच्या लोकांना भेटायचंच सोडलंय? पण लिहायचं मात्र सोडत नाहीये. मग त्याचं काय सांगावं. आमच्या विनंती अर्जाचे उत्तर खूप तोलून मापून आणि शास्त्रीय आधारावर आम्हाला मिळाले. त्या वरच्या महाशयांनी लिहिले की वनविज्ञानाच्या दृष्टीतून तुमची मागणी मान्य करता येत नाही. बस एवढे हे एका ओळीचं पत्र आम्हाला मिळालं. मला काळजी आहे की तुम्हालाही हे असेच काही तरी उत्तर मिळालं नाही म्हणजे झालं. काही कळत नाही की या प्रश्नाचं उत्तर कसं मिळवावं? आहे का काही रस्ता? जबरदस्ती जमीन बळकावली तर? मला या वनतज्ज्ञांची मोठी चिंता वाटते. यांच्या वनशास्त्रात वनवासी लोकांच्या हिताची काही व्यवस्था असेल का? कारखानदार आणि ठेकेदार यांच्या हिताची काळजी करणे एवढीच यांची मर्यादा!'

मध्यंतरी अधिकाऱ्यांनी लोकांना कच्ची घरं बांधण्याची परवानगी दिली. पण वरून परवानगी येईपर्यंत पक्की घरं आणि गोशाळा मात्र बांधू नका म्हणून बजावले, नाहीतर त्यांच्या नोकरीवर गदा येईल. गावकऱ्यांनी त्यांचे मनापासून आभार मानले आणि ते घरी परतले.

कुंवर घरी आला. मनात कष्टी झाला होता की स्थानिक अधिकाऱ्याला नाराज करावं लागलं. पण असंही वाटत होतं की किती दिवस हे असं मनातलं दुःख मनात ठेवून जगत रहायचं. काही असो गावकऱ्यांनी थोडी फार सोय तर लागली तो विचार करत असे, की या सरकारी दप्तर दिरंगाईत जर काही बदल घडवून आणायचा असला तर तो खालूनच घडवावा लागेल. खालच्या अधिकाऱ्यांनी वरच्या अधिकाऱ्याला जर वास्तव परिस्थिती नीट समजावून दिली तर बऱ्याचशा अडचणी सुटतील. असली छोटी मोठी कामे म्हणजे तसं पाहिलं तर नुसती ठिगळं जोडणं आहे. इथल्या अधिकाऱ्यांनी सगळीकडे दांडोरा पिटलाय आधीच की इथले लोक काही कामाचे नाहीयेत. नुसतं दुकानात बसून राहायचं, पत्ते कुटायचे, रिकाम टवळ्या गप्पा करायच्या हेच यांचे काम. असलो. टीका टिप्पणी तर नेहमीच ऐकायला लागते. तो त्रासून जात असे. तो खूप सांगायचा प्रयत्न करायचा. पण ज्यांनी हे असले गैरसमज मुद्दाम पसरवले आहेत, ते त्याचं कशाला ऐकतील. मग ते विकासखाते असू दे, नाही तर सार्वजनिक बांधकाम नाही तर वनखाते असू दे. सर्वांची धारणा एकच. आज जवळजवळ सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या आपल्या पसंतीचे ठेकेदार तयार करून ठेवले आहेत. बहुधा हे त्यांचे मित्र तरी होते किंवा नातेवाईक तरी होते. गम्मत म्हणजे हे सारे इतके व्यवस्थित चालले आहे की, जर एखाद्या अधिकाऱ्याची बदली झाली तर त्याचा ठेकेदार त्याच्या दोन–तीन महिने अगोदर नाही तर नंतर त्याच्या बदलीच्या ठिकाणी जाऊन पोचलेला असतो पहिले ५–६ महिने नाटक चालतं की जसे हे एकमेकांच्या ओळखीचे नाहीतच. कधी आपापसात हिश्श्यावरून कचेरीत नोकरवर्गात धुसफूस होते म्हणून तर कधी अधिकाऱ्यांची बदली झाल्याझाल्या ठेकेदार गायब होता म्हणून, पण हे बिंग फुटते आणि लोकांना हे कळते. पण हे लपवण्यासाठी हा सारा खेळ चालतो. यामुळे स्थानिक लोकाना कोणत्याही योजनांचा पत्ता लागू दिला जात नाही. अगोदरच हा भाग मागास आणि हे असेच चालले तर... **(अपूर्ण)**






## एक विचारप्रधान ललित लेखसंग्रह

# संघातले दिवस

'संघातले दिवस आणि इतर लेख' या नावाचं प्रा. स. ह. देशपांडे यांचं आठवणीवजा आणि वैचारिक स्वरूपाचं पुस्तक प्रकाशित होऊन तीन-साडेतीन वर्षे झाली. पुस्तकात 'संघातले दिवस', 'कोसबाड आणि आसपास', 'युवकांचे ग्रामीण कार्य' आणि 'इस्रायली किबुट्झ्' असे चार भिन्न विषयांवरचे लेख समाविष्ट आहेत. पैकी 'संघातले दिवस' हा १९७४ मध्ये प्रसिद्ध झालेला सर्वाधिक मोठा लेख आरंभी छापलेला आहे व ही गोष्ट औचित्याला धरून अशीच आहे. पुस्तकाचे लेखक आज बासष्ट वर्षांचे आहेत आणि कृषि-अर्थशास्त्र हा त्यांचा विशेष अभ्यासाचा विषय आहे. शिरवळ आणि पुणे या दोन ठिकाणी त्यांच्या वयाची वीसएक वर्षे गेलेली आहेत. पुण्याच्या नू. म. वि. आणि स. प. कॉलेजच्या संघप्रधान वातावरणात वाढलेले प्रा. देशपांडे भावी काळात संघविरोधी नव्हे, पण संघविन्मुख का झाले याचे उत्तर त्यांच्या या कसदार वैचारिक लेखसंग्रहात मिळू शकते, पण हा या पुस्तकासंबंधीचा गौण मुद्दा आहे. पुस्तकाचं महत्त्व आहे ते प्रा. देशपांडे यांच्या समाजचळवळीतील सच्च्या अनुभवांना, त्या अनुभवांच्या मुक्त निर्भीड प्रकटीकरणाला आणि त्यांच्या व्यापक डोळस अशा समाजदृष्टीला. विषयदृष्ट्या चारी लेख अलग वाटले, तरी त्या सर्वांना एकत्र गुंफणारा समाज परिवर्तनाचा एक समान धागा आहे. शेवटचा 'किबुट्झ्' वरला लेख हा अभ्यासाधिष्ठित आहे, तर पहिले तीन प्राधान्याने अनुभवाधिष्ठित आहेत.

'संघातले दिवस' हा प्रदीर्घ लेख पुस्तकातला सर्वात महत्त्वाचा लेख आहे. प्रा. देशपांडे ऐन तारुण्यात सात-आठ वर्षे संघाचे एक क्रियाशील कार्यकर्ते होते. या आठ वर्षातील मैत्रीच्या आठवणी, संघाचे ध्येय, कार्यपद्धती, संघासंबंधी स्वतःची बदलत गेलेली मते, संघाचे बदलते नेतृत्व, त्याचे बदलते स्वरूप, आणि संघावरील आक्षेपातील तथ्यातथ्य इ. अनेक विषयांची या लेखात प्रामाणिक, सरळपणे केलेली बौद्धिक चर्चा आहे. प्रस्तावनावार डॉ. विद्याधर पुंडलिक यांनी देशपांडे यांच्या लेखाचे स्वरूप मार्मिकपणे उलगडून दाखवलं आहे. त्यांच्या मताशी कोणीही सहमत होईल. 'या लेखात ललित आणि वैचारिक यांची अनुसंधाने नीट जुळल्यामुळे तो दुभंगला गेला नाही'—हा पुंडलिकांचा लेखाविषयीचा सारभूत अभिप्राय योग्य वाटतो.

या लेखातील काही निष्ठावान संघकार्यकर्त्यांची शब्दचित्रं म्हणजे लेखाच्या वैचारिक आशयाला लावलेलं एक ऊवदार मखमली अस्तरच वाटतं. डॉ. हेगडेवार आणि श्रीगुरुजी यांच्या कार्यपद्धतीची आणि बौद्धिक ठेवणीची प्रा. देशपांडे यांनी केलेली मीमांसा मार्मिक, अचूक अशीच आहे. ती वाचून बाळासाहेब देवरसांसंबंधी त्यांचे मत अधिक अनुकूलपणे व्यक्त झाले असते असे अनुमान काढण्यास हरकत नाही. संघ हा राष्ट्रीय आंदोलनापासून अलिप्त राहिला, संघात स्वतंत्र विचारशक्तीची वाढ होऊ शकत नाही आणि संघ हा आधुनिकतेपासून दूर राहिलेला आहे हे लेखकाचे संघावरील मुख्य आक्षेप आहेत, व बहुतांशी ते पटण्यासारखे आहेत. पण हे आक्षेप नमूद करूनही लेखकाने संघसहवासामुळे झालेले लाभही मोकळेपणे कबूल केले आहेत. या लेखाला पुरवणी म्हणून कालांतराने जो भाग जोडला आहे त्यात श्री. देशपांडे 'संघाने ब्राह्मणेतरांना हेतूपूर्वक अव्हेरिले असे मला वाटत नाही. संघात जातीचा उच्चार किंवा उल्लेख चुकूनही होत नसे' (पृ. ४५) अशी प्रांजळ कबुली देतात आणि पुढे 'जातिप्रथेच्या दुष्परिणामांचे व्यापक सामाजिक आकलन करून घेण्याचा त्याने प्रयत्न केला नाही आणि <u>संघशाखेबाहेर</u> कसलीही हालचाल केली नाही. म्हणजे खऱ्या अर्थाने त्याने हिंदुसंघटनही केले नाही.' असा भेदक निष्कर्षही काढतात. 'संघशाखेबाहेर' हा शब्द मी अधोरेखीत केलेला आहे. कारण देशपांडे यांचेप्रमाणेच माझ्यासारख्या एकेकाळच्या संघस्वयंसेवकालाही शाखेबाहेरही हिंदुसंघटनेचे फार मोठे कार्य आहे असे वाटत आले आहे.

प्रा. देशपांडे यांची प्रतिमा आजतरी संघवाले किंवा हिंदुत्वनिष्ठ अशी नाही. समाजवादाकडेच त्यांचा एकूण मोहरा वळलेला दिसतो; पण असे असूनही पृ ४७ वर त्यांनी मुसलमानांसंबंधी आपली वस्तुनिष्ठ मते स्पष्ट मांडून संघाच्या हिंदुत्ववादी भूमिकेला नकळत न्याय दिला आहे. ती मते अशी— 'बहुसंख्य मुसलमान समाज आजच्या घडीला तरी भारतावर आपल्या निष्ठा सर्वस्वी वाहण्यास तयार नाही, ही एक वस्तुस्थिती म्हणून मी मानतो. ती लक्षात घेता ह्या देशाचे संरक्षण, शांतता व प्रगती या दृष्टींनी लोकसंख्येतील मुसलमानांचे प्रमाण वाढत जाणे ही गोष्ट मला अनिष्ट वाटते. म्हणून कुटुंबनियोजन, धर्मांतर, शुद्धी यात्राबत हिंदुत्ववादी म्हणून जी मते मांडण्यात येतात, ती थोड्याफार फरकाने मला मान्य आहेत!' संघाचा हिंदुसंघटनेवर, म्हणजेच हिंदू तेवढा एक या प्रचारावर भर का याचे उत्तर वरील विधानात लेखकानेच शेवटी दिले हे फार चांगले झाले. पृ. ४८ वरील दुसऱ्या परिच्छेदात प्रा. देशपांडे यांनी संघाची उद्दिष्टचे, कार्यपद्धती आणि संघकार्याचे यशापयश यासंबंधी आपली मते साररूपाने स्पष्ट शब्दात मांडली आहेत. ममत्वबुद्धीने मांडलेल्या या मतांचा संघाच्या आजच्या नेतृत्वाने अवश्य विचार करावा.

### रचनात्मक पुनरुत्थान

'कोसबाड आणि आसपास' हा पुस्तकातला दोघा सहकाऱ्यांच्या सहकार्याने लिहिलेला लेख, म्हणजे ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण किंबहुना आदिवासी भागात स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या आर्थिक नि सामाजिक पुनरुत्थाची एक गौरवकथा आहे. गोदावरी परुळेकर यांचे 'जेव्हा माणूस जागा होतो' हे मान्यताप्राप्त पुस्तक मुख्यतः आदिवासींचे दैन्य, पिळवणूक आणि त्यांच्यात कम्युनिस्ट तंत्रपद्धतीने केलेल्या जागृतीचं चित्र उभं करतं. प्रा. देशपांडे यांचा भर या मागासलेल्या समाजात काही ध्येयवादी, त्यागी

समाजसेवकानी जी शैक्षणिक जागृती केली तिची सांगोपाग माहिती देण्यावर आहे. मागासलेला माणूस जागा झाल्यावर पुढे त्याच्या मनाची मशागत करण आणि त्याला शेती, उद्योग इत्यादी उपजीविकेच्या नव्या आधुनिक वाटा दाखविण हे खर महत्त्वाचं स्थायी स्वरूपाच कार्य असतं. कोसबाड, बोर्डी भागात कृष्णराव चित्रे, हरिश्चंद्र पाटील, शकरराव भिसे, खडेरावदादा सावे, त्रिंबकराव कुलकर्णी, जयंतराव पाटील, ताराबाई मोडक, गिजुभाई बधेका, अनुताई वाघ इत्यादी महाभागानी ध्येयवेडाने जे रचनात्मक कार्य केलं त्या कार्याचे धावते, पण अतिशय बोलके, प्रेरक असे आलोचन प्रा. देशपाडे यांनी मोठ्या आस्थेवाईकपणे केल आहे श्री. देशपाडे याना सघशाखेबाहेरचं रा. स्व. सघाचं जं कार्य अभिप्रेत आहे ते हेच असाव 'युवकाचे ग्रामीण कार्य' ह्या पुढल्या लेखनात त्यानी ग्रामीण भागातील योजनाबद्ध कार्यात ( रा. प योजना ) आलेले काही कटुगोड अनुभव कथन केले आहेत, ते वाचताना युवाशक्तीचे त्यानी जे भलेबुरे चित्र रेखाटले ते खचित अतर्मुख करणारे आहे.

पुस्तकातला शेवटचा चौथा लेख 'इस्त्रायली किबुट्झ' हा प्राय: अनुवादात्मक असून त्यात वाळवटी इस्त्रायली किबुट्झ या समाजवादी वेगळ्या धर्तीच्या प्रयोगाची सर्वांगीण विवेचक ओळख करून देण्यात आली आहे. प्रस्तुत प्रयोगाची महती श्री. देशपाडे याच्या शब्दातच देणे उपयुक्त ठरेल.

'खरा वर्गविहीन समाज पृथ्वीच्या पाठीवर कुठे असेल तर किबुट्झमध्ये असे छातीठोकपणे म्हणता येईल. इस्त्रायलमधील शिक्षणपद्धतीवर किबुट्झचा मोठा प्रभाव पडलेला आहे. कर्तृत्वाचा हा सगळा बहर संपूर्ण लोकशाहीच्या व नुसत्या आर्थिकच नव्हे, तर सामाजिक समतेच्या वातावरणात घडून आलेला आहे किबुट्झ लोकशाही ही प्रत्यक्ष लोकशाही आहे या चळवळीत अल्पसख्य मार्क्सवादी किबुट्झ आहेत. रशियन सामुदायिक शेती सक्तीची आहे उलट किबुट्झच नव्हे तर इस्त्रायलमधील इतर प्रकारही सदस्यांनी स्वेच्छेने अगीकृत केलेले आहेत. थोडक्यात किबुट्झची रचना को-ऑपरेटिव्ह कलेक्टिव्ह याच्याही पुढची म्हणजे 'कम्यून'ची ( समवायाची ) आहे साम्यवाद प्रत्यक्षात आणणे हा तिचा मुख्य उद्देश नव्हता. मुख्य उद्देश नव्या ज्यू राष्ट्राची उभारणी करणे हा होता आणि ह्या अर्थाने तिचा साम्यवाद साध्यरूप नसून साधनरूप होता.'

किबुट्झ चळवळीचा लेखकाच्या दृष्टीने मुख्य अर्थ समाजवादी असण्यापेक्षा राष्ट्रवादी आहे 'एकोणिसाव्या शतकात निर्माण झालेल्या, ज्यू राष्ट्रवादाचा एक परिस्थितीसापेक्ष पण उत्कट आविष्कार' या शब्दात शेवटी लेखक या विषयासबधीचा मुख्यार्थ सागतो. 'संघातले दिवस' आणि इस्त्रायली किबुट्झ' या दोन्ही लेखात राष्ट्रवादावरचे काही एक आतरिक समानसूत्र असल्याचे श्री. देशपाडे याना सुचवावयाचे आहे की काय न कळे. हे दोन्ही लेख अनुभव, अवलोकन आणि अभ्यास यावर अधिष्ठित असल्याने आणि विशेष म्हणजे समाजपरिवर्तनाच्या उर्मीने ते लिहिले असल्यामुळे, युवकवाचकानी त्यासकट हे सारे पुस्तक मननपूर्वक वाचावे. पुस्तकाइतकीच डॉ. विद्याधर पुडलिक यांची प्रस्तावनाही विचारप्रवर्तक आहे.

—म. श्री. दीक्षित

सघातले दिवस आणि इतर लेख
ले. स. ह. देशपाडे
सुपर्ण प्रकाशन, पुणे
मूल्य . पसतीस रुपये

## स्त्री मुक्ती लढ्याची दिशा

'**स्त्री** मुक्ती केव्हा व कशी ?' हे सुशीला गोखले पटेल यांचं पुस्तक एका विशिष्ट दृष्टिकोनातून लिहिलेलं आहे. आज अनेक सघटना स्त्री मुक्तीच्या कार्याला गती देण्याचा प्रयत्न करीत आहेत. या सगळ्या सघटनांना वैचारिक एकतेची बैठक आवश्यक आहे. समाजवाद हे एक समान सूत्र सर्वांच्या डोळ्यापुढे आहेच; पण समाजवादाची विविध अगे आहेत. या पुस्तकाचा जन्म झाला आहे, तो समाजवादी विचार प्रवाहामध्ये मार्क्सवाद हा सर्वात शास्त्रीय आहे असे मानून. सोविएत युनियन हा एक 'नमुना' म्हणून डोळ्यापुढे ठेवून स्त्रीमुक्तीसाठी काम करणाऱ्या इतर सघटनाशी यादृष्टीने सवाद साधता यावा यासाठी ! पुस्तकाच्या प्रकाशिका मंजू गाधी यानी या पुस्तकाच्या लेखनामागील भूमिका वरीलप्रमाणे सुरुवातीला स्पष्ट केली आहे. सौदामिनी राव याची स्त्री-मुक्ती लढ्याचा थोडक्यात परामर्ष घेणारी प्रस्तावनाही पुस्तकाला आहे.

पुस्तकाच्या दहा प्रकरणामध्ये भारतीय स्त्रियाच्या सध्याच्या दयनीय परिस्थितीपासून सुरुवात करून, शेवटी स्त्रीमुक्तीच्या लढ्याची योग्य दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. यात स्त्री-पुरुष सबध व कुटुबव्यवस्था ह्याचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. त्याचप्रमाणे सरंजामशाहीत शोषक व शोषित असे दोन वर्ग असल्यामुळे स्त्री ही शोषित कशी बनली, कोणकोणत्या गोष्टीमुळे तिची पिळवणूक होऊ लागली याचे वर्णन आले आहे. औद्योगिक क्रातीनतर अर्थार्जनासाठी घराबाहेर पडल्यानतरही स्त्रीची दु:खे कमी तर झाली नाहीतच, उलट स्त्री-शरीर हे भांडवल समजून त्यावर आधारलेले उद्योगधंदे उभारले जाऊ लागले. घराबाहेर पडली तरी स्त्री स्वतंत्र झालीच नाही.कारण स्त्रीकडे पहाण्याची दृष्टी आणि तिला वागवण्याची' रीत यात काहीच फरक पडला नाही. या पार्श्वभूमीवर स्त्री-मुक्तीबाबतची मार्क्सवादी भूमिका एका प्रकरणात स्पष्ट केली आहे आणि सोविएत युनियन मधील स्त्रियांच्या प्रगतीची माहितीही दिली आहे. समाजवादी देश व भाडवलशाही देश या दोन्ही देशात सामाजिक उत्पादनात भाग घेणाऱ्या स्त्रियाना मिळणाऱ्या सोयी-सवलतीमध्ये फरक आहे. किंबहुना भाडवलशाही देशात म्हणजे अमेरिकेत व भारतात नोकरी करणाऱ्या स्त्रियाची कौटुबिक जबाबदारी, मुलाच्या सगोपनाची जबाबदारी कमी व्हावी. यासाठी काहीही केले जात नाही. बाळतपणाची रजा, पाळणाघराची सोय याकडे योग्य ते लक्ष पुरविले जात नाही, ही वस्तुस्थिती लेखिकेने नोंदवली आहे. 'स्त्रिया व घरकामाचे वेतन' या प्रकरणात छाया दातार यांच्या स्त्रीवादी भूमिकेचा, या प्रश्नाच्या संदर्भात उहापोह केला आहे. त्याच्या विचारांशी असलेले मतभेद स्पष्ट केले आहेत. आई-वडील आणि

मुले याचे संबध, हक्क, कर्तव्ये याबद्दलच्या चर्चेतून स्त्रीवादी भूमिका आणि स्त्रियांच्या प्रश्नाकडे पहाण्याचा मार्क्सवादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. या पुस्तकातील 'स्त्रीमुक्तीच्या लढ्याची योग्य दिशा' हे प्रकरण सर्वात महत्त्वाचे आहे म्हणून याबाबत अधिक सखोल चर्चा हवी होती असे वाटते.

स्त्री–मुक्ती हा विषय खूप गुंतागुंतीचा आणि विविध मतप्रणाली असलेला आहे त्यामुळे विशिष्ट मताचा पाठपुरावा करणाऱ्या पुस्तकाचेही स्वागत करायला हवे. भिन्न भिन्न दृष्टिकोन असलेल्या स्त्री संघटनाना आपापली मते आणि विचार यांचा यानिमित्ताने पुनर्विचार करता येईल. स्त्रीमुक्तीचे कार्य करणाऱ्या संस्थामध्ये एकसूत्रीपणा येण्याची शक्यता निर्माण होईल. हे कितपत घडेल त्यावर अशा प्रकारच्या पुस्तकाचे यश अवलंबून राहील.

—मेधा सिधये

स्त्रीमुक्ती : केव्हा व कशी ?
सुशीला गोखले पटेल
प्रकाशक : मजू गाधी, महिला आदोलन पत्रिका.
भारतीय महिला फेडरेशन, मुबई
पृष्ठे : १२२, मूल्य : १५ रु. □

## महाराष्ट्राची शान उंचावणारे

# शाहीर तिलक पिराजीराव सरनाईक

रघुपती भट्ट

गोष्ट एकोणिसशे तीस सालातील

पिराजीराव सरनाईक कोल्हापूर संस्थानच्या पोलीस खात्यात नोकरीला होते. शिवाजी पेठेत वस्ताद नारायणराव यादव याच्याकडे बरेच तरुण लाठी दाडपट्ट्याच शिक्षण घ्यायला यायचे, त्यात पिराजीरावाचाही समावेश होता

वस्ताद पोवाडे म्हणायचे, पिराजीरावाना त्यात गोडी वाटली. बरोबर गुणगुणत असतांना वस्तादानी पिराजीरावाचा खडा आवाज हेरला आणि प्रोत्साहन दिले. लाठी दाडपट्ट्याबरोबर पोवाडा गाण्याचेही शिक्षण चालू झाले.

पिराजीरावांच्या घरापर्यंत बातमी गेली. त्या काळात गाणं हे करियरच्या लायकीच आहे अस कोणाला वाटत नव्हत पिराजीरावानीसुद्धा तो विचार केला नव्हताच. पोलीस खात्याची नोकरी होतीच. ती सांभाळूनच पिराजीराव पोवाड्याचा रियाझ करू लागले. पोवाडे म्हणता म्हणता लिहू लागले.

यातूनच 'लहरी हैदर' यांची भेट झाली. लहरी हैदर हे शीघ्रकवी होते. प्रसंगोपात्त कवने कशी लिहावीत, ऐतिहासिक प्रसंग कसा जिवंत उभा करावा, या गोष्टीचे शिक्षण पिराजीरावाना लहरी हैदरसाहेबांकडून मिळाले आणि पिराजीरावामध्ये शाहीर फुलू लागला.

पहिला कार्यक्रम पिराजीरावानी कोल्हापूरच्या उभा मारुती चौकात केला. त्यांची डफावरची ही पहिली जाहीर थाप ! या थापेत—

'ज्याने अढळ स्वामीभक्तीला ।
प्राणशक्तीला ।
अर्पिली तिला ।
तोच धन्य शिवाजीचा सरदार ।
बाजीप्रभु महान वीर झुझार ।'

याचे गुणगान पिराजीरावानी केले बाजीप्रभुच्या पराक्रमाचे वर्णन करताना पिराजीराव रगून गेले. श्रोत्याना त्यानी आपल्याबरोबर थेट पावनखिंडीत नेले.

ही पिराजीरावांची सुरुवात होती.

पुण्यातील एका गृहस्थानी पिराजीरावाचा पोवाडा ऐकला. त्यानी पिराजीरावाना पुण्याला येण्याचे आमत्रण दिले. पिराजीराव मोठ्या आनंदाने पुण्याला गेले. पोलीस खात्याचे 'वाहन दफ्तर'च त्याच्याकडे असल्याने संस्थानचे वाहन पुण्याला जाणारे असले की, पिराजीरावाची त्याबरोबर सफर व्हायची

पुण्यातील मेळ्यातून पिराजीरावानी पोवाडे म्हटले पिराजीरावाची म्हणण्याची पद्धत आणि रांगडी अस्सल कोल्हापुरी भाषा यामुळे पिराजीरावाची छाप पडायची. त्याशिवाय पिराजीरावाचा मराठमोळा थाट, शाहिरी पेहराव आणि प्रसंगावधान यामुळे ते लवकरच मेळ्यातून लोकप्रिय झाले.

तेवढ्यात 'सावकारी पाश' या मराठी चित्रपटात पोवाडा म्हणण्याची संधी पिराजीरावाना मिळाली. त्यामुळे पिराजीराव सरनाईक हे नाव सर्वतोमुखी झाले

पिराजीरावाचा पोवाडे म्हणण्याचा छंद हा आपल्या पदरचे पैसे खर्चूनच झाला. अडीच रुपये वगैरे त्यावेळी बिदागी मिळायची, पण बिदागीचा फारसा विचार त्यावेळी कोणी करायचे नाही. आणि दुसरे म्हणजे पिराजीरावाचे कार्यक्रम नोकरी सांभाळूनच चालले होते.

कोल्हापूरच्या माणसाला पुण्यात मागणी आहे, असे कोल्हापुरात जेव्हा समजले तेव्हा कोल्हापूरकरानी पिराजीरावाचे पोवाड्याचे कार्यक्रम करायला सुरुवात केली. बाबूजमालमध्ये भरगच्च गर्दीत पिराजीराव गायले.

पिराजीरावाची किर्ती एच. एम. व्ही.च्या कानी आली. त्यानी 'मुबईची कहाणी' हा पोवाडा रेकॉर्ड केला. त्यानतर आकाशवाणीवर पिराजीरावाचा पोवाडा सादर झाला

पिराजीरावाचे सरसकट कार्यक्रम सुरू झाले. मराठी आणि अमराठी भागातही त्याचे दौरे होऊ लागले.

### सरकारी नोकरीतून मुक्त

ऐतिहासिक सामाजिक विषयावर पोवाडे करण्यात पिराजीराव अत्यंत निष्णात तर होतेच, पण याशिवाय त्याची पोवाडे गाण्याची पद्धत वेगळी होती पिराजीरावांच्यामते त्याच्यापूर्वीचे शाहीर डफातून डोके वर काढत नसत. आताच्या जमान्यात ते चालले नसते. मग शाहीरीबरोबरच थोडासा अभिनय पण आलाच.

राजाराम महाराजाच्या निधनानतर करवीर संस्थानात ज्या घटना घडल्या त्या विषयावर पिराजीरावानी लिहिलेले पोवाडे

फारच लोकप्रिय झाले होते. सभोवतालच्या घटना असल्यामुळे कोल्हापूरच्या जनमानसाची त्याने पकड घेतली होती. हे पोवाडे करवीर इलाखा मराठा परिषदेचे अध्यक्ष डॉ. धनवडे यांना फारच आवडले आणि त्यांनी छत्रपती शहाजी महाराज यांचेकडे पिराजीरावांची शिफारस केली.

शहाजी महाराज गुणग्राहक होते. त्यांनी ताबडतोब 'लहरी हैदर' यांना पिराजीरावांना घेऊन यायला सांगितले. पिराजीरावांनी आपल्या इतमामात जाऊन नव्या राजवाड्यामध्ये महाराजांना पोवाडे गाऊन दाखवले.

महाराज खूष झाले. महाराजांशी हा जो संबंध जडला तो पिराजीरावांनी अखेरपर्यंत चालू ठेवला. नव्या राजवाड्यावर त्यांचे अधूनमधून पोवाड्यांचे कार्यक्रम होत राहिले.

पिराजीरावांची पोलीस खात्यातील नोकरी चालू होतीच. पण संस्थाने विलीन झाली आता नवं सरकार आलं. पिराजीरावांचं मन जुन्या काळात रमलेलं. त्यांचा शाहिरी बाणा छत्रपतींचं गुणगान गाणारा. नव्या राजवटीशी त्यांचं जमेना.

त्यात पिराजीरावांनी आगीत तेल ओतण्याचा कार्यक्रम केला.

क्लार्कस् अँड लोअर ग्रेड गव्हर्नमेंट सर्व्हन्टस् युनियन संस्थान कोल्हापूर ,यांच्या पहिल्या अधिवेशनानिमित्त कारकून आणि शिपाई यांच्या परिस्थितीचा पोवाडा पिराजीरावांनी आपल्या खास शैलीत पेश केला.

'पगार पुरेना, पोट भरेना,
महागाई थांबेना ।
चौपट महागाई, एकपट भत्ता,
अकौंट लागेना ।
सरकार आपुला हिशेब पहाते
दरसाल मेळाचा ।
तसाच आमचा मेळ पाहावा
हाच प्रश्न आमचा ।'

याच पोवाड्यात पिराजीरावांनी कारकुनाच्या चाळीस रु. पगाराचा हिशेब देऊन कारकून शिपाई हा शासनयंत्रणेचा मुख्य आधार आहे. त्याला जर पाणी मिळाले नाही तर 'वृक्ष आपोआप वाळणार' असे सांगितले आणि नोकरवर्गाने संघटना बांधावी असा आदेशही दिला.

या पोवाड्यामुळेच शासनाची आपल्यावर गैरमर्जी झाली असावी असा पिराजीरावांचा अंदाज आहे. कारण पिराजीरावांनी त्यात अंमलदारावर बरीच टीकाही केली होती.

१९५० साली पिराजीरावांना सरकारी नोकरीतून मुक्त करण्यात आले. एका दृष्टीने पिराजीरावांना बरे वाटले; पण आर्थिक आधार तुटल्यामुळे त्यांची कुचंबणा होऊ लागली.

शाहिरी हा एकमेव पर्याय आता त्यांच्यापुढे राहिला.

शहाजी महाराजांनी देवास, राघोगड, राधानगरी इ. ठिकाणी पिराजीरावांचे कार्यक्रम घडवून आणले आणि त्यांच्या ४६ व्या वाढदिवसादिवशी 'शाहीर विशारद' ही किताबत देऊन त्यांना राजाश्रय दिला आणि त्यांना करवीर संस्थानचे तहहयात मानधन मुक्रर केले.

## शाहीर तिलक

पिराजीरावांना हा मोठाच आधार मिळाला. त्यानंतर पिराजीरावांना आयुष्यात बरेच सन्मान मिळाले; पण मराठमोळ्या पिराजीरावांना करवीर दरबारने केलेला सत्कार फार मोलाचा वाटतो.

१९५५ साली दिल्लीला अखिल भारतीय रेडिओ संगीत संमेलनासाठी पुणे रेडिओ केंद्राने पिराजीरावांची निवड केली. महाराष्ट्राची शाहिरीपरंपरा आणि मर्दानी हत्यारांचे प्रात्यक्षिकच त्यांना करून दाखवायचे होते. प्रसंग कसोटीचा होता आणि महाराष्ट्राची शान उजळायची होती.

आजही पिराजीराव त्या आठवणीने थरथरतात. पिराजीराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मावळ्यांचे पोशाख केले होते. पिराजीरावांच्या शब्दात–

भारताची राजधानी दिल्ली ।
दिल्लीत गर्जना दिली ।
शिवाजी बोला ।
जयजयकार नभी दुमदुमला ।
नव्या दिल्लीला ।।
महाराष्ट्राच्या मराठेशाहीची ।
शिवबाच्या मर्द मावळ्याची ।
आज भारताला ।
आठवण दिली सर्वाला ।
गाऊन पवाड्याला ।



**कोल्हापूरनं स्फूर्ती, पुण्यानं शक्ती, मुंबईनं कीर्ती दिली–पिराजीराव**

¤

शिवाजी आमचा राणा ।
मर्दानी आमुचा बाणा ।
पाहून समयाला ।।
शिवाजी नाव आम्हाला ।
पडले दिल्लीला ।।
एकाहून एक कलावंत ।
तिथे कसा लागावा अंत ।
पण समयाला ।
महाराष्ट्र आहे आघाडीला ।
पटले सर्वाला ।।

पिराजीरावांनी महाराष्ट्राची शान उंचावली. त्यांचं काळीज भरून आलं. जनमानसाची दाद आणि त्याशिवाय–

'पंतप्रधान पंडित जवाहिर ।
आणि रशियाचे महशूर ।
पंतप्रधान बुल्गानिन थोर ।
नामदार आणि खासदार ।'
खूष होऊन पोवाड्यावर ।
येऊन रंगमंचावर ।
भेटले आम्हाला ।
हस्तांदोलन दिले सर्वाला ।
शाहिरी पार्टीला ।।'

खुद्द नेहरू आणि बुल्गानिन या दोन महान व्यक्तींना स्टेजवर येऊन पिराजीराव आणि त्यांच्या पथकाचे अभिनंदन करावेसे वाटले. या गोष्टींनी पिराजीरावांना दिल्ली जिकल्याचा आनंद वाटला.

पिराजीराव पन्नास वर्षाहून अधिक वर्षे पोवाडे गात राहिले. अनेक प्रसंगावर, व्यक्तीवर त्यानी पोवाडे लिहिले– म्हटले. राष्ट्रीय चळवळीवर त्याचे पोवाडे आहेत. राष्ट्रीय नेत्यावर आहेत. 'असावा नसावा' या रुपात बोधपर फटका आहे. त्याच्या भाषेत पाल्हाळ नाही. एक प्रकारचा सडेतोडपणा आहे, नेमकेपणा आहे

इतरानी लिहिलेले पोवाडेसुद्धा त्यानी गायलेले आहेत. भालजी पेंढारकरानी लिहिलेला 'प्रतापगडचे युद्ध' वसंत बापटाचे 'जय महाराष्ट्र' आणि ग. दि. माडगूळकराचा 'तुळजापूरच्या तुरुगात' असे पोवाडे त्यांनी गायलेले आहेत; पण जास्त करून त्याचे स्वत.चेच पोवाडे खूप आहेत. एच्.एम्.व्ही.ने त्याच्या शभरेक रेकॉर्डस् काढल्या आहेत. याच्याशिवाय कॅसेटस् आहेत.

कोल्हापूर आणि छत्रपती याचा आश्रय असल्याने पिराजीरावानी बरेच पोवाडे लिहिलेले आहेत. शाहू महाराज, राजाराम महाराज, शहाजी महाराज याच्या सबधी आणि पद्माराजेचे लग्न, युवराज शाहूचा वाढदिवस, लग्न वगैरे प्रसंगीसुद्धा पिराजीरावानी पोवाडे म्हटले आहेत. कै. शहाजी महाराज हे उत्तम शिकारी होते आणि त्याच्याबरोबर शिकारीला जाण्याचे भाग्य पिराजीरावाना लाभले होते. त्याचा उल्लेख त्यानी शिकारीच्या पोवाड्यात केला आहे.

पिराजीरावानी एका महाराष्ट्र शाहीर समेलनात पहिल्या नबरचे बक्षीस आणि 'शाहीर तिलक' हा किताब मिळवला होता. या समेलनात त्यांनी 'सत्यशोधक समाजाचा पोवाडा' म्हटला होता.

या पोवाड्यात पिराजीरावानी ब्राह्मणेतर चळवळ, सत्यशोधक समाज यांची महती गायली होती. यातली भाषा सरळसोट आहे.

'सामाजिक, धार्मिक शिक्षण
अज्ञानास देण्याला ।।
सत्यशोधक समाजाचा
जोतीरावानी पाया घातला ।।
ब्राह्मण ब्राह्मणेतर वादासाठी
नाही मुळीच स्थापला ।।
जोतीराव फुलेचे एक
उदाहरण सांगतो तुम्हाला ।।
टिळक आगरकरावर होता
फौजदारी खटला चाललेला ।।
तेव्हा जोतीरावानी
टिळक व आगरकर दोघाला ।।
दहा हजार रुपयांची
मदत दिली अशा समयाला ।।
तसेच शिवाजी महाराजाची
ती समाधी दुरुस्त करण्याला ।।
फंड गोळा करूनी
केसरी ऑफिसकडे दिधला ।।'

## शहाजी महाराजांचे स्मरण

सत्यशोधक समाजाबद्दल सागताना काही चुटकेसुद्धा पिराजीराव सांगतात. त्याची कळकळ आहे, ती समाजामध्ये दुरावा निर्माण होऊ नये यासाठी.

पिराजीरावानी पोवाड्यातून अनेक विषय हाताळले. क्रातीवीर नाना पाटील, नेहरू सरकार, महात्मा गांधी, जोतीराव फुले, सरदार भगतसिंग आदि नेत्यावर, स्वातत्र्योत्सव, प्रौढ शिक्षण, पुण्याचा जलप्रलय, स्त्रीशिक्षण, हैद्राबादचा विजय अशा विषयावर लिहिणाऱ्या पिराजीरावांची साधीभोळी राष्ट्रनिष्ठा आहे. गजानन महाराज, महावीर, साईबाबा, या धार्मिक विषयावरसुद्धा त्याचे पोवाडे आहेत. सर्व तऱ्हेच्या रसिकांना रिझवणारी त्याची लेखणी आणि वाणी आहे आणि त्यातून प्रत्येक रचनेच्या अखेरीस गुरू हैदर आणि आश्रयदाते शहाजी महाराज आणि कलावताचे माहेरघर कोल्हापूर, याचा उल्लेख अगदी नम्रतापूर्वक आहे.

आपला श्रोतृवर्ग खिळवून, गुगवून ठेवण्याची कला पिराजीरावाना साध्य होती. एकदा कराडमध्ये कार्यक्रम करताना काही तरुण मुली आल्या आणि श्रोत्याचे लक्ष तिकडे वेधले. पिराजीरावानी तो क्षण पकडला आणि शाहिरी ढगातच 'अहो तिकडे काय बघता, इकडे बघा' असं मध्येच पोवाड्यात टाकलं आणि श्रोतृवर्गाचं मन जिंकलं.

श्रोत्यानी पिराजीरावांना खूप समाधान दिले. तृप्तता दिली. पिराजीरावाच्या उमेदीच्या काळात तमाशाचे फड रीते पडत; पण पिराजीरावाच्या गाण्याला गर्दी होई. एकदा देवासला नाचगाण्याचा एक चागला कार्यक्रम होता; पण शहाजी महाराजांनी त्या कार्यक्रमाला जायला नकार दिला. ते म्हणाले, मला आज वीररस पाहिजे. पोवाडे ऐकायचेत आणि पिराजीरावाचे पोवाडे त्यांनी ऐकले. पिराजीराव शहाजी महाराजांची ही गुणग्राहकता कधी विसरू शकत नाहीत. म्हणूनच प्रत्येक पोवाड्यात त्या गुणी राजाचे ते स्मरण करतात

ग दि. मा. आणि पिराजीराव काही काळ एकत्र होते. त्यानी बरोबरीने कार्यक्रमही केले पण नतर ग. दि मा. कोल्हापूर सोडून गेले आणि सिनेमाक्षेत्रात गुतले. पिराजीरावाना मा. विनायकानी प्रथम सिनेमात गायची सधी उपलब्ध केली होती. 'सावकारी पाश' या चित्रपटानंतर आणखी डझनभर चित्रपटात पिराजीरावानी गाणी गायली. पण चित्रपटात त्यांचा जीव फारसा रमला नाही.

खुल्या वातावरणात, श्रोते भरगच्च भरलेले असावेत मग पिराजीराव खास शाहिरी इतमामात आपल्या ताफ्यासहित पोवाडे सादर करणार, श्रोत्याच्या जिव्हाळ्याचा एखादा विषय घेऊन. पब्लिकच्या टाळ्या घेत, रसिकतेची दाद घेत घेत, अधून मधून एखादे उत्स्फूर्त कवन रचून पिराजीराव मैदान मारणार आणि शेवटी कोल्हापूर, गुरू लहरी हैदर आणि आश्रयदाता शहाजी महाराज यांना मानाचा मुजरा !

ही पिराजीरावाची शान होती. शाहिरी ताठा होता. आदब होती.

आता पिराजीराव शांत निवृत्त जीवन जगत आहेत मुलांच्या आणि नातवडाच्या समवेत त्याचा वेळ मजेत जातो आहे ७५ वर्षे पूर्ण झाल्यावर त्यांना भालजी पेंढारकराच्या हस्ते एक मानपत्र देण्यात आले. आता वय सत्त्याहत्तर झाले आहे. कोल्हापूर महानगरपालिकेनेसुद्धा त्याचा सत्कार केला व त्याना मानपत्र देऊन गौरव केला आहे. त्याचं पोवाड्याच एक पुस्तक नवा राजवाडा ट्रस्टने प्रकाशित केलं आहे. अनेक सन्मान उपभोगले, कौतुक अनुभवले, लता मंगेशकर भालजी, बाबुराव पेंटर, गोविंदराव टेंबे अशानी गौरव केला. आता आणखी काय हवे ? फक्त एक दु ख आहे. शाहिरीची ती शान आता लोपत चाललीय. आता तो पेशा बदच पडत चाललाय. नाव घेण्यासरखे काही शाहीर आहेत; पण तो अफाट जनसमुदाय, पोवाड्यावरचे ते प्रेम आता आटलेच.

एवढी खत सोडल्यास पिराजीराव सरनाईक तृप्त आहेत. सुखी आहेत.

□

## रंगभूमी

# हसत हसत फसवुनी

वि. भा. देशपांडे

शं. ना. नवरे यांचे बरेच दिवसांनी नवे नाटक रंगभूमीवर आले आहे. त्याचे नाव आहे 'हसत हसत फसवुनी'. हे शिर्षक वाचल्यावर भावबंधन नाटकातील पदाची आठवण येते. त्यातला सगळा जरी नाही तरी बराचसा अर्थ या नाटयशीर्षकात आणि पर्यायाने नाट्याशयात आहे.

तसे हे स्थूलमानाने कौटुंबिक नाटक. त्यातही अनेकांच्या जिव्हाळयाचे; पण एरवीच्या कौटुंबिक जिव्हाळयाच्या नाटकातील भावविकलता, भडकपण यामध्ये नाही. तर स्त्री–पुरुष संबंध आणि त्याचा कुटुंबावर होणारा परिणाम हा महत्त्वाचा विषय आहे. या विषयात नाविन्य नसले तरी मांडणीत निश्चितच आहे.

एक डॉक्टर, त्याची सुविद्य पत्नी. या दोघांची एक मैत्रीण. डॉक्टर आणि मैत्रिणीचे खेळकरपणाने भेटणे, भटकणे आदि चालू आहे. जणू आपण मित्रच आहोत या पद्धतीने. फक्त तेवढे आहे असा भास असला तरी प्रत्यक्षात तसे नाही. याची कल्पना डॉक्टरच्या बायकोला आहे; पण ती आरंभी तसे काही दाखवत नाही. उलट त्या दोघांना हरतऱ्हेने प्रोत्साहित करीत राहते. ती दोघेही खुषीत असतात; पण काही वेळाने बायकोचा कॉलेजमधला एक मित्र येतो. जो पूर्वी म्हणजे कॉलेजमध्ये असताना तिचा प्रियकरही असतो; पण त्यावेळी काही कारणाने त्यांचे लग्न झालेले नाही हा मित्र परदेशाहून येतो. आपल्या मैत्रिणीबरोबर भटकतो, तिच्या नव्या व्यवसायाला आपल्या ओळखीने काही नवे संबंध जोडून देतो. त्याच्याबरोबरचे फिरणे, भटकणे, परगावी जाण्याचे ठरवणे इत्यादी गोष्टी डॉक्टरची बायको जाणूनबुजून करीत असते. ते पाहून डॉक्टर वैतागतो आणि अखेरीस वळणावर येतो. दोघांच्या मीलनात नाटकाचा सुखांत होतो.

या कथावस्तूचा जीव तसा लहान किंवा आटोपशीर आहे. दोन अंकात विभागून अधिक ताणला आहे. विशेषतः पहिला अंक केवळ वातावरण निर्मिती आणि त्याच्या अनुषंगिक होणारी हास्यनिर्मिती यामध्ये घालवलेला आहे. इतक्या प्रमाणात तसे करण्याची काहीच गरज नव्हती. तुलनेने दुसऱ्या अंकाची मांडणी आणि परिणामाचे एकूणच वजन निश्चितच चांगले आहे. दोन अंकांच्या गुणवत्तेतील फरक प्रेक्षकाला सतत जाणवत राहतो. विशेषतः पहिला अंक पाहात असताना फार मोठी उत्सुकता दुसऱ्या अंकासाठी निर्माण होत नाही. परिणामी पहिल्या अंकानंतरची प्रतिक्रिया काहीच होत नाही. मात्र जो माणूस दुसऱ्या अंकाला आवर्जून थांबेल त्याला लक्षात येते की, आपण नाटकाला थांबलो हे बरे झाले. दुसरा अंक चांगला परिणाम साधून जातो. त्यामुळे प्रेक्षागृहाबाहेर जाताना एक सुखद परिणाम प्रेक्षकांबरोबर निश्चितच असतो!

वास्तविक शं. ना. नवरे यांच्याकडून असे व्हावे याचे आश्चर्य वाटते. कारण त्यांना नाट्यलेखनाचा दीर्घ काळाचा अनुभव गाठीशी आहे. विनोदाची उत्तम जाण आहे. नाट्यपरिणामासाठी कोणते तंत्र वापरावे याचेही भान आहे; पण असे घडले आहे खरे! आणखी एक गोष्ट जाणवली की, नाटकाचा मूळ विषय विनोदाच्या, सुखात्मिकेच्या बाजाचा असताना डोंगरे नामक व्यक्तिरेखा काहीशी भडक, फार्सिकल पद्धतीची दाखवण्यात मतलब काय होता? त्या व्यक्तिरेखेच्या निर्मितीमुळे काही प्रसंगी अन्य व्यक्तिरेखांवर त्याचा परिणाम घडून आला आहे असे जाणवते. त्याची काही गरज नव्हती.

लेखनातले चढउतार, उणेपण जाणवत राहिले तरी 'अभिजात' नाट्यसंस्थेने प्रयोगरुप उत्तमपणाने उभे केले आहे. दिग्दर्शक नंदकुमार रावते यांनी प्रयोगाची गती उत्तम राहिल अशी काळजी घेऊन पात्रांच्या हलचाली ठेवल्या आहेत. बाबा पारशेकरांची नेपथ्यरचना तशी नेहमीची म्हणजे दिवाणखान्याची आहे; पण त्यामध्ये प्रेक्षकाच्या डाव्या हाताला असलेल्या कोपऱ्यातला जिना उत्तमरीतीने वापरला आहे. केवळ पात्रांचे जाणे येणे एवढ्या पुरताच तो वापर नाही तर पात्रांच्या हालचालींबरोबरच त्यांच्या विरचना करून घेण्यासाठी त्याचा चांगला उपयोग झालेला आहे.

प्रयोगासाठी कलाकारांची निवडही यथायोग्य आहे. मुख्य भूमिकेत आशा काळे आणि शाम पोंक्षे आहेत. त्यांच्या जोडीला क्षमाराज, पद्मश्री जोशी, किरण दिघे, मोहन कोठीवान, सतीश रणदिवे, वसंत सोमण, विमल भातखंडे आदी कलाकार आहेत. यामध्ये पद्मश्री जोशी आणि तिच्या प्रियकराचे काम करणारा किरण दिघे या दोघांना भूमिका छोटया असूनही त्यांनी अतिशय लक्षवेधी अभिनय केला. मोहन कोठीवान हे बापाच्या भूमिकेत शोभले उत्तम. पण त्या व्यक्तिरेखेचा वापर आहे त्यापेक्षा अधिक व्हायला पाहिजे होता. तसेच मित्राच्या (निखिल) भूमिकेबाबतही वाटून गेले. क्षमाराज ही अभिनयाच्या संदर्भात अधिक मोकळी व्हायला हवी. तसेच तिने मुद्राभावही अधिकपणाने व्यक्त करायला हवेत. शाम पोंक्षेने डॉक्टर जयंतची भूमिका उत्तमपणाने पेश केली. त्याचा चेहरा, आवाज अनेक प्रसंगातला विनोद व्यक्त करायला उपयोगी ठरला. नाटककारानेच जिथे फार्सिकल पद्ध-

तीने अकारण त्याच्यासाठी काहीबाही लिहिले किंवा दिग्दर्शकाने सांगितले तिथे त्याची व्यक्तिरेखा मूळची विनोदाची वाट सोडून जरा आसपास हिंडून आली. त्याची काही गरज नव्हती. सर्वात लक्षवेधी ठरली ती आशा काळे. तिचा अभिनय म्हटल्यावर विशिष्ट प्रतिमा आपल्या नजरेसमोर येते. त्याला गहिरे रंग, गुतता हृदय, विषवृक्षाची छाया, वर्षाव अशा नाटकातील भूमिका खरे तर अपवाद आहेत. पण तरीही मूळची प्रतिमा अनेकांच्या स्मरणात राहिलेली आहे. पण हे नाटक पाहिल्यावर तिने आपली अभिनयाची प्रतिमा निश्चितच बदलली आहे असे जाणवते. प्रत्येक कलाकाराच्या आवाजाची एक जात असते तशी तिच्याही बाबतीत आहे. त्या गोष्टी गृहीत धरून तिने आपल्या सहजपूर्ण अभिनयाने संपूर्ण नाटकाला जे चैतन्य आणले आहे ते पाहात राहण्याजोगे आहे. तिच्या रंगमंचीय हालचालीतीतील चपळता, विविध प्रसंगातले आवाजातले चढउतार आणि मुद्राभाव या गोष्टीच्या साह्याने तिने स्वत:ची भूमिका तर जिवंत केली आहेच, पण संपूर्ण नाटकभर एक खळाळते हास्य टिकवण्याचा यत्न केला आहे. व्यक्तिरेखेच्या संदर्भातले तिचे दिसणे, बोलणे, चालणे सारेच आकर्षित करणारे आहे.

घटकाभराची ही करमणूक किंवा हसवणूक नुसतेच हसवून जाते असे नव्हे तर आपल्याला, विशेषत: पति–पत्नी नातेसंबंधाना काहीबाही सांगून जाते. असले ' हसत हसत फसवणे ' एकदा बघायला हरकत नाही ! ☐

चित्रपट

# जाल

## रहस्याऐवजी सूडालाच प्राधान्य

तसं पहायला गेलं तर हिंदी चित्रपटात आवश्यक त्या सगळ्या गोष्टी ' जाल ' मध्ये आहेत. रहस्य आहे, प्रेमप्रकरणं आहेत, नाचगाणी, मारामाऱ्या आहेत. नामवंत कलाकाराची तर फौजच ' जाल ' नं उभी केली आहे. तरीही आपला ठसा उमटवण्यात तो अपयशीच ठरला आहे. प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी अनेक गोष्टी दिग्दर्शक उमेश मेहरानं आपल्या चित्रपटात घेतल्या आहेत. पण लोकांसाठी पसरलेल्या या जाळ्यात तो स्वत:च सापडल्यासारखा वाटतो. त्यामुळंच नेमकं कशाला महत्त्व द्यायचं ही गोष्ट तो विसरून गेला आहे. ' जाल ' मधलं रहस्य अधिक चांगल्या रीतीनं हाताळलं असतं तर तो नक्कीच एक चांगला चित्रपट ठरला असता.

अलिकडं हिंदी चित्रपटात एक नवीन प्रकार येऊ पहातो आहे. तो म्हणजे चरित्रभूमिका करणाऱ्या अभिनेत्रीलाच चित्रपटाची नायिका बनवण्याचा. चित्रपटातल्या नायकाचं प्रेमप्रकरण दाखवायची सोय व्हावी म्हणून त्याच्याबरोबर एखादी तरुण नटी असते. पण दोन चार गाणी आणि तितकेच संवाद यापलिकडं तिला महत्त्व नसतं. खरा भाव खाऊन जाते ती ही चरित्रभूमिकेतली अभिनेत्रीच. नुकत्याच लागलेल्या ' दिलवाला ' त नायक मिथुनची बहीण दाखवलेली स्मिता पाटीलच चित्रपटाची खरी नायिका होती. ' जाल ' मध्येही मिथुनशी प्रेमप्रकरण जमवू पहाणाऱ्या मुनमुन सेन आणि मदाकिनी या दोघी असल्या, तरी चित्रपटाची नायिका रेखाच आहे.

मीनाबाई (रेखा) ही एक कोठीवरची नर्तिका. एके दिवशी अचानक तिच्या कोठीवर एक माणूस येतो तो तिला काही माहिती देतो. ती कळताच मीनाबाई कोठीला आग लावून रातोरात नाहीशी होते गावातच ती दुसरीकडे राहू लागते. शंकर (मिथुन चक्रवर्ती) या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या धाडसी तरुणाला ती बोलावून घेते आणि दूरच्या गावी भानुप्रताप या माणसाचा पत्ता काढायची कामगिरी देते. भानुप्रताप आणि दिवंगत वडिलांचे वैर असल्याचं शंकरला कळतं मीनाबाई नेमकी कोण, या कामासाठी तिनं आपल्यालाच का निवडलं हे प्रश्न त्याला पडतात. पण पैशांची अतिशय गरज असल्यानं आणि आपल्या आईला (तनुजा) मदत करावी या हेतून तो ही कामगिरी पत्करतो.

भानुप्रतापची तसेच त्याच्या मित्राची (रूपेशकुमार) हकीकत तो मीनाबाईला कळवत असतो. या सगळ्यातून वेळ काढून तो मधु (मदाकिनी) बरोबर प्रेम करणे, आनंदी, दु:खी गाणी म्हणणे हेही करत असतोच. प्रेमाचा त्रिकोण पूर्ण होण्यासाठी मधुची मैत्रीण आणि भानुप्रतापची मुलगी सुनिता (मुनमुन सेन) ही देखील शंकरवर प्रेम करत असते.

तिथं राहून शंकरला अनेक गोष्टी कळतात. भानुप्रतापचा धाकटा भाऊ शशीप्रताप हा अतिशय दयाळू होता. पण आपल्या वडिलांनी त्याच्याशी मैत्री करून आणि पुढे भानुप्रतापला सामील होऊन त्याचा काटा काढला वगैरे गोष्टी लोक त्याला सांगतात. इकडे रूपेशकुमारला मीनाबाई भेटते आणि तिला बघून आपण पूर्वी ठार केलेल्या अमिताचा भास त्याला होतो. त्या जाणीवेन हृदय कमजोर असलेला तो अधिकच घाबरतो. पुढं त्याचा रहस्यमय मृत्यूही होतो.

मात्र खरं रहस्य चित्रपटाच्या शेवटी नाही तर बरंच आधी सांगितलय. त्यामुळं शेवटी मारामारीशिवाय काहीच होत नाही. रहस्य जोपर्यंत ताणलय तोपर्यंतही ते दिग्दर्शकाला फारसं गूढ ठेवता आलेलं नाही. पुढं काय ? ही जी उत्कंठा रहस्यमय चित्रपटात लागून रहाते ती यात लागून रहात नाही. चित्रपटाचा वेग चांगला आहे. पण रहस्यप्रधान चित्रपटातला रहस्य शेवटपर्यंत खेळवत ठेवायचा नियम अलिकडच्या 'कत्ल' नही पाळला नव्हता. ' जाल ' नही तो पाळलेला नाही. त्यामुळं सूडकथेचं स्वरूप त्याला आलं आहे.

उमेश मेहराची कामगिरी एरवी बरी आहे. पण त्यानं एवढी पात्रं आणि त्यासाठी एवढे नामवंत कलाकार खर्ची घातले नसते तर चित्रपट अधिक सुटसुटीत आणि सुसह्यही झाला असता.

कलाकारात वाव आहे तो फक्त मिथुन आणि रेखालाच. दोघांचा एकत्र असा हा पहिलाच चित्रपट. आणि एकमेकाचे ते नायक आणि नायिका नसले तरी चित्रपटाचे नायक–नायिका मात्र तेच आहेत. दोघांचीही कामं चांगली आहेत. रेखाच्या भूमिकेत संवाद कमी आहेत. पण तिच्या चेहऱ्यावर भाव चांगले उमटले आहेत. वेगवेगळ्या पोशाखात ती अक्षरश: ग्लॅमरस दिसते. मंदाकिनी आणि मुनमुन या तिच्यापेक्षा लहान

णसलेल्या तारका. पण त्याच्याहीपेक्षा आकर्षक आणि तरुण ती दिसलीये. मिथुननंही सफाईने काम केलंय.त्याला मारामाऱ्या भरपूर आहेत. त्यामुळं तिथ तो फॉर्मात आहेच; पण भावनात्मक, प्रसंगातही तो कमी पडलेला नाही.

मधूच्या अबोल भूमिकेत मंदाकिनी शोभते. तिला साधेसुधे कपडे आणि सोबर, निरागस रोलच चागले दिसतात, हे या चित्रपटात आणखी एकदा पटत. अर्थात या भूमिकेतही तिला स्नानदृश्य चुकलेलं नाही. मोराच्या पोशाखात तिनं केलेल नृत्यही टाळता आलं असतं तर बर झालं असत.मुनमुनची भूमिका खरं तर चित्रपटात अनावश्यकच आहे. 'अदर बाहर', 'सुखिया' आणि आता 'जाल' या सुरुवातीच्याच चित्रपटात काहीही कणा नसलेल्या भूमिका स्वीकारून मुनमुननं स्वतःच नुकसान करून घेतलय एवढ खर.

इतर भूमिकांत तनुजा, रूपेशकुमार, गुलशन ग्रोव्हर, जगदीप इ दिसतात. जितेंद्र विनोद मेहरा पाहुणे कलाकार आहेत. जगदीप इतके दिवस डोळ्यासमोर नसण किती सुखद होत याची जाणीव या चित्रपटातला त्याचा आचरटपणा पाहून होते.

चित्रपटाची इतर तांत्रिक अगं ठीक आहेत. सगीत मात्र कर्णकटू आणि अतिशय सामान्य दर्जाचं.

—सीमा कुलकर्णी

---

### ऑक्सफोर्ड विद्यापीठातील बुद्धिमती किशोरी

# रुथ लॉरेन्स

मागील वर्षीच्या ऑगस्टमध्ये, ऑक्सफोर्डसारख्या प्रतिष्ठित विद्यापीठातून एक तेरा वर्षे वयाच्या किशोरीने ऑनर्स डिग्री मिळवली व ती देखील सर्वोच्च गुण प्राप्त करून, असे जर आपल्याला कोणी सांगितले तर त्यावर आपला सहजासहजी विश्वास बसणार नाही ! पण ही सत्य घटना असून त्या किशोरीचे नाव रूथ लॉरेन्स असे आहे. चार आठवडे सुरू असलेली ही परीक्षा रूथने अगदी सहजतेने दिली. 'तिने अत्यंत कठीण अशी ऐंशी गणिते, डिक्टेशन घ्यावे इतक्या सहजतेने सोडवली', असे तिच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी सांगितले ही अतिशय लांबलेली परीक्षा ज्यावेळी संपली,त्यावेळी रूथने एकूण १९२ उदाहरणे सोडविली होती जेव्हा की सर्वसाधारण विद्यार्थी या काळात जास्तीत जास्त ३१ उदाहरणे सोडवू शकतो. तिला शिकविणाऱ्या एका प्राध्यापिकेची तिच्या संबंधीची प्रतिक्रिया फार बोलकी आहे. 'रूथ म्हणजे फारच हुशार मुलगी ! तिच्या सर्व अडचणी सोडवायच्या म्हणजे मला फारच तयारी करावी लागते, त्यातच माझा सर्व वेळ जातो !'

रूथच्या या असाधारण बुद्धिमत्तेचे संगोपन तिची आई सिल्व्हिया व वडील हॅरी यांनी मिळून केले आहे एके काळी 'संगणक सल्लागार' असलेल्या या हॅरीने १९७७ साली नोकरीचा राजीनामा देऊन, आपले सर्व लक्ष स्वतःच्या दोन हुशार मुलीवर केंद्रीत करण्याचे ठरविले. त्यापैकी एक रूथ व दुसरी तिची लहान बहीण रिबेका. या दोनही मुलींना गणितज्ञ बनविण्याचा त्याचा विचार आहे. विशेष म्हणजे ह्या दोघीही प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी शाळेत मुळीच गेल्या नाहीत. त्यांचे हे शिक्षण त्यांच्याच घरातील स्वयंपाक घरात त्यांच्या आईवडिलांच्या देखरेखीखाली झाले. स्वयंपाक घरातील दोन टेबलावर दोघींनी हा अभ्यास केला. घरातील उबदार वातावरणात अभ्यास केल्यामुळे की काय, रूथने आपली मॅट्रिकची परीक्षा केवळ नवव्या वर्षी पास केली. दोन वर्षांनतर म्हणजे अकराव्या वर्षी तिने ऑक्सफोर्ड विद्यापीठाची प्रवेश परीक्षा पाचशेतीस उमेदवारामध्ये प्रथम येऊन पास केली व सेंट ह्यू कॉलेजची शिष्यवृत्तीदेखील मिळविली.

सेंट ह्यू कॉलेजातील प्राध्यापकाना रूथच्या बुद्धीच्या झेपेने आश्चर्यचकित केले आहे. त्याचप्रमाणे त्याना आढळून आले आहे की, ही हुशार मुलगी कोणताही विषय सहजतेने आत्मसात करते. एकदा तिच्या कॉलेजातील एक गणितज्ञ प्राध्यापक फळ्यावर एक अत्यंत गुंतागुंतीचे प्रमेय सोडवित होते. इतर विद्यार्थ्यांना ते प्रमेय आकलन करण्यास फार जड जात होते; पण रूथने मात्र त्या प्राध्यापकाची चूक त्याच्या लक्षात आणून दिली. या तिच्या अचाट बुद्धीसामर्थ्याने तिने सर्वांची वाहवा प्राप्त केली. रूथने ऑक्सफोर्डचा तीन वर्षांचा डिग्री कोर्स केवळ दोन वर्षांतच पूर्ण केला. एवढेच नव्हे, तर तिने आपले पेपर्स लीलया सोडविले. ती लिहिता–लिहिताच विचार करते. तिला विचार करण्यासाठी वेगळा वेळ खर्च करावा लागत नाही. गणित हा अर्थातच तिचा आवडीचा विषय आहे व त्याचा अभ्यास करताना काहीतरी नवीन शोध लावल्याचा तिला आनंद होतो असे ती म्हणते !

एक वर्ष अभ्यास केल्यावर तिला M. Sc ची डिग्री मिळेल. तिने आतापासूनच Ph. D. चे नियोजन केले असून, केवळ सोळाव्या वर्षी Ph. D. करण्याचा तिचा मानस आहे. आणि जर असे खरोखर घडले तर ब्रिटनच्या इतिहासातील ती सर्वात लहान वयाची प्राध्यापिका ठरेल ! कारण यापूर्वी फक्त इ. स. १७१७ साली कोलीन मॅकलॉरीन या १९ वर्षे वयाच्या तरुणाने Ph. D. मिळवून प्राध्यापकाची जागा पटकावल्याची नोंद आहे. पण केवळ Ph. D. मिळवून रूथ थांबेल असे वाटत नाही. तिची प्राध्यापिका मेरी लून हिने तिला गणितात काहीतरी मौलिक शोध लावण्याचे आव्हान दिले आहे. आणि ती नक्कीच हे आव्हान स्विकारेल असे दिसते !

— प्रा. अ. ल. देशपांडे



क्रिकेट

# भारतीय संघ : काही उणे काही दुणे

एप्रिलमध्ये होणाऱ्या ऑस्ट्रेलेशिया या नव्या स्पर्धेसाठी आणि त्यानंतरच्या इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय क्रिकेट संघाची निवड झाली आहे. प्रत्येक संघ सर्वांच्या मनासारखा तयार होत नसला तरी अगदी वादग्रस्त निवड ही असू नये. या दोन्ही दौऱ्यांसाठी संघाची निवड ' कोटा ' पद्धतीने झाली आहे, हे उघड गुपीत आहे.

संघनिवडीबद्दल चर्चा करण्याअगोदर एक प्रश्न मला पडला आहे–तो ऑस्ट्रेलेशिया कपाचा ! या करंडकासाठी भारतीय संघ पाठवायचे प्रयोजन काय ? माझ्या या प्रश्नावर अनेक क्रिकेटप्रेमीच्या भुवया आकुंचित होतील !

माझा आक्षेप आहे तो आयोजकाबद्दल ! शार्जाची ही मंडळी पेट्रोडॉलर्सच्या जोरावर दरवर्षी नवीन करंडक अस्तित्वात आणतात आणि मोठमोठ्या रकमेची बक्षिसे पाहून आम्हीही हजेरी लावतो. याच महाभागानी रॉथमन्स करंडक स्पर्धा एकाच वर्षात दोनदा आयोजित केली होती आणि आता ऑस्ट्रेलेशिया करंडक ! म्हणजेच एप्रिल १९८५ ते एप्रिल १९८६ या अवघ्या १३ महिन्यांच्या काळात आपण शार्जा येथे तिसऱ्यादा खेळण्यास जात आहोत. पैशाचा महिमा अगाध आहे असे म्हणतात; पण तो इतका अगाध आहे याची कल्पना आता येत आहे.

तसेच या स्पर्धांमधून क्रिकेटच्या दृष्टीने काही भरीव होत आहे म्हणावे तर तेही नाही ! इन्स्टटच्या जमान्यात शार्जामधील स्पर्धा मर्यादित षटकांच्याच आहेत एरवी भरगच्च मोसमाबद्दल ओरडणारे क्रिकेटपटू या स्पर्धात खुषीने भाग घेतात आणि पत्रकारही ब्रदेखील लिहीत नाहीत. कारण या क्रिडापत्रकाराना अशा स्पर्धांच्या वेळी शाही पाहुणचार मिळतो ! या स्पर्धात क्रिकेटचे किती हित होत आहे याचा कोणी विचार करणार आहे का ? केरी पॅकर यांनी क्रिकेटपटूंना करारबद्ध करून घेतले होते, ते अधिकृतपणे. शार्जाच्या या बुखातीर साहेबानी क्रिकेटपटूबरोबरच देशोदेशीची क्रिकेट मंडळेही विकत घेतली आहेत, अतिरेकी क्रिकेट प्रेमाच्या सोगाखाली, पेट्रोडॉलर्सच्या जोरावर !

आता संघनिवडीबद्दल–ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील घई, कुलकर्णी, किरमाणी, मल्होत्रा व शिवरामकृष्णन् यांना पूर्णपणे वगळले आहे तर अमरनाथ, यादव व मोरे याची केवळ इंग्लंड दौऱ्यासाठी निवड झाली आहे. यातील घई व मल्होत्राबद्दल कोणीही अश्रू ढाळणार नाही. मुळातच या दोघांची निवड आश्चर्यकारक होती. संदीप पाटीलला कुजवायचे याच उदात्त हेतूने मल्होत्राची निवड झाली होती. त्याचा खेळ बघून त्याला वगळले ते योग्यच झाले. शिवरामकृष्णन याने बोर्डेच्या म्हणण्याप्रमाणे आत्मविश्वास गमावला आहे आणि ते खरेही आहे. त्याहीपेक्षा म्हणजे त्याच्या डोक्यात यश भिनले, हेच खरे ! लहान वयात मिळलेले यश, प्रसिद्धी माध्यमांचा सतत झोत आणि क्रिकेटपटूना मिळणारी शाही वागणूक याचा परिणाम झाला नाही तरच नवल ! मर्यादित षटकाच्या सामन्यात शिवा विविध प्रयोग करू लागला तेव्हा त्याला विश्रांती दिली गेली हे बरे झाले !

किरमाणी आणि कुलकर्णी याची कामगिरी अपेक्षेइतकी चागली नव्हती हे खरे, पण त्याच्या जागी घेतलेल्या खेळाडूची काय अवस्था आहे ?

किरण मोरेसारखा यष्टीरक्षक ठेऊन किरमाणीला डच्चू मिळतो ही गोष्ट अधिकच आश्चर्याची ! किरमाणी थोडा मंद झाला असेल. पण याही वयात तो मोरेपेक्षाही अधिक जांगले यष्टीरक्षण करू शकतो आणि फलंदाजीही. पण फक्त एकच गोष्ट त्याच्याकडे नाही–ते म्हणजे मोरेप्रमाणे निवडसमितीत गॉडफादर ! किरमाणीऐवजी सदानंद विश्वनाथची निवड झाली असती तर ते क्षम्य होते. कारण विश्वनाथ तरुण आहे, त्याच्यामध्ये गुणवत्ताही आहे; श्रीलका दौऱ्यावरील अपयश त्याला चागलेच भोवले आहे. तरीही तो निवड होण्याएवढा लायक खेळाडू नक्कीच आहे.

दोन–तीन वर्षांपूर्वी भारतीय संघात तथाकथित अष्टपैलूचा प्रचंड भरणा असायचा. याही वेळेला तशीच गोष्ट आहे, आझाद, मदनलाल, बिन्नी, मनोज प्रभाकर या सुपरफ्लॉप मंडळीचा संघात भरणा आहे. यातील प्रभाकर सोडून सारी वन डे स्पेशालिस्ट मंडळी ऑस्ट्रेलेशिया करंडकासाठी निवडली आहेत. यातील आझाद, मदनलाल वगैरे मंडळीना किती तरी सध्या दिल्या आहेत. पण कर्णधाराचा त्याच्यावर फार विश्वास असावा असे दिसते. नाही तर राजू कुलकर्णीसारख्या वेगवान गोलंदाजाला वगळून ही मंडळी नेण्याचे कारण काय ? राजू कुलकर्णीचा अभाव विशेषतः इंग्लंड दौऱ्यात प्रकर्षाने जाणवेल. तेथील पावसाळी हवेत, तेज गोलंदाजीस पोषक वातावरणात त्याच्यासारखा वेगवान आणि स्विंग करणारा गोलंदाज हवा होता !

आझाद, मदनलाल, प्रभाकर कपनीचे वैशिष्ट्य म्हणजे ते दिल्लीचे आहेत. कोटा सिस्टीमप्रमाणे त्याना जागा मिळाल्या आहेत. त्याच्यासाठी खानविलकर, शेखर मंडळीचा विचार केला नाही तर नवल कसले ? शेखर वयस्कर असला तरी त्याला पूर्ण संधी कोठे दिली गेली आहे ? ( आणि मदनलाल, आझाद काय तरुण आहेत ? )

निवडसमितीवर अननुभवी सदस्य असले म्हणजे कसा ब्रह्मघोटाळा होतो याचा अनुभव पुनः येत आहे. सूद सारखा माणूस कोटा सिस्टीमचाच वापर करणार ! गेल्या काही वर्षात सतत जाणवत आहे की भारताला निव्वळ गोलंदाज हवे आहेत, जे प्रतिपक्षाला बाद करू शकतील ! आम्ही मात्र तथाकथित अष्टपैलूची निवड करून स्वतःचीच गोची करून घेत असतो

मनिंदरलाही वारवार संधी देऊन झाली आहे. कसोटीत त्याने ६० च्या आसपास सरासरीने जेमतेम २० बळी घेतले आहेत.

तरीही त्याला पुन: पुन्हा संधी देण्यात येत आहे कारण तो दिल्लीकर आहे. राजपूतला एका डावातील अपयशानंतर कायमचाच डच्चू देण्याचा कुटील डाव निवडसमिती खेळते. न्यायाची ही विचित्र पद्धत ! मनिंदर-पेक्षा शिवलकर वा गोयलला घेतले, तर ४० व्या वर्षानंतरही ते मनिंदरपेक्षा भेदक गोलंदाजी टाकू शकतील. मुंबईचे ५ खेळाडू आहेत मग दिल्लीचेही ५ हवेत, या हट्टापायी मनिंदरची निवड होते. या स्पर्धेत खेळाचे वाटोळे किती होते याकडे कोणीच लक्ष देणार नाही का ? कोटा सिस्टीम आणखीन किती होतकरू खेळाडूंचे बळी घेणार आहे ?

सलामीसाठी गावसकर व श्रीकांत यांना पर्यायच नव्हता. इतर सर्व खेळाडूंच्या मानाने रमण लांबाने जोरदार खेळ केल्यामुळे त्याची निवड अपरिहार्यपणे झाली ! गावसकर सलामीला खेळत असल्यामुळे त्याची कोंडी करण्यासाठी तिसरा सलामी फलंदाज वगळ-ण्याची आवश्यकता नव्हती आणि लालू राजपूतही भरात नव्हता !

ऑस्ट्रेलियातील बेन्सन-हेजेस स्पर्धेमधील मोहिंदरचा रटाळ खेळ पाहता त्याची निवड फक्त इंग्लंड दौऱ्याकरीता झाली हे योग्यच झाले. संदीप पाटीलची निवड वादातीतपणे झाली असावी. कोणाच्या खोट्या अहंकारा-मुळे संदीपसारखा खेळाडू दूर ठेवला तर संघाचेच नुकसान होते हे समितीच्या फार लवकर लक्षात आले हे बरे झाले ! पंडीतची निवड ही त्याच्या फलंदाजीची पावती आहे. पंडीतने मिळालेल्या प्रत्येक संधीचा पुरेपूर उपयोग करून आपली जागा निश्चित केली. पाटील व पंडीत ही जोडी वेगवान धावा करण्यास खरोखर उपयोगी पडेल.

याचबरोबर मिलींद गुजाळ, यासारख्या खेळाडूवरही अन्याय झालेला आहे. पण मोरे-वरील अन्याय दूर करण्याच्या नादात गुंजाळची आठवण निवड समितीला झाली नसावी ! अनेक वर्षांनी महाराष्ट्राचा खेळाडू (यजुर्वेंद्रसिंहनंतर प्रथमच) भारतीय संघाच्या दारात होता गुंजाळने या संपूर्ण मोसमात सुरेख फलंदाजी केली. रणजी, विल्स सगळ्या स्पर्धांत त्याने धावांचा रतीब घातला होता. निवड होण्यासाठी अजून काय करायचे हे गुंजाळने सदस्यांना विचारून ठेवलेले बरे ! आझादऐवजी गुंजाळ सहज संघात बसला असता पण ते होणे नव्हते.

कपील, शास्त्री, शर्मा, यादव व अझरुद्दीन यांची निवड अपेक्षीतच होती. या सर्वांनी आपली कामगिरी मागच्या दौऱ्यात चोख बजाविली होती. ( अपवाद : अझरुद्दीन ) मात्र अझरुद्दीन संपूर्णपणे तंदुरुस्त असल्याची खात्री करणे इष्ट ठरेल. मुंबईच्या एका क्रीडापत्रकाराच्या म्हणण्यानुसार, अझरुद्दीन जखमी आहे आणि इंग्लंडच्या थंडीत त्याची जखम बरी होण्याचा संभव नाही आणि अशा परिस्थितीत खेळणे देशाच्या, त्याच्या कोणा-च्याच भावी हिताचे नाही. A steech in time saves nine ! हे लक्षात ठेवले पाहिजे.

कपिलदेव हाच दोन्ही दौऱ्याचा कर्णधार आहे– त्यामुळे संघाच्या नेतृत्व धोरणात काही बदल होतील अशी अपेक्षाच धरणे चुकीचे ! कपिसारखा बालीश कप्तान व संघात एकजुटीचा अभाव यामुळे ऑस्ट्रेले-शिया करंडक जिंकणे सोपे नाही इंग्लंडमध्ये तर याबरोबरच विचित्र हवामान, कडक थंडी आणि पूर्वार्धातील मोसम याही गोष्टी विरुद्ध आहेत. या साऱ्यावर मात करूनही आपले खेळाडू जिद्दीने खेळतील व सुरेख, सुंदर खेळाचे आणि खिलाडूवृत्तीचे दर्शन घडवतील हीच अपेक्षा व त्यासाठी त्यांना शुभेच्छा !

–सतीश कुलकर्णी

## विज्ञान

### □ संरक्षणासाठी

पृथ्वीच्या अति उत्तरेकडील भागात हवा अतिशय थंड असते व सूर्यप्रकाशही अपुरा आणि थोडे दिवसच मिळतो. त्यामुळे प्राणी आणि वनस्पती यांना सूर्यप्रकाशाचे दिवस आले की, आपल्या सर्वच शरीरक्रिया झपा-ट्याने कराव्या लागतात. कीटकांनी अगो-दरच्या मोसमात घातलेली अंडी वातावरण जरासे उबदार बनताच उबून त्यातून अळ्या बाहेर पडतात. त्याच सुमारास त्यांच्या शत्रू-चीही भक्ष्य मिळविण्यासाठी धडपड सुरू असते. म्हणून या नवजात सजीवांना आपले संरक्षण करण्याचे अभिनव मार्ग शोधून काढावे लागतात.

पाइन ब्यूटी मॉथ या जातीच्या पतंगाच्या अळ्या हिरव्या रंगाच्या असतात. त्यामुळे त्या पाईन वृक्षाच्या सुईच्या आकाराच्या पानांवर दिसू शकत नाहीत. त्याशिवाय त्या अंड्यातून बाहेर पडताच झाडाच्या वेग-वेगळ्या फांद्यावर पसरून जातात, एकत्र रहात नाहीत. त्यामुळे त्याच्यापैकी काही पक्ष्यांच्या नजरेला पडून त्यांच्या भक्ष्यस्थानी पडल्या तरी बाकीच्या अळ्या वाचतात. स्वसंरक्षणाचा हा उपाय सर्वसामान्य झाला. पण ज्यात 'बुद्धीचा' उपयोग केला आहे, असा मार्ग पाइन सॉफ्लाय या जातीच्या कीटकाने शोधला आहे.

पाइन सॉफ्लायच्या अळ्या एका जागी झुंडीने असतात. त्यामुळे शत्रूला त्यांचा सुगावा लागला तर साऱ्याचाच फन्ना होण्याची शक्यता असते. त्यांचा मुख्य शत्रू म्हणजे मुंग्या. अळ्यांचा शोध घेण्यासाठी टेहळ्या (स्काऊट) मुंग्या प्रथम बाहेर पडतात. त्यांना टेहळणी करताना अळ्यांचा घोळका आढळला की त्या ताबडतोब बातमी द्यायला वारुळाकडे परततात व मग कामकरी मुंग्यांची प्रचंड फलटण बाहेर पडून ती अळ्यांना पकडून वारुळात आणते.

पाइन सॉफ्लायच्या अळ्यांना चावता येत नाही, की त्यांच्याकडे विषारी दंशही नाही. अशा या गरीब अळ्यांची स्वसंरक्षणाची युक्ती मात्र मोठी नामी आहे. पाइन वृक्षाच्या तुटलेल्या–फाटलेल्या पानातून जी एक प्रका-रची चिकट राळ बाहेर पडते,ती त्या चावून पोटातल्या एका विशेष प्रकारच्या पिशवीत साठवतात. टेहळणीसाठी बाहेर पडलेली टेहळी मुंगी त्यांच्या नजरेस पडली की तिला घेरून तिच्या सर्वांगावर पोटातली राळ चोपडतात. मुंग्या धोक्याचा इशारा देण्या-साठी जो एक विशिष्ट पदार्थ (वास) हवेत सोडतात तसला पदार्थही अळ्यांच्या पोटातून बाहेर पडणाऱ्या राळेतही मिसळलेला असतो. त्यामुळे दोन गोष्टी घडतात एक तर टेहळ्या मुंगीला आपला परतीचा मार्ग शोधून काढा-यला वेळ लागतो व तेवढ्या वेळात अळ्या आपली जागा बदलू शकतात दुसरी विलक्षण गोष्ट अशी की, यदाकदाचित टेहळी मुंगी वारुळापर्यंत माग काढू शकलीच, तरी तिच्या अंगाला 'शत्रू आहे, सावध'चा वास येत असल्यामुळे वारुळातल्या मुंग्या शत्रू समजून तिलाच मारून टाकतात !

मनुष्यासह सर्व सस्तन प्राणीवर्ग हा अधिक हुषार, प्रगत व उत्क्रांत झालेला आहे असे सर्वसामान्यपणे मानले जाते. नीच कोटीतील कीटकासारखे प्राणीसुद्धा स्वसंरक्षणासाठी किती विलक्षण हुषारीचे उपाय योजितात हे पाहिल्यावर प्रगतीचे व हुषारीचे मानदंड पुन्हा तपासावे लागतील. वर दिलेल्या उदाहरणासारखी असंख्य उदाहरणे आपल्याला मिळू शकतील, नव्हे तशी ती मिळालेली आहेतच आणि ती तथाकथित

सिद्धी मिळविलेल्या 'सिद्ध पुरुषा' नी हातातून उदी काढणे, घड्याळे, अंगठ्या काढणे या प्रांत चमत्कारापेक्षा अधिक खरी, विस्मयकारक आहेत. त्याचा शोध घेणे हे माणसाच्या बुद्धीचा सन्मान राखणे होईल.

—सु. स. शिरोडकर

## नॉनस्टिक टेफ्लॉन : प्लास्टिकचा स्थितप्रज्ञ बादशहा

'शस्त्रे ज्याला तोडू शकत नाहीत, अग्नि ज्याला जाळू शकत नाही, पाणी ज्याला भिजवीत नाही आणि वारा ज्याला सुकवीत नाही अशा प्रकारे भगवद्गीतेत आत्म्याचे वर्णन केले आहे. आत्म्याखेरीज कोणत्याही भौतिक वस्तूला हे वर्णन लागू पडत नव्हते; पण आता नॉनस्टिक टेफ्लॉनच्या निमित्ताने एक नवा कर्मयोगी स्थितप्रज्ञ अस्तित्वात आला आहे. त्याला वरील लक्षणे तंतोतंत लागू पडतात.. हा नवा पदार्थ फार दूर, प्रयोगशाळेत, कारखान्यात किंवा वस्तुसंग्रहालयात आहे असे मानायचे कारण नाही. नॉनस्टिक भाड्यांच्या रूपाने तो घरोघर अगदी स्वयंपाकघरापर्यंत पोहोचला आहे.

अमेरिकेतील ड्यू पाँट कंपनीला अगदी अनपेक्षितरित्या आणि अपघातानेच गवसलेला हा पदार्थ, पहाता पहाता स्वयंपाकाच्या भाड्यांना लेप म्हणून आता जगभर वापरला जात आहे. भारतात 'तृप्ती', 'निर्लेप' आणि 'मीरा', या नावाने विकली जाणारी नॉनस्टिक स्वयंपाकाची भांडी तयार करताना हाच टेफ्लॉन नावाचा पॉलिमर वापरला जातो. पदार्थ एकच पण प्रत्येकाची जाहिरातीची तऱ्हा मात्र न्यारी. पहाना! तृप्तीची भांडी HTR म्हणजे हाय टेंपरेचर रेझिस्टंट म्हणून विकली जातात. निर्लेपच्या जाहिरातीत तुमच्या अहारातून स्निग्धांश कमी करा, असा तुमच्या आरोग्याची काळजी घेणारा वैद्यकीय सल्ला असतो. तर ग्राहकाची इंपोर्टेडची आवड विचारात घेऊन मीराभांडी अमेरिकेच्या ड्यूपाँट कंपनीने विकसित केलेल्या टेफ्लॉन–२ पासून बनवलेली आहेत, असे सूचित केले जाते आणि वैशिष्ट्य म्हणजे, या आणि नॉनस्टिक स्वयंपाकाची भांडी बनवणाऱ्या प्रत्येक कंपनीचा दावा अगदी खरा असतो. कारण मूळ गुणच त्या आश्चर्यकारक पॉलिमरचा आहे ज्याला पदार्थ चिकटत नसला तरी अशी अशी कितीतरी विशेषणे मात्र सहज चिकटवता येतात.

ड्यू पाँट कंपनीने टेट्राफ्लूरोइथिलीन वायूचा सिलिंडर भरून ठेवला होता. काही कालावधीनंतर त्यातला वायू वापरण्यासाठी घेण्याचा प्रयत्न केला असता, सिलिंडरमधून वायू बाहेर पडत नसल्याचे आढळले. सिलिंडर तर भरलेलाच होता पुढे तो सिलिंडर फोडून पाहतात तर त्यामधील वायूच्या जागी चिकट घट्ट असा पदार्थ तयार झालेला. हवेतला ऑक्सिजन टेट्राफ्लूरोइथिलीनबरोबर सिलिंडरमध्ये गेला व नव्या रेझिनची निर्मिती झाली पॉलिमरायझेशन झाल्याने हा नवा पॉलिमर निर्माण झाला. त्याचे नाव पॉलीट्रेट्राफ्लूरोइथिलिन PTFE. ड्यू पाँट कंपनीने त्याला 'टेफ्लॉन' असे सुटसुटीत नाव दिले. म्हणजे हे एक नवे प्लास्टिकच. त्याचे गुणधर्म तपासले असता हा पदार्थ म्हणजे एक स्थितप्रज्ञच असल्याचे आढळून आले. दमट, ओलसर, उष्ण अशा हवामानाचा त्यावर कोणताही परिणाम होत नाही. २७५ अंश सेंटीग्रेड तपमानापर्यंत तो तापवून पाहिला असता त्याला जरासुद्धा धक्का लागला नाही किंवा तो ठिसूळ झाला नाही. त्या पदार्थाला काहीही चिकटत नाही, किंवा त्यावर कशाचाही सहजासहजी परिणाम होत नाही. इतकेच काय ज्यात सोने विरघळते अशा अॅक्वा रेजियामध्ये टेफ्लॉन अविचल रहातो. टेफ्लॉन विद्युत् विरोधक आहे. त्यामुळे त्याचा विद्युत् उपकरणे, विमाने, विद्युत् वाहिनी, अवकाश याने या मध्ये उपयोग केला जातो. तो रासायनिकदृष्ट्या स्थिर असल्याने त्याचे औद्योगिक महत्त्व विलक्षण आहे दुसऱ्या महायुद्धात त्याची उपयुक्तता विशेषत्वाने जाणवली त्या नंतरच्या काळात नवी नवी सयुगे टेफ्लॉन या नावाने पुढे येवू लागली. परंतु स्वयंपाकाच्या भाड्यांना टेफ्लॉनचे आतून आवरण दिल्याने हा पदार्थ सामान्य जनतेपर्यंत पोहोचला.

### अनेक उपयोग

आपल्या दृष्टीने टेफ्लॉनला काहीही चिकटत नाही, ही अचंबा करण्यासारखी गोष्ट आहे. परंतु त्याचे कारणही तसेच आहे टेफ्लॉनच्या अंगी असणारा हा नॉनस्टिक गुणधर्म केवळ त्यातील कार्बन–फ्लूरीन बंधामुळे आहे. हा बंध (बाँड) सेंद्रीय किंवा कार्बनी रसायनातील एक वैशिष्ट्यपूर्ण आणि अतिशय भक्कम असा बंध मानला जातो. टेफ्लॉनच्या पृष्ठभागावरील ऊर्जा या बंधामुळे अतिशय कमी असते. म्हणूनच त्याला काहीही चिकटत नाही. टेफ्लॉनचा रंग घट्ट मेणासारखा दुधाळ व पृष्ठभाग गुळगुळीत आणि बर्फासारखा निसरडा असतो. आपण पहातो त्या भाड्यांना दिसणारा गडद रंग हा विशिष्ट प्रकारच्या रंगद्रव्याचा टेफ्लॉनमध्ये वापर केल्याने प्राप्त झालेला असतो. तर तर त्याचा पृष्ठभाग फ्लोरीन अॅटम्समुळे निसरडा व नॉनस्टिक बनतो.

हायड्रोफ्लोरिक वायू आणि क्लोरोफॉर्म यापासून टेट्राफ्लूरोइथिलिन हा वायू बनतो व पुढे पॉलिमरायझेशन क्रियेने टेफ्लॉन तयार केले जाते हायड्रोफ्लोरिक वायू आणि क्लोरोफॉर्म हे पदार्थ महागडे तर आहेतच, पण टेफ्लॉनची निर्मिती प्रक्रियासुद्धा महागडी आहे. साहजिकच टेफ्लॉनचा वापर केलेल्या वस्तूची किंमत जास्त असते. भुकटी, द्रव व दाणेदार स्वरुपात टेफ्लॉन उपलब्ध असते. भाड्यांना लेप देण्यासाठी द्रवरूप टेफ्लॉन वापरतात. स्प्रे पेंटिंग, फ्लो कोटिंग आणि विद्युत विलेपन यासारख्या पद्धतींचा वापर करून हा लेप दिला जातो आणि अंशे ७० ते अंशे ८० अंश सें. तपमानाला हा लेप वळविला जातो २८० ते ३०० अंश सें. तपमानाला बेकिंग व ३८० अंश सें. तपमानाला फिक्सिंग या प्रक्रिया होतात. अशा ०.००१५ इंच इतकी पातळ म्हणजे 'ब्यूटी इज ओन्ली स्कीन डीप' हे या नॉनस्टिक भांड्याच्या बाबतीतसुद्धा खरे ठरते.

टेफ्लॉनचा केवळ भाड्यांना विलेपनासाठी उपयोग होतो असे नाही, तर व्हॉल्व्हज्, गास्केट, विद्युत उपकरणे, इन्सूलेटर, होस पाइप्स निर्मिती, औषधांच्या बाटल्यांच्या झाकणांना आवरण म्हणून, धातूच्या नळ्या जोडण्यासाठी आणि गंज विरोधक म्हणून अशा अनेक प्रकारे त्याचा उपयोग केला जातो. ड्यू पाँट कंपनीने तयार केलेली टेफ्लॉन फ्लूरोकार्बन फिल्म तर बहुगुणी म्हणून असंख्य प्रकारच्या उद्योगधंद्यात वापरली जाते. भारतात टेफ्लॉनची निर्मिती होत नाही. पण आयात केलेल्या टेफ्लॉनपासून रॉडस्, ट्यूब्स, टेप्स, ओ–रिंगज्, व्हाल्व्हज् आणि स्वयंपाकाची भांडी बनविली जातात. आपल्या घरगुती जीवनात अशाप्रकारे हा प्लास्टिकचा बादशहा स्थिरावतो आहे. अर्थात गृहिणींनी अशी टेफ्लॉन कोटेड भांडी वापरताना विशेष दक्षता घेणे आवश्यक ठरते. कारण टेफ्लॉनचा थर अतिशय घातक असल्यामुळे ही भांडी व्हीम अथवा अन्य कोणत्याही पावडरने घासू नयेत. तर थंड झाल्यावर केवळ डिटर्जंट अथवा साबणाचा चुरा टाकून पाण्याने विसळून घ्यावीत व स्पंजाने पुसावीत. या भाड्यांसाठी खास दिलेल्या लाकडी उलथण्याचाच वापर करावा. लोखंडी अथवा स्टीलचे उलथणे वापरू नये. भांडे शेगडीवर रिकामे ठेवून फार वेळ तापवू नये किंवा तापलेल्या भाड्यात लगेच थंड पाणी ओतू नये. इतकी काळजी घेतली तरच ती भांडी दीर्घकाळ वापरता येतील टेफ्लॉनला काही होत नसले तरी भांड्याला त्याचा दिलेला थर सांभाळलाच पाहिजे.

— डॉ. सुभाषचंद्र सारंग

**MANOOS WEEKLY** (Licensed to post without prepayment of postage No–11) Regd. No. PNCW–28

- **योद्धा शेतकरी** / विजय परुळकर / ३६ रुपये
- **डॉ. आयडा स्कडर** / वीणा गवाणकर / २२
- **एक होता कार्व्हर** / सौ. वीणा गवाणकर / ३०
- **श्रीग्रामायन** / श्री. ग. माजगावकर / २५
- **बलसागर** / श्री. ग. माजगावकर / ३०
- **निर्माणपर्व** / श्री. ग. माजगावकर / ४०
- **पूर्णत्वाचे प्रवासी** / प्रा. शरद कुलकर्णी / ५०
- **आंबेडकर भारत** / बाबुराव बागुल / २०
- **लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी** / पु. ल. इनामदार / २०
- **निलगिरीची शेती** / विनायक पाटील / १५
- **अब्राहम लिंकन, फाळणी टाळणारा महापुरुष** / वि. ग. कानिटकर / १५०
- **नाझी भस्मासुराचा उदयास्त** / वि. ग. कानिटकर / १४०
- **विज्ञानेश्वरी** / डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / २०
- **तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय** / डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / २०
- **मानसकन्या** / प्रा. मनोहर राईलकर / २०
- **सांगत्ये ऐका** / हंसा वाडकर / १४
- **शतपावली** / रवींद्र पिंगे / १६
- **रूपवती भार्या शत्रुः ?** / ॲड. माधव कानिटकर / २५
- **सबला** / माधव शिरवळकर / १२
- **काही दिवस श्यामचे काही दिवस राधाचे** / फिरोझ रानडे / २५
- **फिडेल ' चे आणि क्रांती** / अरुण साधू / २२
- **मला निसटलंच पाहिजे** / श्रीकांत लागू / २२
- **लेक वालेसा** / डॉ. श्रीकांत मुंदरगी / २२

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४ ३४ ५९

C/o. श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी
चितळे पथ कॉर्नर, दादर (प.)
मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ५४ ५५
४२२ ३९ ०१

- **माध्यमिक शाळेतील विद्यार्थी** / श्री. ब. गोगटे, म. न. पलसाने / १०
- **कथा ही गणिताची** / ल. वा. गुर्जर / ६०
- **महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न** / म. न. पलसाने, श्री. अ. पाटणकर, वि. मा. कुलकर्णी, सुमन करंदीकर / ३५
- **गुजरातेतील मराठी राजवट** / वि. गो. खोबरेकर / १५
- **तीर्थरूप आक्का** / शारदाबाई आपटे / ५
- **सहा साहसे** / दा. सी. देसाई / १६
- **परसूच्या पशुकथा** / वसंत सबनीस / १२
- **चार्ल्स डार्विन** / भा. रा. बापट / ३२
- **कुंपण आणि आकाश** / मंगला गोडबोले / २०
- **वयात येताना** / मंगला गोडबोले, डॉ. वैजयंती खानविलकर / २५
- **वाट चुकलेली माणसं** / शिरीष सहस्रबुद्धे / ४०
- **नाट्यपंढरी** / गो. रा. जोशी । २०
- **ऊर्जा प्रश्न : आशा उद्याच्या** / प्रि. खं. कुलकर्णी / २५
- **कल्पान्त** / प्रा. मनोहर राईलकर / ३५
- **या कॉम्प्युटरमध्ये दडलंय काय ?** / राजीव साने / ३०
- **लघुउद्योग मार्गदर्शक** / शिरीष सहस्रबुद्धे / ६५
- **राजहंस गीत संग्रह** / सौ. कमल प्रभुणे, सौ. विद्या बापट, डॉ. सौ. ललिता गुप्ते / १०
- **बखर कॉंग्रेसची** / शिरीष सहस्रबुद्धे / ९०
- **लांडगा आला रे ऽ आला** / जगदीश गोडबोले / ३०
- **झुळुक** / मंगला गोडबोले / २५
- **तेंडुलकरांची नाटके** / डॉ. चंद्रशेखर बर्वे / ३०
- **भ्रम आणि निरास** / डॉ. नरेंद्र दाभोळकर / ३०
- **सेंट्रल एक्साइज आणि लघुउद्योग** / शिरीष सहस्रबुद्धे / २४